म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
वा. नं. ११५

१८९१ सन

म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
लेखक खं मि बोडस
सन १८९१
ग्रंथालय क्रमांक ६३०
पुस्तकाचें नांव विष्णुशास्त्री चिपळूणकर
५६९

१३०

चरित्र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना : – खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५(८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल

२०९१८(९)

कैलासवासी
सखाराम विठ्ठलपंत पटवर्धन
यांचे स्मरणार्थ,
मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणें,
या संस्थेस नजर.
ग. स. पटवर्धन
९-१०-१९

# विष्णुशास्त्री चिपळूणकर

यांच्या

## चरित्राचें व लेखांचें साधारण स्वरूप.



विष्णुशास्त्री चिपळूणकर.

निबंधमालाकार

# विष्णुशास्त्री चिपळूणकर

यांच्या

## चरित्राचें व लेखांचें साधारण स्वरूप,

तसबिरीसहित.


## खंडेराव भिकाजी बेलसरे

यांनीं लिहिलें.


जेथें दिसती अधिक गुण,
तें सद्गुरूचें अधिष्ठान, ।   दासबोध.


मुंबई :

'ज्ञानप्रभाकर' ग्रंथप्रकाशक मंडळीनें छापविलें.



हें सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदिलें आहे.



आक्टोबर, सन १८९१.

किंमत एक रुपया.

# सशास्त्र

## उत्तम गुण देणारीं औषधें.

कि०

१. धातुवर्धक, वीर्यस्तंभक, कामोत्तेजक, शरीरास कांति देणाऱ्या २८ गोळ्यांस ................ १८८

२. दमा व खोकला यांवर अप्रतिम गुण.—बालकांस फारच उपयोगी. २८ गोळ्यांस ........... १८६

३. व्रणावर परमगुणदायक (दु:साध्य जुने अस्थिगत झालेलेही जातात.) ३२ गो०.... ......... . १

४. गजकर्ण, नायटे, खरूज, औषध न झोंबतां पांच दिवसांत जातात. पुनः उठत नाहींत. डबीस. ८८

५. उपदंशसंबंधीं परमा, चट्टा, तिडीक हे विकार तोंड न येतां ७ दिवसांत जातात. डबीस .... १८८

६. उन्माद, बालग्रह, अपस्मार यांवर फारच अप्रतिम गुण देणारी गुटी. २८ गोळ्यांस ........ १८४

७. नेत्रांजन सारा, फूल, गळ, खूप, लाली, सूज, कंडू हे त्वरित जाऊन दृष्टि स्वच्छ होते. डबीस. ८८

वरील औषधें उत्तम असल्याबद्दल बरेच दाखले आहेत व येत आहेत; करितां ग्राहकांनीं खालील पत्त्यावर मागविल्यास रोखीनें अगर व्ही. पी० पार्सलनें पाठवूं. अनुपानखर्डा सोबत मिळेल. याशिवाय रसायनें, मात्रा, गुटिका, आसवें, तेलें, पाक वगैरे माफक दरानें मिळतील. पत्रें पेड व पत्ता बालबोध कळवावा.

रघुनाथ महेश्वर जोशी, वैद्य.

पत्ता—मु० मुरुड, ता० दापोली, जि० रत्नागिरी.

# समर्पण

डा० कान्होबा रणछोडदास कीर्तिकर

सर्जन मेजर, मुंबई लष्कर,

एल्.आर्.सी.पी; एम्.आर्.सी.एल्.,

मुंबईच्या विद्वत्परिषदेचे सभासद,

यांस.

वि० वि० आपली मराठी भाषेविषयीं जी आस्था आहे व तिच्या उत्कर्षाविषयीं जे श्रम चालले आहेत ते फार स्तुत्य आहेत व या प्रकरणीं आपला कित्ता आमच्या विद्वानांनीं उचलण्यासारखा आहे असें माझें ह्मणणें आहे. तशीच विद्वत्ता, गुणज्ञता व सौजन्य याबद्दल ही आपली कीर्ति मीं ऐकली होती तिच्या सत्यतेचाही अनुभव मला अल्प काळांतच येऊन आपले विषयीं फार आदर उत्पन्न झाला. तो कोणते मार्गानें दर्शवावा याची संधि मी पाहात होतों; ती आज आली आहे. आपल्यांतील एका प्रसिद्ध व थोर पुरुषाची यथामतीनें अल्प सेवा करण्याचा जो हा यत्न मी केला आहे तो आपल्यास बराच पसंत पडल्याचें आपण कळविलें त्याचा मला आनंद वाटतो. यास्तव हें पुस्तक आपल्यासच नम्रपणें अर्पण केलें आहे. आपल्यास मान्य व्हावें ह विनंति.

खंडेराव भिकाजी बेलसरे.

ता० २४ आक्टोबर, सन १८९१.

## याच कर्त्यानें केलेलीं पुस्तकें.

**तीन गोष्टी**–विविधज्ञानविस्तार मा० पु० च्या मालकांनीं छापविलें............................किं. आणे चार.

**विष्णुशास्त्री चिपळूणकर**–यांच्या चरित्राचें व लेखांचें साधारण स्वरूप..........................किं० रुपया एक.

**वटसावित्री कथा गीत**–आल्या वर्षी बायकांनीं वडं पुजेस ह्मणावयाचें जुनें गाणें. जुन्या व अप्रसिद्ध शब्दांवर टिपा वगैरे देऊन शुद्ध करून छापविलेलें. आजपर्यंत कोठेंही छापून निघालें नाहीं........किंमत आणे अडीच.

**लार्ड नेल्सन याचें चरित्र**–दक्षिणा प्राइझ कमेटीनें बक्षीस दिलेलें. छापत आहे....................................किं०

**विष्णुशास्त्री चिपळूणकर**–यांच्या फुटकळ व किरकोळ **निबंधाचा संग्रह**–केसरींतील, ज्ञानप्रकाशांतील व शाळापत्रकांतील निबंध, संगतिद्योतक टिपा व प्रस्तावना यांसह तयार होत आहे.

**भागवतकथामृतसार**–नवीन तऱ्हेनें छापत आहे.

विक्रीचीं ठिकाणें:– मुंबईंत शेतओळी वी ६ गल्ली, आंग्रेची चाळ येथें कर्त्याकडे; विविधज्ञानविस्ताराचें ऑफीस, काळकादेवी; राइलकर आणि मंडळी, माधवबागेजवळ नळाचे रस्त्यावर; किताबखाना काळकादेवी ; व पुण्यांत पुणेवैभव छापखाना व चित्रशाळा छापखाना.

**The system of Government in India.**

—full of useful information to the general reader and to Students preparing for 2nd Grade P. S. Examination by Malhar B. Belsare, Teacher Ahmadabad H. School. Price 8 Ans.

# प्रस्तावना.

---

ह्या वर्षी पुण्यास कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या मरणदिवसाच्या स्मरणार्थ एक मेळा जमला होता. त्यावेळीं रा० रा० वासुदेव गणेश जोशी यांणी असें कळविलें कीं, जो कोणी विष्णुशास्त्री यांचें चरित्र लिहील त्यास आपण दोनशें रुपयांचें बक्षीस देण्यास तयार आहों; नंतर अशी जाहिरात वर्त्तमानपत्रांतही प्रसिद्ध झाली ती पुष्काळांनीं पाहिली असेल. विष्णुशास्त्री यांच्या मरणानंतर बहुतेक आज तारखेपर्यंत सर्वत्र सामसूमच दिसत होतें, पण ती स्थिति आतां नष्ट व्हावयाचा समय आला असें दिसतें. या थोर पुरुषाविषयीं प्रीतीच्या लाटा आजवरही सारख्या लोकांच्या अंतःकरणांत उचंबळत आहेत हें पाहून समाधान वाटतें व मन उत्तेजित होतें. यांचें सविस्तर चरित्र कोणी तरी माहितगार व लिहिण्यांत वाकबगार अशा मनुष्यानें—त्यांतही पुण्यांतल्या एखाद्या गृहस्थानें ह्मटलें ह्मणजे यापूर्वीं कधींच लिहावें. परंतु तसा योग आजवर आला नाहीं ही खेदाची गोष्ट आहे. कधीं कधीं एखाद्या भल्या माणसाच्या थोरवीचे किरण त्याच्याच आसपासच्यापेक्षां दूरदूरच्या मनुष्यांसच अधिक चांगले पोंचतात, या तत्त्वाचाच कदाचित् हा परिणाम असेल. दिव्याखालीं अंधेर ही ह्मण प्रसिद्धच आहे.

पुष्कळ दिवसांपासून विष्णुशास्त्र्यांवर आपण कांहीं लिहावें असा मनोदय होता तो सिद्धीस जाण्याचा समय गेले सालीं अकस्मात् आला कसा; त्याचा उल्लेख

पडेल असें मुळींच नाहीं; कोणाला कांहीं, कोणाला कांहीं असें खोड ठेवण्यासारखें त्यांत पुष्कळ आढळेल, हें आह्मी समजून आहों. वास्तव यावर जेवढी चर्चा होईल तेवढी इष्टच आहे. शास्त्रीबोवांच्या मरणानंतर लागलीच चेला वगैरे नामधारकांनीं कांहीं गडबड केली होती. तथापि तेव्हांच्या पेक्षां हल्लीं बराच काळ लोटल्यामुळें, व त्यांनीं उपस्थित केलेले उद्योगांचें स्वरूपही बरेंच स्थिरावल्यामुळें, त्यांच्याविषयीं निष्पक्षपातपणें व निर्भिडपणें विचार करण्याला व लेखणी चालविण्याला प्रस्तुत बरीच सवड झाली आहे असें आह्मास वाटतें. अशा समयास आह्मी आपलें हें पुस्तक लोकांपुढें ठेवतों, आणि सर्व देशहितेच्छूंनीं या विषयांची चर्चा करावी असें मनापासून इच्छितों. अशानेंच विष्णुशास्त्री यांच्या चरित्राचें यथार्थ ज्ञान होऊन त्यापासून होणारे फायदे आपल्यास करून घेतां येतील. या पुस्तकांत जी माहिती दिली आहे तीहून जास्ती किंवा निराळी माहिती कोणास ठाऊक असल्यास व जे विचार प्रदर्शित केले आहेत त्याहून वेगळे विचार प्रगट केल्यास आम्ही त्यांचे मोठे आभार मानूं, व योगायोग आल्यास त्यांचा उपयोग करण्यासही अनुमान करणार नाहीं.

विष्णुशास्त्री यांच्या मतांविषयीं व विशेषेंकरून भाषासरणीविषयीं पुष्कळ लिहिण्यासारखें आहें. तथापि हा पहिलाच यत्न असल्यामुळें व लेखही अटकळीच्या बाहेर वाढल्यामुळें एथेंच थांबणें बरें दिसलें. या पुस्तकाचा रंग पाहून, 'केसरींतील विष्णुशास्त्री यांच्या किरकोळ निबंधांचा संग्रह, प्रस्तावना व टीपा यांसहित,' हें पुस्तक तयार

करण्याचा बेत आहे तो जमल्यास त्यांत वरील दोनही बिनांचा विस्तार करूं अशी उमेद धरतों.

रा. रा. लक्ष्मणराव चिपळूणकर यांचा कांहींच परिचय नसतां अकस्मात् आगगाडीचे डब्यांत तसा योग सुदैवानें येऊन, जमून व त्यांनीं उदारपणानें या पुस्तकाचीं प्रुफें पाहण्याचें कबूल केलें, व चरित्रभागाचीं प्रुफें पाहून सूचना केलेल्या; रा. रा. वासुदेवराव जोशी यांनीं शास्त्रीबोवांची तसबीर देऊन उत्तेजन दिलें; व रा.रा. शंकरराव शाळीग्राम, दीनकरपंत नातू इ० मित्र मंडळीनें अनेक प्रकारें मदत केली या बद्दल त्यांचे सर्वांचे मी मोठ्या नम्रपणें उपकार मानतों.

सर्व प्रकारची सं०प्रा०इं० वगैरे पुस्तकें मिळण्याची सोय.

# मुंबई किताबखाना.

## काळकादेवी, मुंबई.

इतिहास प्रसिद्ध स्त्रियांचे व पुरुषांचे पोवाडे किं. २-८ ट. ख. मा.

| पुस्तकें. | रु० | आ० | पुस्तकें. | रु० | आ० |
|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र भाषेंतील सुरस व चं०गोष्टी भा०५. | ५ | ० | गुणोत्कर्ष नाटक ... | ० | ८ |
| तुळसीदासकृतरामायण. | ४ | ० | वैद्य निराळेपन ... | ० | ८ |
| मुंबईचें वर्णन ... | २ | ८ | दिपोत्साह चंद्रीका. ... | ० | ८ |
| तुकारामाची गाथा ... | २ | ८ | सातगोष्टी ... ... | ० | ८ |
| सिद्धांतकौमुदी. ... | २ | ० | आर्यपंचाग ... ... | ० | ८ |
| ललितसंग्रह ... | १ | ० | श्रीयाळ नाटक ... | ० | ८ |
| आजकालच्या गोष्टी... | १ | १२ | ऋतुसंहार काव्य. ... | ० | ६ |
| विंचुरकर घराण्याचा इ० | १ | ८ | दामाजीपंताचें नाटक. | ० | ६ |
| धि टेंपेस्ट नाटक ... | १ | ० | पानपतची बखर. ... | ० | ६ |
| हिंद आणि ब्रिटानिया | १ | ८ | सरवाल्टरस्काट चरित्र. | ० | ६ |
| गोमंतकाचा इतिहास... | १ | ४ | सृष्टीज्ञान ... ... | ० | ५ |
| तुर्क व रशियन लो०इ० | १ | ४ | सृष्टीशास्त्रांचीं मूळतत्वें | ० | ५ |
| शशीकला नाटक ... | १ | ० | गोचरफलादर्श ... | ० | ४ |
| ज्ञानेश्वरविजय ... | १ | ० | भोजनबंधु पानतंबाखु आ. दु. ... ... | ० | ३ |
| तीर्थयात्रा प्रबंध ... | १ | ० | कुटुंबसुधारणा आ०दु० | ० | २ |
| साहीत्य मालीका. ... | ० | १४ | व्यवहारोउपयोगी नाटक | ० | २ |
| मदनकुतुहल. ... | ० | १२ | नितिसंवाद आ०दु०... | ० | १ |
| झुंझारराव नाटक. . | ० | १२ | दारूपासून अनर्थ आ दु. | ० | १ |
| श्रीदत्तमहाराजांचें भ० | ० | ११ | गोविंद नारायण माडगांवकर यांचें लघु च. | ० | १/२ |
| वेदोक्त स्त्रीधर्मप्रकाश... | ० | १० | रेशमी रुमाल ........ | ० | १/४ |
| विश्वसेन भा०१-२प्रले० | ० | १० | | | |

मुंबई, किताबखाना, काळकादेवी समोर.

**नारायण गोविंद माडगांवकर,**
बुकसेलर आणि पब्लिशर.

# विषयानुक्रम.

---

१ उपोद्घात.—विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरित्र कां लिहिलें नाहीं. पृष्ठ १–१२.

२ चरित्र.—वडिलांची माहिती. बाळपण. शाळेंतील व कालेजांतील अभ्यास. ज्ञान प्राप्तीचे मार्ग–इंग्रेजी, संस्कृत, मराठी. इतर विद्यार्थी व शास्त्रीबोवा यांच्यातील अंतर. शालापत्रक चालविणें इ०. पृष्ठ १२–३०,

३ निबंधमालेचा उदय. तिच्या कार्यावर संकटें. नोकरी सोडणें. मराठीचा ओढा. नोकरीच्या राजीनाम्याबद्दल पत्र. तत्समकालीन लोकमत इ०. पृष्ठ ३१–४९.

४ नोकरी सोडल्यावरची उद्योग परंपरा.—नवी शाळा, चित्रशाळा, काव्येतिहास संग्रह, केसरी वर्तमानपत्र. मृत्यु. इ०. पृष्ठ ५०–५७.

५ शास्त्रीबोवांचें खासगी वर्तन. सार्वजनिक वर्तन. देशभक्ति, देशाभिमान, लोककल्याणेच्छा, हिंदुधर्माभिमान, घरांतील नित्यक्रम. त्यांचीं धर्मविषयक मतें, व वर्तन. त्यांचा पंतोजीपणा व दूषणारोपांचें निरसन. दोष–कुत्सितपणा ; नाटकें व तमाशे यांची आवड. गुण–उद्योगनिरतत्व, दृढनिश्चय, धैर्य, समयसूचकता, इ०, पृष्ठ ५७–१०२.

६ मतें. मराठीचें पुनरुज्जीवन. देशोन्नतीचें लक्षण. देशभक्ताची 'कसोटी.' स्वातंत्र्यप्रियता. जातिभेदाविषयीं मत.—स्त्रियांस कसें वागवावें ? वैधव्याविषयीं विचार. त्यांच्या लेखांतले दोष व त्यांचें समाधान इ०, पृष्ठ १०४–११६.

७ भाषासरणी उत्तम कोणती ? तींतील वक्तृत्वगुण. सुलभत्व व अकृत्रिमत्व. अलंकारांची योजना. अवतरणें. वर्णनशक्ति, व विषयसमर्थन. एक मोठा विशेष.—उत्साहजनकत्व. इंग्रेजी भाषारीतीच्या अनुकरणानें आलेली ऐट इ०. पृष्ठ ११६–१२६.

८ उपसंहार. त्यांची योग्यता. लोकप्रियता. लोकांचा विश्वास. कार्यक्षमता. लोकनायकत्व इ०. पृष्ठ १२६–१३६.

९ अधिक उणी माहिती व शुद्धीकरण. पृ. १३७–१४०.

# विष्णुशास्त्री चिपळूणकर.

गुणाधिके पुंसि जनोऽनुरज्यते
जनानुरागप्रभवा हि भूतयः।

भारविः।

लोकांच्या प्रीतीस पात्र होणें ह्मणजे थोरपणाचें साधारण लक्षण नव्हे. पैशामुळें, अधिकारामुळें, वयस्कपणामुळें, किंवा अशाच एखाद्या गोष्टीमुळें मनुष्यास लोकमान्यता प्राप्त होईल, पण तिची योग्यता फारशी धरतां येत नाहीं. नुसत्या लोकमान्यतेपेक्षां लोकप्रियतेची योग्यता अधिक आहे हें उघड आहे. लोकप्रियतेमुळें—ह्मणजे कांहीं वरिष्ठ प्रतीच्या लोकांपासून नव्हे, किंवा विवक्षित ज्ञातीपासूनही नव्हे, तर सर्वसाधारण समंजस लोकसमुदायापासून संपादिलेल्या प्रीतिपात्रतेमुळें जो थोरपणा येतो, तो कांहीं निराळ्या प्रकारचा आहे व तो हवा त्यास मिळवितां येतो असेंही नाहीं. कांहीं मनुष्यांमध्यें असा एक विलक्षण गुण असतो कीं त्याच्या योगानें त्याला लोकांचीं मनें आपलींशीं करून घेतां यावीं; नुसतें नांव ऐकतांच चित्तवृत्ति क्षुब्ध, उत्कंठित, व उत्सुक व्हाव्या, सर्व शरीर सरसरून जावें, त्याच्याविषयीं भक्तिपुरस्सर अभिमान वाटावा, त्याच्या ठिकाणीं विश्वास उत्पन्न व्हावा, व त्यानें दाखविलेल्या मार्गानें जाण्याविषयीं साहजिक प्रवृत्ति व्हावी! हा गुण ह्मणजे केवळ गौडबंगाल नव्हे कीं

त्याच्या योगानें लोकांच्या मनावर मायाभ्रमाच पटल येऊन विचारशक्ति अगदीं निःशस्त्र किंवा दुर्बळ होऊन जावी. या गुणाला पोषक असे दुसरेही कित्येक गुण अंगीं असावे लागतात. तेव्हांच, वरील गुणाचें प्राबल्य वाढून, लोकांचीं मनें वळविनां येतात. ते गुण ह्मणजे, शुद्ध व सरळ वर्तन, निःस्वार्थबुद्धि, सत्यप्रीति, कार्यक्षमता इत्यादि होत. वरील सामुग्री ज्यांच्यापाशीं असते त्यांसच **लोकनायक** ही पदवी साजते; ज्यांनीं नुसतीं सरकारचीं मोठमोठीं कामें बजावून मान्यता मिळविली असेल त्यांस साजणार नाहीं. **विष्णुशास्त्री चिपळूणकर** यांचे ठायीं इतर गुणांबरोबर, वरील उक्त गुण प्राधान्येंकरून वसत होता, व त्यामुळें अल्पकाळांतच लोकप्रिय होऊन, त्यांची थोर पुरुषांत गणना होऊन गेली, असें आह्मांस वाटतें. हें त्यांच्या चरित्रांतील गोष्टींचा यथानुक्रम विचार केला असतां स्पष्ट दिसून येईल.

हें जग सोडून गेल्यास **विष्णुशास्त्री चिपळूणकर** यांजला आज उणीं पुरीं आठ नऊ वर्षें झालीं. पण तितक्या अवकाशांत, त्यांचें लहान मोठें चरित्र लिहिण्याचें कोणाचेही हातून झालें नाहीं, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. आमच्या लोकांच्या अंगीं किती विलक्षण शैथिल्य भरलें आहे व त्याच्या योगानें अनेक प्रकारें आमचें केवढें नुकसान होत आहे, त्यांचें कांहीं अनुमान या एका गोष्टीवरून ही सहज होण्याजोगें आहे, यांत संदेह नाहीं. **विष्णुशास्त्र्यां**विषयीं आमच्या मनांत उदासीनता आहे किंवा इतक्या थोड्या काळांत त्यांचा आह्मास विसर पडला अशी अकृतज्ञबुद्धि आम-

च्या लोकांच्या मध्यें असेलसें संभवत नाहीं, व असा मिथ्याऽऽरोप करण्याचें धाडसही कोणी करणार नाहीं असें आह्मास वाटतें. त्यांचे लेख व त्यांचीं कृत्येंच त्यांच्याविषयीं आदर उत्पन्न करावयास आणि आठवण द्यावयास सदैव जागरूक आहेत. त्यांच्या स्वातंत्र्यप्रियतेवरून आणि निःस्वार्थ देशभक्तीवरून, सर्व महाराष्ट्रांत एका काळीं त्यांच्या नांवाचा जो जयघोष झाला, त्याचा नाद अजून शांत झाला नसून आमच्या कर्णरंध्रांत चांगला घुमघुमत आहे. त्यांच्या मालेच्या मरंदानें तर मराठी वाचकांस एकवेळ आस्वादलुब्ध करून सोडल्यावर, त्याचा सांठा जों कमी झाला न झाला, तों नव्या संचयाच्या वरण्या भरूनही तयार झाल्या, व वाचनलोलुपांस त्या अल्प किंमतीस मिळावयाची उत्तम तजवीज झाली, हें "माले" च्या ज्या एकावर एक दोन दोन आवृत्ति नुकत्याच प्रसिद्ध झाल्या त्यांवरून उघड दिसून येतें. तसेंच, त्यांणीं धाडसानें जे उद्योग उपस्थित करून, मोठमोठ्यांसही क्षणभर तटस्थ करून सोडलें, ते उद्योग चांगले वाढीस लागले असून, पानांफुलांनीं डौरलेले, प्रस्तुतकाळीं आपलेसमोर उभे आहेत, आणि आपल्या मुग्ध वैभवगौरवानें व जोरदारपणानें भावी- विपुलफलसंपत्तीविषयीं लोभवीत आहेत. तर अशा प्रकारें ज्याचें नांव अल्पकाळांतच सर्वश्रुत झालें व अत्यंत प्रिय होऊन बसलें, त्या महापुरुषाची सविस्तर चरित्रकथा वाचावयाची उत्सुकता कोणास होणार नाहीं ? त्यांतून महाराष्ट्रीयांस तर ती अतिशय असणार आहे व याचें कोणास मोठेंसें नवलही वाटा-

वयास नको. मात्र ती पूर्ण व्हावयाचा योग आजपर्यंत आला नाहीं कसा हेंच मोठें नवल ! पण ही तर मोठ्या लज्जेची व खेदाचीच गोष्ट होय असें आह्मी समजतों.

आजपर्यंत कोणी लिहिलें नाहीं ह्मणून **विष्णुशास्त्र्यांचें** चरित्र लिहिण्यासारखेंच नाहीं असें अनुमान कोणासही करतां येणार नाहीं. बाकी अशा प्रकारचें वाक्पांडित्य केलेलें केव्हां केव्हां कानावर येतें ! आतां असें बोलणें कां ऐकूं येतें, **विष्णुशास्त्री** यांच्या ठिकाणीं काय काय गुण होते, त्यांनीं काय केलें इत्यादि पृच्छेचा विचार स्वतंत्र असून, त्याचा निर्णय करावयाचें येथें प्रयोजन नाहीं; याचा अंशतः निर्णय, त्यांचा थोडासा वृत्तांत लिहिण्याचा यत्न पुढें केला आहे त्यावरूनही होईल. तूर्त एवढेंच सांगावयाचें कीं, कोणाही थोर पुरुषाचें सविस्तर चरित्र लिहिण्याचा यत्न झाला नाहीं, एवढ्यावरून त्यांच्या चरित्राचें निरर्थकत्व कोणी स्थापित करील किंवा त्याच्या उज्ज्वल कीर्तिप्रदीपाकडे जाणून बुजून डोळेझांक करील, तर मोठाच प्रमाद होणार आहे. पहा कीं आपल्याइकडे मोठे उद्योगी, विचारशील, विद्वान् , सन्मान्य असे पुरुष अगदीं अलीकडे अलीकडे ह्मटलें तरी किती होऊन गेले ? व त्यांत **विष्णुशास्त्री** यांचे प्रतिपक्षीयांस पसंत पडतील असेही कांहीं सांपडतील कीं नाहीं ? नुसतें विद्वत्तेचें खातें घेतलें तरी **केरूनाना, सार्वजनिक काका, थोरले चिपळूणकर** ह्मणजे **कृष्णशास्त्री चिपळूणकर, डा० भाऊ दाजी, राव० मंडलीक, डा० सखाराम अर्जुन, माधवराव कुंटे** इत्यादि नांवें मनांत उभीं राहतात.

यांच्या सन्मान्यतेबद्दल तर कोणास शंका घेतां येणार नाहीं? मग यांपैकीं कितीकांचीं सविस्तर—निदान असावीं तशीं—चरित्रें तयार झालीं आहेत ? तीं कां झालीं नाहींत व कां होत नाहींत याचें उत्तर आपल्यास काय मिळेल ? आह्मांस तर असें वाटतें कीं या चरित्रलेखनाऽभावाचें कारण **विष्णुशास्त्री** यांची किंवा वरील पूज्य मूर्तींची चरित्रलेखनाऽपात्रता हें नव्हे—तर तीं लिहिण्याचें कोणीही अंगावर घेत नाहींत हें होय! चांगले विद्वान् असून, जे या कामाला योग्य आहेत, त्यांनीं ह्मटलें ह्मणजे आवडीनें इकडे लक्ष द्यावयाचें; पण त्यांच्याकडून या कामाची एकसारखी हयगय व हलगरजच होत आहे ही केवढी खेदाची गोष्ट आहे!

आणखी, **विष्णुशास्त्री** यांचे संबंधानें असेंही कदाचित् असेल कीं ते अलीकडले व अल्पवयस्क पडले यामुळें त्यांच्या विषयीं जितकें महत्व व जितका आदर वाटावा तितका कित्येकांस वाटत नसेल. १साधारणतः अलीकडच्या

१ एका विख्यात इंग्रेजी तत्ववेत्याचे विचार, थोड्या निराळ्या गोष्टीमध्यें काळाच्या माहात्म्यासंबंधानें एथें लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. नवीन शोधांविषयीं लोकांच्या साशंकतेसंबंधानें तो ह्मणतो.—

"Another error induced by the former ( *i. e.* too much reverence to antiquity ) is a distrust that any thing should be now to be found out, which the world should have missed and passed over so long time; that, as if the same objection were to be made to time, that Lucian maketh to Jupiter and other of the heathen gods; of which he wondereth that they begot so many children in old time and none in his time ; and asketh whether they were become septuagenary , or whether the law *Papia*, made against old men's marriages, had restrained them."

Bacon, *Advancement of learning Book I, 5.*

काळाविषयीं जनांची समजूत बरीशी नसते. मागला काळ उत्तम; मागले पुरुष थोर, मागल्या चाली चांगल्या, मागल्या वस्तु रम्य असें त्यांच्या मनानें घेतलेलें असतें, व त्याच मानानें अलीकडील सर्वच कांहीं वाईट, क्षुद्र व दोषमय असें त्यांस दिसतें. सारांश आपल्या मागें होऊन गेलेल्या लहान मोठ्या गोष्टींविषयीं स्वाभाविक त्यांस जितका आदर व जितकें प्रेम वाटतें तितकेंच विद्यमान व भावी काळाविषयीं त्यांचें मन साशंक असतें. अलीकडील काळाविषयीं त्यांस ह्मणण्यासारखें कांहींच महत्व वाटूं नये व ह्मणून त्यांच्याकडून याची बूजही कांहीं राहूं नये अशी सरासरी स्थिति असते. शास्त्रीबोवांच्या कीर्तीस या समजुतीचा झटका लागला नसेलसें ह्मणवत नाहीं.

अलीकडील मंडळीविषयीं जे कित्येक फुटकळ चरित्रलेख प्रसिद्ध झाले आहेत, त्यांपैकीं थोरले चिपळूणकर यांचा चरित्रविषयक लेख पुष्कळांचे वाचण्यांत आला असेल. त्यांत—

> शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे।
> साधवो न हि सर्वत्र चंदनं न वने वने॥

असें शिरोऽवतरण केलें आहे तेंही या वरील समजुती-

---

१ याचा लेखी दाखला पाहिजे असल्यास, "बालबोधा"त शास्त्रीबोवांचें जें संकलित वृत्त आलें आहे, त्यांतून पुढें (   ) पानावर आह्मी उतारा घेतला आहे त्यावरून मिळेल.

चेंच एक उदाहरण आहे असें ह्मटल्यास चिंता नाहीं. चरित्रलेखकाची भावना कीं आपल्या चरित्रनायकासारखे साधुजन सर्वत्र सर्वकाळींही फार दुर्मिळ होत–निदान ह्लींच्यासारख्या निकृष्ट काळीं तरी नांव घेण्यासारखे कोणी नाहींत! अर्थात् ही केवळ गैरसमज होय; यांत अलंकारिक भाषणापेक्षां अधिक तथ्यांश आहे असें दिसत नाहीं. साधुजनांचा उदय होणें ही गोष्ट एका विवाक्षित काळाला किंवा स्थळाला खिळलेली आहे असें नाहींच नाहीं. रत्नांची समृद्धि असतांही त्यांचे पारखी न मिळाल्यामुळें, त्यांच्या अभावाविषयीं हाकाटी व्हावी, किंवा एखादें कोणी बाहेर काढलेंच तर त्याची दसपट किंमत सांगावी यांत मोठेंसें नवल नाहीं. माणकें काय, मोत्यें काय, चंदन काय या मौल्यवान वस्तूंचा एवढा खप हजारों वर्षांपासून आमच्या देशांतून चालू असतां, त्यांच्या संचयाला उणेपणा आल्याचें दिसून येत नाहीं, एवढेंच नाहीं पण आधुनिक शास्त्रपद्धतीच्या बळानें, त्यांचा पुरवठा उलटा जास्त होऊं लागला आहे; याबद्दल सृष्टिदेवीच्या कृपेनें आह्मास इतर देशांचा किंवा प्राचीनकाळाचा हेवा करण्याचें जसें प्रयोजन नाहीं, त्याचप्रमाणें गुणिजनांच्या व साधुजनांच्या उदयासंबंधानेंही आमच्या देशावर ईश्वराची

---

१ हा लेख "विविधज्ञानविस्तारा" त आरंभीं प्रसिद्ध झालेला, मागून "आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी" नांवाच्या निर्णयसागर छापखान्यांत छापलेल्या स्वतंत्र ग्रंथांत घातला आहे.

वक्रदृष्टि आहे असें ह्मणावयास आमचें मन धजत नाहीं. आमच्या देशाच्या राज्यकारणी व सामाजिक स्थितीचा जो कोणी क्षणभर विचार करील आणि कार्यकारणभावानें घडणाऱ्या गोष्टींच्या ओघाकडे लक्ष देईल, त्यास असें दिसून येईल कीं पूर्वींपेक्षां प्रस्तुतकाळ व पुढीलकाळ हेच आमच्या देशांत साधुजनांच्या उद्याला विशेष अनुकूळ आहेत; आणि हल्लींच्यापेक्षांही हा साधुजनांचा मोठा तांडा दिवसेंदिवस वाढतच जाईल असा भरंवसा आहे. मात्र त्यांचा यथायोग्य परामर्श घ्यावयास व त्यांच्या गुणांचें चीज करावयास, आमच्या समंजस व गुणज्ञ मंडळीनें कंबर बांधली पाहिजे. एरवीं, रत्नपारख्यांच्या अभावानें व अज्ञानानें उत्तम उत्तम रत्नें सुद्धां धुळींत गडप होऊन, त्यांचा पुढें मागमूसही राहणार नाहीं; त्यांचा उपयोग त्यांच्याच पुढील पिढीस, सरासरी गारगोट्यांपेक्षांही कमी झाला असें होईल!

खरें पाहतां, मोठमोठ्या गहन ऐतिहासिक ग्रंथांपेक्षां चरित्रें लिहिण्याचें काम बरेंच सोपें आहे. आणि असें असूनही, त्यांच्या वाचनापासून मनोरंजनचें मनोरंजन होऊन, व्यवहारज्ञपणा वाढतो. या दृष्टीनें, त्यांचा उपयोग इतिहास ग्रंथांपेक्षांही कांकणभर जास्त आहे असें ह्मटलें असतां चालेल. पण हा उपयोग मराठी वाचकांच्या ध्यानांत आला आहे, किंवा आणण्याचा यत्न झाला आहे असें दिसत नाहीं. त्यांच्या रुचीची सगळी धाव पहावी तों वरीं वाईट नाटकें, कादंबऱ्या वगैरे पुस्तकांकडेच फार आहे. अलीकडे मराठींत सदर पुस्तकांची

जशी गर्दी होत चालली आहे तशी चरित्रग्रंथांची होऊन, त्यांच्या वाचनाकडे जर लोकांचें लक्ष लागेल तर केवढा फायदा होणार आहे! पण मराठींत चांगलेसे चरित्रग्रंथ आहेत कोठें? जे थोडे आहेत, त्यांत जुन्या काळच्या व परकी देशच्या राजांचा व तरवारबहादरांचाच बहुतेक भरणा आहे. जीं एतद्देशीय ऐतिहासिक पुरुषांचीं दोन चार चरित्रें आहेत तेवढीं खेरीज करून, बाकीचीं मराठी वाचकांस एवढीं मनोवेधक व प्रिय कधीं होणार नाहींत. आतां आमच्या अलीकडल्या मंडळीकडे यावें तर तिची काय अवस्था आहे ती वर सांगितलीच आहे. त्यांच्या मरणकालीं वर्तमानपत्रांतून वगैरे जो फुटकळ मजकूर आला असेल तेवढाच; याच्या पलीकडे थोड्यांचीच मजल गेली आहे! * शेवटीं पुनः एवढेंच सांगावयाचें कीं इतिहासप्रसिद्ध पुरुषांचीं नांवें ठळक ठळक दिसून जशीं सकृद्दर्शनींच डोळ्यांत भरतात, तशीं आपल्यांतील आधुनिक थेंडांचीं कदाचित् भरणार नाहींत हें खरें; तथापि हीं थेंडें आमच्या भावी समाजरचनेच्या इमारतीला हेतुभूत असल्यामुळें व त्यांचा संबंध पुढील पिढीशीं विशेष निकट असल्यामुळें, त्यांच्या

---

* एथें सौ० काशीबाई कानिटकर यांनीं लिहिलेल्या "डा० आनंदीबाईच्या चरित्रा" चा उल्लेख केल्याशिवाय राहवत नाहीं. सदर पुस्तक उपयुक्त व मनोरंजक असून चरित्रनायिकेची व ग्रंथकर्त्रीची अशी दोघींची कीर्ति उज्वल राखण्यास कारण होईल असें वाटतें. एथें आमच्या स्त्रीवर्गाचें पाऊल आमच्यापुढें आहे असें म्हणणें प्राप्त आहे.

चरित्रकथांचें महत्व विशेष आहे असें आह्मांस वाटतें. यास्तव वरील घेंडांस अझून फार काळ लोटला नाहीं तोंच त्यांच्या उद्धाराची तजवीज लागली तर उपयोग; नाहीं तर, मागाहून पस्तावा पावण्याशिवाय दुसरा कोणताच मार्ग उरणार नाहीं !

वरील विवेचनावरून लक्षांत येईल कीं विष्णुशास्त्री यांचें चरित्र कां लिहिलें गेलें नाहीं याचें कारण, ज्यांनीं तें लिहावें त्यांचा आळस, हलगरज व हयगय इतकेंच, यापलीकडे कांहीं नाहीं. चालू वहिवाटीस अनुसरून इतरांप्रमाणें यांचें चरित्र, लिहिण्याचेंही मागें पडत चाललें आहे, झालें. एथें एवढेंच ह्मणावयाचें कीं शास्त्री-

---

१ चरित्रलेखनाच्या संबंधानें आपली हल्लींची स्थिति थेट दोनशें वर्षांपूर्वींच्या इंग्लंडांतील स्थितीसारखीच आहे. त्याबद्दल लार्ड बेकनचें असें म्हणणें आहे.--

For lives, I do find strange that these times have so little esteemed the virtues of the times, as that the writing of lives should be no more frequent. For although there be not many sorvereign princes or absolute commanders, and that states are most collected into monarchies, yet are there many worthy personages that deserve better than dispersed reports and barren elagies "

*Advancement of Learning*——*Book II, 2.*

चरित्रांची योग्यता त्यानें येणेंप्रमाणें वर्णिली आहे:—

" But lives, if they be well written, propounding to themselves a person to represent, in whom actions both greater and smaller, public and private, have a commixture, must of necessity contain a more true, native and lively representation. "——*Ibid.*

बा. नं. १०१

**बोवांच्या** पूर्वीं होऊन गेलेल्या ग्रस्थांची वास्तपुस्त जशी कोणीच घेतली नाहीं, तसा प्रकार मात्र येथें न व्हावा. तथापि अशी भीति धरावयाचें कारण आहे असें वाटत नाहीं. कारण एक तर महाराष्ट्रांत **विष्णुशास्त्री** यांचे चाहते आजकाळ थोडेथोडके आहेत असें नाहीं. शिवाय, त्यांच्याबरोबर वाढलेली त्यांची सहाध्यायी व सहोद्योगी स्नेही मंडळीही पुष्कळ असून, विद्वान् आहेत. तसाच, त्यांच्या हाताखालीं शिकून तयार झालेला शिष्यपरिवार मोठा असून, त्यांपैकीं पुष्कळजण आतां चांगले व्यवहारस्वतंत्र व विद्वान् झाले असतील. तर एवढ्या थोरल्या समुदायांतून कोणीही त्यांचें चरित्र लिहिण्याचें हातीं घेतलें तरी हौशीनें सहज होऊन जाईल. कदाचित् या गोष्टीस इतका गेला तसा आणखीही कांहीं काळ लोटावा लागेल, पण असा योग आज नाहीं, कधीं तरी खचित येईल असा आह्मास भरंवसा आहे, तो परमेश्वरानें पूर्ण करावा अशी त्यासच प्रार्थना आहे.

आरंभीं हेतु होता त्याहून वरील उपोद्घात बराच लांबला, तरी विषयाचें महत्व पाहतां इतकें लिहिणें अवश्यच होतें असें बहुधा वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. आतां मनांत जो उद्देश धरून वरील लेख लिहिण्यास सवड मिळाली, त्याकडे वळूं. **शास्त्रीबोवांचे** "संस्कृत कविपंचका" वरील निबंध प्रसिद्धच आहेत; त्यांची नवी आवृत्ति काढावयाची तजवीज होऊन त्याच्या आरंभीं **शास्त्रीबोवांचें** चरित्र व त्यांच्या लेखांचें साधारण स्वरूप यांवर एक लहानसा निबंध जोडावा व वाचकां-

स त्यांची थोडक्यांत माहिती करून द्यावी असें मनांत आलें. अर्थात् पुढील लेख स्वतंत्र लिहिण्याचा हेतु नसल्याकारणानें यांत आलेलें चरित्र संक्षिप्तच झालें आहे. शिवाय तें लिहितांना त्वरेमुळें व माहिती मिळविण्याचीं साधनें पुरेशीं नसल्यामुळें, ती जितकी मिळविणें अवश्य होतें तितकी मिळाली नाहीं हें एथें निष्कपटपणें कळविणें अवश्य वाटतें. आतां, "संस्कृत कविपंचका"ला जोडण्याचा मूळचा बेत जरी कांहीं कारणास्तव रहित झाला, व हा लेख ह्मणजे जरी असावा तसा विस्तृत व परिपूर्ण आहे असें नाहीं तरी अशा एखाद्या ग्रंथाच्या अभावीं प्रस्तुत लेख उपयोगीं पडेल असें जाणून तो लोकसेवेस सादर केला आहे. शिवाय तो मुख्यतः विरूपणात्मकच असल्या कारणानें, शास्त्रीबोवांच्या चरित्राचें व लेखांचें साधारण स्वरूप समजण्याला व त्यापासून आपल्यास होण्यासारखे फायदे करून घेण्याकडे प्रवृत्ति होण्याला तो साधनीभूत होईल अशी आशा आहे.

**पुणें** ह्मणजे सर्व महाराष्ट्राची राजधानी. या ठिकाणीं पेशव्यांचें वास्तव्य झाल्या दिवसापासून, या शहराचा व त्याबरोबर महाराष्ट्रांतील गुणिजनांचा ऊर्जितकाळ व्हावयास आरंभ झाला. ज्यांच्या अंगांत कांहीं गुण असे—कांहीं तरी करामत असे, त्या सर्वांचे डोळे साधारणतः **पुण्या**कडे लागत, व तेथें त्यांच्या गुणांचें चीज होऊन, आश्रय मिळे. यामुळें महाराष्ट्रांतील व इतर दूरदूरच्याही ठिकाणांहून सर्वप्रकारचे गुणवान् लोक तेथें येऊन राहिले; त्यांतही पेशव्यांचें लक्ष विद्येकडे विशेष,

यामुळें विद्वानांचा भरणा अधिकच. अशा प्रकारें कांहीं काळपावेतों हें शहर ह्मणजे गुणिजनांचें माहेरघर होऊन बसलें होतें. हल्लीं राजाश्रयाचा जरी सर्वस्वी लोप झाला आहे, तरी या शहराची पूर्वीची कीर्ति नष्ट झाली आहे असें नाहीं. पेशव्यांच्या हातानें अनेकप्रकारें खत पडून व मालमशागत होऊन जी **पुण्यभूमिका** तयार झाली तिचा कस अझूनही पहिल्या सारखाच कायम आहे. विद्वत्तेच्या, कलाकौशल्याच्या, राज्यकारभाराच्या, सुधारणेच्या-कोणत्याही कामांत **पुण्या**चा वरपगडा आहे हें सर्वांस विदितच आहे. या नामांकित शहरांत, इ० स० १८५० सालीं **के० विष्णुशास्त्री चिपळूणकर** यांचें जन्म झालें. हे **पुण्यांत**च लहानाचे मोठे झाले; व मध्यंतरीं कांहीं थोडा काळ खेरीज करून, त्यांचें सगळें आयुष्यही येथेंच गेलें **पुण्याच्या** हवापाण्याचा[१] कांहींच परिणाम यांचे मनावर झाला नसेल असें ह्मणवत नाहीं.

**चिपळूणकरांच्या** घराण्याची मूळची गरीब स्थिति. परंतु **विष्णुशास्त्र्यांचे** वडील **कृष्णशास्त्री** यांनीं

---

१ या हवापाण्याची विष्णुशास्त्री वारंवार तारीफ करीत. ते म्हणत, पेशव्यांनीं सुंदर जागा पाहून तेथें पुणें शहर वसविलें व नानाफडनविसांनीं सदाशिवपेठच्या हौदांत सुंदर पाणी आणून सोडलें. असें शास्त्रीबोवांच्या कंपूंतल्या एका मित्रानें एथें सुचविलें आहे. पुण्याची नैसर्गिक स्थिति अशी आहे खरी, तरी राज्यकारणी व सामाजिक प्रकरणी गोष्टींत त्या शहराचा आमचे लोकांस कांहीं निराळ्या प्रकारचा उपयोग आहे, व त्याचाच वर मुख्यतः उल्लेख आहे.

चांगलें दैव काढलें. पेशवाई बुडाल्यावर अव्वल इंग्रेजींत जे बुद्धिमान् पुरुष उदयास आले, त्यांच्यांत कृष्णशास्त्री हे अग्रगण्य होऊन गेले. त्यांची बुद्धि कांहीं लोकोत्तर होती अशी त्यांचेविषयीं आख्या आहे. त्यांनीं प्रथम थोडीशी वेदविद्या शिकून, नंतर विश्रामबागेंत नवीन स्थापन झालेल्या पाठशाळेंत न्याय व व्याकरण यांत पारंगतता संपादिली. त्या वेळच्या विद्वन्मंडळांत गाजलेले जे मोरशास्त्री साठे हे त्यांचे गुरु होत. आपल्या विद्यार्थ्याची कुशाग्र बुद्धि पाहून, मोरशास्त्री त्यांस "बृहस्पति" असें ह्मणत असत. अशा बुद्धिमान पुरुषाचे चिरंजीव विष्णुशास्त्री. लेकही वडिलांस शोभसेच निघाले यांचे दुसरे चिरंजीव लक्ष्मणराव हेही विद्वान् असून हल्लीं मानमान्यतेच्या नोकरीवर आहेत. क्षीराब्धी पासून रत्नें व्हावीं हा त्याचा गुणच आहे. आणखी असेंही ह्मटलें आहे—

आकरे पद्मरागाणां जन्म काचमणेः कुतः ।

असो; वडील शास्त्रीबोवा यांनीं लौकरच इंग्रेजीचा अभ्यास करून, सरकारी शाळाखात्यांत नोकरी धरली. तेव्हांपासून त्यांची घरची स्थिति बरी झाली. त्यांनीं आपल्या उभयतां चिरंजीवांस शिक्षण देण्यांत व विद्याभ्यास करविण्यांत अगदीं व्यत्यय येऊं दिला नाहीं. तथापि इतकें सांगणें अवश्य वाटतें कीं कृष्णशास्त्री इतके विद्वान् असतां व ट्रेनिंग स्कुलांत त्यांचा शिकविण्याची ख्याति असतां, मुलांच्या विद्याभ्यासास त्यांचा तादृश कांहींच उपयोग झाला

नाहीं. ते एकाही मुलाला कधीं शिकविण्यास जवळ घेऊन बसले नाहींत किंवा आपल्या नजरेखालीं कसोशीनें अभ्यास करविला नाही. हा दोष त्या वेळच्या केरुनाना वगैरे मंडळीमध्यें साधारण होता हें खरें; तथापि एवढ्यानें त्याची अदोषता सिद्ध झाली असें होत नाहीं [1] असो; तथापि मुलें काय लिहितात काय नाहीं इकडे वडील शास्त्रीबोवांचें हमेश लक्ष असे. अभ्यासाला ज्या ज्या सोई पाहिजेत त्यांचा त्यांस स्वतः अनुभव असल्यामुळें, मुलांस त्यांणीं कोणत्याही गोष्टींचा उणेपणा ठेविला नाहीं. एकदा अशी गोष्ट झाली ह्मणून सांगतात कीं लहानपणीं विष्णूस वडिलांनीं विचारलें. "कायरे, तुझा वर्गांत कितवा नंबर आहे?" तेव्हां तो बराच खालीं आहे असें आढळून आलें व त्याचें कारण काय ह्मणून विचारतां, घरांतून जेवणास उशीर झाल्यामूळें मुलास वेळच्या वेळीं शाळेंत जातां आलें नाहीं असें कळलें. त्याबरोबर घरांत त्यांणीं ताकीद फिरविली कीं

---

१ हिंदुस्थानाचा इतिहास लिहिणारा प्रख्यात जेम्स स्टूवर्ट मिल याची एथें आठवण झाल्याशिवाय राहणार नाहीं. यानें आपल्या मुलाला, शाळेचें दर्शन मुळींच न होऊं देतां, आपल्या नजरेखालीं, घरींच पढविलें. हा हिंदुस्थानाचा इतिहास रचण्यांत बारा वर्षे गुंतला होता व तेव्हां आपण त्यास अभ्यासांतील प्रश्न विचारविचारून त्रास देत असूं असें चिरंजीव स्वचरित्रांत सांगतात. हे चिरंजीव म्हणजे जान स्टूवर्ट मिल्ल, हे पुढें तर्कशास्त्राचे व अर्थशास्त्राचे प्रणेते झाले!

" यापुढें वेळेवर मुलांच्या जेवायाची तजवीज न झाली तर बाहेर दुसरी सोय पहावी लागेल." तेव्हांपासून उशिराचें मिनिट!

**विष्णुशास्त्री** यांच्या शिक्षणास आरंभ एका गांवठी शाळेंत झाला. ही शाळा **हरिपंत लंगडे** यांच्या नांवानें प्रसिद्ध होती. नंतर दुसऱ्या एका खासगी शाळेंत इंग्रेजीच्या दोन तीन बुकांपर्यंत शिकणें होऊन त्यांस सरकारी हायस्कुलांत घातलें. लहानपणापासून लिहिण्यावाचण्याकडे त्यांच्या मनाचा ओढा जास्त असे. तशीच त्यांची बुद्धि व धारणाशक्ति उत्तम होती. ते मन लावून अभ्यास करीत ह्मणून "अभ्याशी" अशी हैस्कुलांत त्यांची ख्याति होती. पहिल्यापासून त्यांचा गरीब स्वभाव; नाचरा, गडबड्या, किंवा जवळपासच्या लोकांस भंडावून सोडणारा असा कधींच नव्हता. जें काम करावयाचें तें चांगलें लक्ष देऊन नीटनेटकें करण्याची त्यांची रीत असे. त्यांस बोलावयास फारसें नको असे, व एकंदर चालचलणूक जराशी थिबिस्त व थंडच असे. यामुळें मुलगा एकाएकीं कोणाच्याही मनांत भरण्यासारखा नव्हता. तथापि त्यांच्यापासून त्रास पडत असल्याकारणानें, कोणासही त्यांचा कंटाळा येत नसे. असें ह्मणतात, यांच्यापेक्षां स्वतः थोरले शास्त्रीबोवांची मर्जी आपल्या धाकटे भावावर व धाकटे भावाच्या मुलांवर जास्त असे. परंतु ज्या गरीब व थंड स्वभावामुळें लोकांचें लक्ष त्यांजकडे लागत नसे, त्याच स्वभावामुळें स्वतः त्यांचें लक्ष विद्येकडे जास्त लागलें. शाळेंत पाय ठेवल्या दिवसापासून, धड्यावरून त्यांनीं पंतोजीचें

कधीं हूं ह्मणून घेतलें नाहीं. त्यांनीं सगळे धडे मुखोद्गत करावे, आणि वर्गांत स्वस्थ बसून गुरुजीच्या सांगण्याकडे लक्ष देत असावें. त्यांस वाचतां येऊं लागल्यापासून शाळेंतले धडे झाल्यावर जो वेळ उरे, त्यांत मराठी भाषेंत, जीं तेव्हां नुकतींच गोष्टींचीं, नाटकांचीं कादंबऱ्यांचीं व इतर पुस्तकें प्रसिद्ध होऊं लागलीं होतीं, तीं वाचावीं. ते मोठे जबर वाचणारे होते; वाचण्याचा कंटाळा त्यांस कधींही येऊं नये. जोंपर्यंत पुस्तक वाचावयाचें शिल्लक आहे तोंपर्यंत त्यांस दुसऱ्या गोष्टी अगदीं सुचूं नयेत. त्यांच्या बरोबरीचे सोबती एक गृहस्थ असें सांगतात कीं, यावरून आह्मी त्यांस वारंवार डोसळून व चिडवून त्रास देत असूं; पण त्यांनीं कधींही आमचा कंटाळा केला नाहीं, किंवा त्रास मानला नाहीं. आणि इतकाही त्रास झाला तरी तो सोसून ते आपला वाचण्याचा क्रम सोडीत नसत तो नसतच.

इ० स० १८६५ त ते प्रवेशपरीक्षेंत पसार झाले व पुढें "दक्षिणविद्यालयांत" अभ्यासासाठीं गेले. येथें अभ्यास चालला असतांही, त्यांचे लहानपणचे सर्व विशेष कायमच होते. मात्र आतां त्यांच्या ज्ञानसाधनांची मर्यादा वाढली व त्याबरोबर त्यांचा वाचण्याचा झपाटाही वाढला. तथापि त्यांची बुद्धि एवढी उत्तम असतां, इतर विद्यार्थ्यांचें किंवा गुरूचें लक्ष वेधण्याजोगें असें त्यांच्या कालेजमधल्या आयुष्यक्रमांत कांहींच दृष्टोत्पत्तीस आलें नाहीं. कालेजचें किंवा विद्वत्परिषदेचें एखादें बक्षिस त्यांनीं मिळविलें नाहीं, किंवा "काळक्षेप" ही (स्का-

लर्शिप) मिळविला नाहीं; एवढेंच काय, पण त्याबद्दल कधीं प्रयत्नही केला नाहीं. तसेंच वर्गांत अभ्यासासाठीं नेमलेल्या निबंधादिकांतही त्यांच्या बुद्धीचें तेज एवढें झळकलें नाहीं. एकदा मात्र कालेजांतला एक 'काळ-क्षेप' त्यांच्या वाटणीस आला होता असें समजतें. याशिवाय विशेष नांव घेण्यासारखी गोष्ट कानावर येत नाहीं. यावरून, त्यांच्या विशाळ बुद्धीचें जें तेज पुढें अनेक रूपानें दृष्टोत्पत्तीस आलें तें तेज या वेळीं केवळ गूढ रूपानें होतें असें ह्मटलें पाहिजे. दशरथ राजाविषयीं कालीदासानें ह्मटलें आहेः—

> अतिष्ठत् प्रत्ययाऽऽक्षेपसंततिः स चिरं नृपः ।
> प्राङ्मंथादनभिव्यक्त रत्नोत्पत्तिरिवार्णवः ॥
>
> रघुवंश,१०.

मंथन करण्याच्या पूर्वीं समुद्रापासून एवढीं रत्नें निघतील असें कोणासही वाटलें नव्हतें, त्याप्रमाणें विद्यार्थिदशेंत असतां **विष्णुशास्त्री** यांच्या बुद्धिवैभवाचीही आरंभी कोणास अटकळ झाली नाहीं! खवळण्याच्या पूर्वीं संथ असणाऱ्या समुद्राप्रमाणें त्यांची बुद्धि शांत होती, परंतु जगांतील व्यवहाराचा घर्षणसंस्कार घडतांच तिच्या गुणांचा विकास सहजच होऊं लागला.

प्रवेश परीक्षा पसार होऊन नवीनच कालेजांत शिशिरलें ह्मणजे विद्यार्थ्यांस थोडें शेफारल्यासारखें होतें व त्यांस नानाप्रकारचे नाद लागतात. **विष्णुशास्त्री** यांचा स्वभाव सुस्त व विचारशील असल्यामुळें, वाचण्या पुढें अशा नादांकडे त्यांचे लक्षच गेलें नाहीं. ते विद्यार्थ्यांच्या कोणत्याही खटपटींत कधीं पडले

नाहींत; व पुष्कळसे सोबती मिळवून, गप्पा मारीत बसण्याचें किंवा एकसारखा धुडकूस व धिंगाणा घालण्याचें त्यांच्या स्वभावाला अगदीं आवडलें नाहीं; यामुळें त्यांचा स्वभाव एकलकोंडा आहे असें सर्वांस वाटे. कोठेंही गेले तरी सभाधीटपणानें पुढें येणें त्यांस बरें वाटत नसे. जेथें चार लोक मिळावयाचे अशा ठिकाणीं त्यांची आवडीची बैठकीची जागा ह्मटली ह्मणजे एखादा कोंपरा. तेथून, चाललेल्या सर्व प्रकाराकडे लक्ष ठेवावें व त्य चें परिशीलन करावें. त्यांची कालेजांतील साहाध्यायी मंडळी सरासरी असें समजत असे कीं, हा एक खटपटींत न पडणारा, नादिष्ट, मंद, कांहीं तरी विचारांत गढलेला असा कोणी साधारण योग्यतेचा मनुष्य आहे. नाहीं ह्मणायला एकदा मात्र ते एका नाटकाच्या खटपटींत शिरले होते असें सांगतात. त्यांच्या वेळीं बी. ए. ची पदवी मिळविण्यास दोनच परीक्षा असत, यामुळें विद्यार्थ्यांस अवांतर विषयांकडे लक्ष देण्यास बरीच फुरसद मिळे व ज्ञान आणि विश्रांति मिळून, पुनः करमणूकची करमणूक व्हावी ह्मणून विद्यार्थीजन एखादा संस्कृत नाटकाचा रंगभूमीवर प्रयोग करीत असत. या समयीं मुंबईच्या एल्फिन्स्टन कालेजांतील विद्यार्थ्यांषी व दक्षिण विद्यालयांतील विद्यार्थ्यांची झटापट होत असे; दोहों पक्षांचे विद्यार्थ्यांस आपली सरशी करून कालेजाचें नांव राखण्याची मोठी ईर्षा वाटून बहार उडत असे. एके वर्षी वेणीसंहार नाटकाचा प्रयोग करण्याचें सर्वांच्या अनुमतें ठरलें. त्यांत विष्णुशास्त्री, यांणीं धर्मराजाची भूमिका घेतली.

ह्या पात्राचें काम शोकरसाचें असून, त्यांच्या विचारशील आणि शांत स्वभावाला साजेसें होतें, व तें त्यांणीं चांगलेंच बजावलें असें सांगतात. त्या वेळेस त्यांचे वडील समोर बसले होते व त्यांच्यासमक्ष निर्भिडपणें यांनीं नर्पण केलें !

शास्त्रीबोवांस पाहिलेली मंडळी पुष्कळ आहे. तेव्हां त्यांच्या शरीरसंस्थानाविषयीं विशेष सांगावयास नको. त्यांचा तो बाबर ओठ, थंड व स्तिमित दृष्टि, स्थिर व मोठ्या भोवया, काळा व धिप्पाड चेहरा, विचारी व मंद चालचलणूक, इत्यादि चिन्हावरून पाहणाराच्या मनाचा ग्रह मोठासा अनुकूळ होत नसे. निबंधमालेचे कर्ते ह्मणजे हे असतील व ह्या डोक्यांतून एवढे तीव्र मार्मिक आणि गंभीर लेख निघत असतील असा तर्क, नुसत्या त्यांच्या तोंडावळ्यावरून, ते चांगले प्रख्यातीला आल्यावर ही कोणास होण्या सारखा नव्हता. तथापि ते कालेजामध्यें असतांच, त्यांच्या विषयीं एक भविष्य सांगण्यांत आलें होतें. जर्मनी देशांतील एक प्रोफेसर गृहस्थ, डा० कीलहार्न यांच्या ओळखीचे, त्यांच्या बरोबर दक्षिण कालेज पाहण्यासाठीं एकदा आले होते. तेव्हां त्यांनीं सर्व विद्यार्थ्यांचीं डोकीं तपासलीं. आणि विष्णुशास्त्री यांच्या डोक्याच्या मोठेपणावरून व बाहेरच्या ठेवणीवरून वगैरे, " हा मनुष्य विद्वान, थोर व कीर्तिवान होईल " असें भाकित केलें. हें भाकित तेव्हां कोणी फारसें लक्षांत घेतलें नाहीं; तरी तें अखेर कितपत खरें झालें हें सांगणें प्रस्तुत काळीं फारसें कठिण नाहीं !

त्यांची बी. ए. ची परिक्षा इ० स० १८७२ त उतरली. प्रवेश परीक्षेंत त्यांची दुसरी भाषा मराठी होती, परंतु पुढें बी. ए च्या वेळीं त्यांणीं संस्कृताची तयारी केली. त्यांचे इष्ट विषय इतिहास, अर्थशास्त्र, तर्कशास्त्र, आणि नीतिशास्त्र असे होते. तथापि त्यांस भाषाविषयाची गोडी फार असे. त्यांचा गणिताकडे भर फार कमी होता व त्यामुळें वाजवी लागावीं त्यापेक्षां जास्त वर्षें त्यांस कालेजांत काढावीं लागलीं. परंतु ही परीक्षा उतरतांच, जगांतील व्यवहारांत पडण्यास व लोककल्याणाच्या कार्यार्थ व मराठीभाषेच्या उद्धारार्थ " विद्यापीठरूप महानीडांतून पांख फुटून भरारी मारण्यास " ते मोकळे झाले.

कालेजांत असतांना, शास्त्रीबोवांची हुशारी ह्मणण्यासारखी दिसून आली नाहीं हें वर सांगितलेंच आहे; व पदवी मिळविण्यासही वाजवीपेक्षां दुप्पट काळ त्यांस वाट पाहावी लागली, हें ही खरें; तथापि हा त्यांचा काळ कसा गेला इकडे थोडें लक्ष देणें आवश्यक आहे. हा काळ त्यांनीं रिकामपणांत किंवा वेडगळ खेळांत घालविला नाहीं कालेजच्या अभ्यासाशिवाय, विशेष इष्ट असा दुसरा मोठ्या महत्वाचा व खऱ्या उपयोगाचा त्यांचा अभ्यास झपाट्यानें चालू होता. ज्या विद्यारण्यांतील वृक्षलतांच्या पुष्पपल्लवांनीं त्यांचें चित्त वेधलें व जेथें यावज्जन्म रममाण होण्याचा त्यांचा संकल्प झाला, त्या विद्यारण्यांत संचार करीत असतां ,वाटेनें जीं विद्यामंदिरें त्यांस लागलीं त्यांत शिरून ते आंतील शोभा पाहूं लागले व ज्ञानप्राप्तीच्या मार्गाची बरी-

शी माहिती झाल्या बरोबर ते स्वतःच सहल करूं लागले; केवळ गुरूजीच्या 'बांधलेल्या शिदोरीवर' अवलंबून राहण्याची त्यांनीं अपेक्षा धरली नाहीं.

पहिल्यानें इंग्रजी ज्ञानभांडागारांत त्यांनीं प्रवेश केला. तों तेथें त्यांस अनेक पोतीं निरनिराळ्या मालानें गच्च भरलेलीं दृष्टीस पडलीं. मग काय विचारतां? शास्त्रीबोवांसारख्या चौकस, व रसिक मनुष्याचा आंतून कशाला लौकर पाय निघतो आहे? अर्थात् जातां येतां यांतला कांहीं मासला घे, त्यांतला थोडा घे, असें करीत करीत व तो संस्कृतांतील व मराठी भाषेंतील मालाशीं सरखावून पाहात पाहात ते हळु हळू चालले. याप्रमाणें परीक्षा पसार होऊन, कालेज सोडण्याचा समय येत आहे तों बराच मोठा बोजा त्यांजपाशीं झाला असें त्यांस आढळून आलें. या वेळीं संस्कृत भाषेस विद्वत्परिषदेमध्यें नुकतेंच स्थान मिळालें होतें, त्यामुळें गीर्वाणभाषामंदिरांतही अनायासें प्रवेश होऊन तेथचा शोभिवंत पदार्थसंग्रह त्यांस प्रत्यक्ष डोळ्यांनीं पहावयास सांपडला. या ठिकाणची शोभा कांहीं अवर्णनीयच भासली! एक मोठा भव्य जुनाट वाडा त्यांच्या दृष्टीस पडला. आंत गेले तो चहोंकडे दिव्य ज्ञानप्रकाशाचा लखलखाट असून, सर्व प्रकार रेखल्याप्रमाणें टकटकीत दिसत आहे, असें त्यांनीं पाहिलें व प्राचीन आर्यबुद्धिवैभवाचें कौतुक वाटून, त्यांचे डोळे अगदीं भरून गेले! एका चौसोपींत सर्वत्र वेदी मांडल्या असून, होमकुंडें पेटविलीं आहेत, आणि वैदिकांच्या वेदघोषाची व वषट्काराची एकच गर्दी चालली आहे; दुसरींत व्यासपीठांवरून एकेक महंत बसले

असून मार व्याकरणाची, न्यायाची व वेदांताची घटपटादि खटपट करून पटपट चालविली आहे; तिसरींत पहावें तर दोघे वयोवृद्ध ऋषीश्वर आपल्या निर्मळ मधुर वाणीनें भाषण करीत आहेत व त्यांच्या सभोंवतीं टक लावून पाहणारा भाविक श्रोतृवृंद वारंवार माना डोलवित आहे; चौथी चौसोपी ही समोर तोंडाशींच असल्यामुळें, प्रवेशाला अगदीं सोपी तर खरी, पण एथून लौकर सुटका होणें फारच कठिण! एथच्या आंतील नकासगिरीची व एकंदर शिल्पनैपुण्याची तारीफ कोठवर करावी! जिकडे तिकडे सुंदर मऊ मऊ गालिचे पसरले आहेत; अनेक आकाराचे रत्नदीपक एकाशीं एक लटकून गेले आहेत; कोठें वाद्यांचा व नूपुरांचा मृदु ध्वनि, कोठें अत्तरांचा मधुर परिमल; कोठें तयार केलेल्या पुष्पशय्या; व कोठें कादंबरीचे सुवर्णकलश मांडले असून त्यांवर लहान लहान मणिमय चपक ठेविले आहेत; अशा प्रकारचा या चौसोपीचा राजविलासी थाट पाहून, कोणाचें ही चित्त साहजिक जास्त वेळ रमल्याशिवाय राहणार नाहीं. शास्त्रीबोवांचा प्रवेश झाला तो प्रथम याच चौकांत झाल्यामुळें, इतरांकडे नुसतें डोकावून पाहून, येथच्या पदार्थांचा मात्र त्यांनीं चवीचवीनें यथेच्छ उपभोग घेतला! व घेण्यासारखें बहुत रुचिकर पाथेयही बरोबर बांधून घेतलें. अशा रीतीनें सहल करीत करीत शास्त्रीबोवांची स्वारी मराठीभाषेकडे वळे.

आतां मराठीविषयीं पाहिलें तर पहिल्या दोघींप्रमाणें, हिचेसाठीं एखादें मालाचें विस्तीर्ण भांडार किंवा शोभिवंत मंदिर मुळींच तयार झालेलें नव्हतें. आजमितीलाही या स्थितींत फारसा फरक पडला आहे असें नाहीं हें कोणासही सांगण्याची गरज नाहीं. हिचा वास ह्मटला ह्मणजे अखाड्यांवर; व त्यापैकीं नवीन स्थापन झालेला एक बडा अखाडा स्वतः शास्त्रीबोवांच्याच घरीं. त्यांचे वडील स्वतः मराठी ग्रंथकार असून, धुरीण ह्मणून गाजलेले. शिवाय प्रथम ते दक्षणाकमेटीचे चिटणीस होते व नंतर रिपोर्टर झाले. यामुळें त्यांच्या टेबलावर नेहमीं मराठींतील नानाविध विषयांवरील जुन्या नव्या पुस्तकांचा सुकाळ असे. कोणी कसलाही ग्रंथ काढो, तो यांच्याकडे आल्याशिवाय राहात नसे; व यांच्या समोर त्याचे दोन डावपेंचही झाल्याशिवाय सुटका नव्हती. आणखी पुण्यामध्यें पुढारी व विद्वान लोकांत मोडल्यामुळें, त्यांच्या घरीं सर्व प्रकारच्या लोकांची हमेश जाये असे, व त्या वेळीं सहजच सामाजिक, धार्मिक व राज्यकारणी गोष्टी निघून, त्यांवर वादविवाद होत असत. अशा समयीं चिरंजीवानीं माडींतील खोलींत खुशाल खुर्ची टाकून बसावें आणि दाराच्या फटींतून आंतील संवाद लक्ष लावून एकत असावें. अशा रीतीनें इंग्रेजी, संस्कृत व मराठी भाषांत चांगली गति होऊन, व आंतील ग्रंथसंग्रहाची पुरी माहिती होऊन, त्यांस एकंदर देशस्थितीचेंही उत्तम ज्ञान झालें. वास्तविक पाहतां कालेजामध्यें

असतांनाच त्यांचें मन विचारांनीं परिपक्व आणि माहितीनें परिपूर्ण झालें होतें, व उत्तम तरबेज ग्रंथकारापेक्षांही तें ज्यास्त योग्यतेस पोंचलें होतें असें ह्मटल्यास चिंता नाहीं.

शास्त्रीबोवा कालेजांत अभ्यास करीत असतां, इतर ग्रंथ फार वाचीत, यामुळें त्यांचें लक्ष परीक्षेच्या नियमित पुस्तकांकडे साहजिकपणें कमी पोंचलें असेल; तसेंच गणितविषय जो त्यांस आवडत नसे त्यावरही व्यासंग कमी झाला असेल व त्यांच्या बुद्धीचें पडावें तसें तेज तेव्हां पडलें नसेल असें वांटतें. याशिवाय आणखी कांहीं कल्पना करवत नाहीं.[1] ही गोष्ट त्यांस कालेजांत

---

१ सृष्टिदेवीचा मोठा उपासक जो कविश्रेष्ठ वर्डस्वर्थ त्यानें "कवींच्या मनाचा विकास" नामक आपल्या काव्यांत कालेजांतील अभ्यासाविषयीं स्वतःचा अनुभव असा सांगितला आहे.—

"Of College labours, of the lecturer's room,
All studded round, as thick as chairs could stand,
... ... ... ... ... ... ... ... ...
... ... .. ... ... of important days,
Examinations, when the man was weighed,
As in a balance, of excessive hopes,
Tremblings withal, and commendable fears,
Small jealousies, and triumphs good or bad—
Let others, that know more, speak as they know.
Such glory was but little sought by me,
And little won. ... ... ... ...
A feeling that I was not for that hour,
Nor for that place."

*Prelude—Book III.*

पुढें चालू.

जास्त काळ वास करावा लागला यावरूनही उघड दिसत आहे. "निबंधमालें" तही त्यांनीं कळविलें आहे:—"आह्मी विद्यार्थिदशेंत असून आंग्लभौमनिर्मित विद्यापर्वताच्या उच्च शिखराकडे मार्ग क्रमीत असतांही, दोहों बाजूंच्या वृक्षलतांच्या पुष्पपल्लवांनीं कित्येक वेळां आकर्पितांतःकरण होऊन, मध्यें मध्यें गमत असूं" इ०. तथापि यामुळें त्यांची योग्यता ह्मणजे उणी झाली असें कोणी समजूं नये. जों जों हिरा साणेवर घासावा, तों तों अंतःस्थ तेज प्रगट होऊन, त्याची किंमत उलटी वाढत जाते हें सुप्रसिद्धच आहे. शास्त्रीबोवांचा मुख्य उद्देश ज्ञानप्राप्तीचा होता—आणि तें ज्ञानही आपल्या देशभाषेची सेवा करण्याच्या संकल्पास उपयोगी पडेल अशा प्रकारचें मिळविण्याचा. यास्तव परीक्षेच्या अभ्यासांत जो व्यत्यय यावयाचा त्याची ही त्यानी पर्वा केली नाहीं. परंतु जे विद्यार्थी घोकपट्टी करून व रात्रंदिवस उर स्फोड करून भराभर परीक्षेंत पास होतात,त्यांच्यांत व शास्त्रीबोवांसारख्या, इष्टज्ञान संपादनाकडे वळलेल्या स्थिरबिस्त विद्यार्थ्यांत फार फरक दिसून येतो.इतर विद्यार्थ्यांत लोकोपयुक्ततेपेक्षां गर्वाची मात्र वृद्धि

निबंधमालेतील वरील उताऱ्यात पुष्पपल्लवांनीं आकर्पितांतःकरण झाल्याची जी कल्पना आहे तीही वर्ड्स्वर्थच्या खालील ओळींतूनच शास्त्रीबोवांस सुचली कीं काय असा भास होतो.

Yet I, though used
In magisterial liberty to rove,
*Culling such flowers of learning as might tempt*
*A random choice*, could shadow forth a place &c.

*Prelvbc Book 111.*

होऊन, लोकांस त्यांच्यापासून कांहींच ह्मणण्यासारखा फायदा होत नाहीं असें वारंवार आढळतें. एकपाठी दुपाठी अशी तैलबुद्धि असावी, कठिण कठिण परीक्षा भराभर उतराव्या, अनेक बक्षिसें मिळावीं, उत्तम विद्वत्ता प्राप्त व्हावी, व कित्येकांनीं तर अगदीं कोंवळ्या वयांतही विलायतेची सफर करून सिव्हिलियनही बनून यावें; पण इतकें सामर्थ्य अंगीं असतां ही त्यांच्या कर्तृत्वाचा देशबंधूंस लाभ काय ?—तर कांहींच नाहीं! मात्र परीक्षांच्या दिव्यांतून सुटतांच, एखादी मोठीशी अधिकाराची व पगाराची जागा मिळवावी, कोणी वीस कपाटें भरून पुस्तकें वाचून संग्रह करून ठेविलीं, कोणी तीस कपाटें ठेविलीं अशी ख्याति व्हावी आणि शेवटीं जशाचें तसेंच टाकून देऊन, एखादे दिवशीं लोकांतराला प्रयाण करण्याची पाळी यावी. तेजस्वी खरा, पण तारा उगवावा तसा मावळावा ! चंद्रसूर्याप्रमाणें लोककार्याला त्याचा कांहींच उपयोग होऊं नये ही केवढी खेदाची गोष्ट आहे ! असा प्रकार शास्त्रीबोवांच्या ज्ञानाचा झाला नाहीं हें सांगा वयास नकोच. बहुधा एथें आमच्या शूद्रकवीच्या स्वविषयक-उक्तीचीच आठवण होते.

बरा कुणबी केलों।
ना तरीं दंभेच असतों मेलों ॥

शास्त्रीबोवांचें कालेज सुटल्यावर, कांहीं दिवस ते **बाबा गोखले** यांच्या स्कुलांत शिक्षक होते. पण नंतर लौकरच ह्मणजे १८७३ मार्चचे सुमारास त्यांची नेमणुक पुणें येथें सरकारी हैस्कुलांत तिसरे

असिस्टंटचे जाग्यावर झाली. याठिकाणीं सांगण्यासारखी गोष्ट झटली झणजे, सदर हैस्कुलचे हेडमास्तर कै० **महादेवराव कुंटे** यांचा व शास्त्रीबोवांचा बेवनाव उत्पन्न झाला व तो वराच पेटत गेला, हा होय. यांतला खरा प्रकार काय असेल तो बरोबर कळत नाहीं. दोघेही समंजस व विद्वान असून योग्यतेचे मनुष्य होते. तेव्हां यांत चूक कोणाची हें वरवरून बरोबर सांगतां येणें अशक्य आहे. शास्त्रीबोवांच्या तर्फेची मंडळी त्यांची कड घेऊन, **कुंटयांचे** माथींच सर्व दोष ठेवतात व शास्त्रीबोवांचे प्रतिपक्षी आणि **कुंटयांचे** अनुयायी गृहस्थ हा सर्व दोष शास्त्रीबोवांच्या हेकट स्वभावावर घालतात तथापि साधारणतः पाहातां, दोघांचीही यांत थोडी गैरसमज झाली असावी असें वाटतें. शास्त्रीबोवा हे गरीब खरे, तरी ते स्वातंत्र्यप्रिय व आपली अंतर्यामींची खरी योग्यता जाणून होते. आणि **कुंटे** यांच्या दांडग्या स्वभावापर्यां तर अझूनपर्यंत प्रख्यातीच होती. शिवाय त्यांस शास्त्रीबोवांच्या योग्यतेची बरोबर अटकळ झाली नसावी; नाहीं तर **कुंटयासारखा** चाणक्ष मनुष्य हाताखालच्या विद्वान मनुष्याशीं वर्दळीस खचित आला नसता.

असो; शास्त्रीबोवांस नोकरी मिळाल्यापासून ते बरेच स्वतंत्र झाले. त्यांच्या पाठीशीं परिक्षांचा धोशा उरला नाहीं व आपल्या मनांतील बेत हळुहळू अमलांत आणण्यास त्यांस चांगली फुरसद मिळूं लागली. त्यांना मराठीभाषेंत लिहिण्याची हौस पहिल्यापासून होतीच, व ती हौस पूर्ण करण्याला त्यांस दुसरे

कोठें जायाची गरज नव्हती. त्यांचे वडील फार दिवसांपासून "शालापत्रक" नांवाचें मासिकपुस्तक काढीत असत. यांतच पहिल्यानें शास्त्रीबोवांचे लेख येऊं लागले. तेव्हां ते कालेजांत शिकतच होते. त्यांनीं लिहिण्याचा कित्ता आरंभीं आपल्या वडिलांचाच गिरविला, व पुढें पुढें मात्रा वेलांटीचे फरांटे झोकून देऊन लेख मनोरम करण्याकडे जरी त्यांची लेखणी धांवत असे, तरी मूळचें वळण जें शुद्ध, सरळ भाषापद्धति, तें सुटलें नाहीं. अशा प्रकारें "वडिलांनीं लेखनप्रविष्ट" केल्यावर, हळुहळू "शाळापत्रक" लिहिण्याचें सर्व काम चिरंजीव एकटेच करूं लागले. अत्युत्कृष्ट व प्रसिद्ध असे जे "संस्कृत कविपंचकां" वरील निबंध, ते त्यांनीं याच समयास लिहिण्यास सुरवात केली. ते सुमारें दोन वर्षं छापत होते. आरंभीं त्यांचा बेत, साधारण कवितेवर निबंध लिहून. नंतर इंग्रजी संस्कृत व मराठी कवितेचें स्वरूप, त्यांची उत्कृष्टता व परस्पर तुलना इ॰चा त्यांत समावेश करावा, असा होता असें दिसतें. परंतु पहिल्या दोन भाषेंतील कवितेवर बराच मजकूर येऊन गेल्यावर, मराठी कवितेला अर्धामुर्धा आरंभ झाला न झाला तों "शालात्रक" बंद होण्याचा प्रसंग आला. सदर "पत्रक" सरकारच्या मदतीनें चालत होतें, असें असतां, त्यांत मिशनरी लोकांच्या विरूद्ध वारंवार मजकूर येऊं लागले, हा केवढा अनर्थ असा बोभाट होऊं लागला व ही गोष्ट विद्याखात्याचे मुख्य अधिकाऱ्यांच्या कानावर

जाऊन, सदर पुस्तक अजीं बंद करण्याचाच हुकूम सुटला. ही हकीगत स्वतः शास्त्रीबोवा खालीं लिहिल्या-प्रमाणें वर्णितातः—

" पुढें विचित्र दैवयोगानें बिचाऱ्या " पत्रिका " ची इतिश्री होण्यास आह्मींच कारण झालों. मुंबई-चें " एज्युकेशनल रेकर्ड " ह्मणून रजा व नेमणुका समजण्याचें अखबार जसें होऊन बसलें आहे, त्याच्या-पेक्षां "मराठी शालापत्रका"ची योग्यता कांहीं ज्यास्ती असावी असा आमच्या वडिलांचा संकेत होता; व पुढें आमचाही होता. .... .... .... पण १८७४ पासून तें एका जबरदस्त दुष्ट ग्रहाच्या फेऱ्यांत पडलें. व मनुष्य किंवा होडी भोंवऱ्यांत सांपडली असतां, कालेंकरून त्यांची गति जशी केंद्रप्रवण होत होत, त्यांत त्यांचा शेवटीं लय होतो; त्याप्रमाणेंच पुढील सालापर्यंत वरील ग्रहग्रस्त पुस्तकाची मजल जेमतेम .आटपून, तें शेवटीं बुडालें! हा महान अनर्थ होण्यास कारण काय झालें ह्मणाल, तर पूर्वोक्त कवितावियय!"

'मराठी शालापत्रक' जरी लहानसेंच पुस्तक निघत असे, तरी तें ज्यांच्यासाठीं निघत असे अशा शिक्षकांस व इतर वाचनेच्छु लोकांसही उपयोगी पडण्यासारखें होतें. धाकटे शास्त्रीबोवांकडे त्याचें कर्तृत्व आल्यापासून तर तें वाचकांस अत्यंत प्रिय होऊन बसलें. ' शालापत्रक आलें काय हो? "' असें शिक्षक मंडळानें मुख्यांस वारंवार विचारावें व तें केव्हां येईल याची धापा टाकीत, वाट पहात असावें, हा अनुभव पुष्कळांस आठवत असेल!

"शालापत्रक" बुडाल्यामुळें शिक्षक लोकांचें मोठेंच नुकसान झालें यांत संशय नाहीं.

"शालापत्रकाच्या" परीसमाप्तीबरोबर शास्त्रीबोवांच्या आयुष्यक्रमाचा पहिला अंक संपला. शालापत्रक बंद झालें खरें; पण त्याबरोबर त्यांचा लिहिण्याचा हव्यास बंद झाला असें नाहीं. उलटा,

> कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें
> तो क्षीणही विधु महोन्नति घे क्रमानें।

असा प्रकार झाला. कारण, बिचाऱ्या मिशनरींच्या प्रोत्साहनार्थ "शालापत्रका"स जों विश्रांति मिळाली, तों त्यांस दुसरा शत्रु, पूर्वींच्यापेक्षांही ज़ास्त बळवान्, जास्त निर्भीड व जास्त भयंकर, असा दत्त उभाच! हा शत्रु ह्मणजे "निबंधमाला" होय. पुढील भविष्य करून शास्त्रीबोवांनीं मिशनरींचा हा नवा शत्रु अगोद-रच सज्ज करून ठेविला होता! "मालेचा" पहिला अंक इ० स० १८७४च्या जानेवारींत बाहेर आला. तेव्हां पासून ( मध्यंतरी एका वर्षाचा खंड खेरीज करून ) हें सप्तवार्षिक सत्र जें एकदा सुरू झालें, तें त्याच्या यजमानाची अखेरीस पूर्णाहुति घेऊन बंद झालें! कसें तो प्रकार पुढें कळेल.

"निबंधमाला" चालू असतां मध्यंतरी तिच्यावर कित्येक प्रसंग आले. त्यांत दोन विशेष लक्षांत ठेवण्यासारखे आहेत एक आरंभींच आठव्या अंकाशीं व दुसरा तिसाव्या अंकाशीं. आठव्या अंकांत इतिहासाचा [illegible] वल्हावून त्यांत मेकाले, मिल्ल अशा सा[illegible]

मतांचें परीक्षण करून बरीच खरडपट्टी काढली आहे व "महादुष्ट बंडवाल्यांची स्तुति" केली आहे. तिसाऱ्या अंकांत "इंग्रेजी भाषा" हा विषय असून, त्यांत, हिंदुस्थानांतील इंग्रेजांची नेटिवांशीं उद्धटपणाची वागणूक, मिशनरींचा कावा, बाटग्यांचा मूर्खपणा व बैबलाची असंबद्धता इत्यादिकांवर रोख ठेऊन 'त्रेंच हत्यार' उपसलें आहे. याचा परिणाम असा झाला कीं एक मोठा मदांध "गजेंद्र" चालून येऊन, आपल्या जबरदस्त भाराखालीं बिचाऱ्या "माले"स चुरडून धुळीस मिळविण्याचा यत्न करित होता, व

नैसर्गिकी सुरभिणः कुसुमस्य सिद्धा
मूर्ध्नि स्थितिर्न चरणैरवताडनानि ।

मालतीमाधवम्

याचा विपर्यास करून, प्रत्यक्ष अघोरघंटाचीच कृति करून दाखविण्यास इच्छित होता! वरील अंकांतील पूर्ण निस्पृहपणानें लिहिलेल्या लेखावरून, मालेच्या कर्त्यास राजद्रोहाखालीं ओढावें व एकदा हा कांटा काढून टाकावा, ह्मणून वरिष्ठ दरबारी व मिशनरी मंडळांत बराच पेगम चालला होता. पण काय असेल तें असो; त्यापासून ह्मणण्यासारखें कांहींच निष्पन्न झालें नाहीं हें मोठेंच आश्चर्य. मात्र शास्त्रीबोवांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांचा डोळा राहून, एका वर्षाच्या आंत एकदम रत्नागिरीस एका कोपऱ्यांत त्यांची बदली झाली!

शास्त्रीबोवांनीं पुण्याच्या बाहेर कधींही फारसें पाऊल विचाराव प्रत्नें: ह्मणून तें एकाएकीं सोडण्याचें त्यांच्या पहात असावें, हा अनुरु असें खरें, तरी माला गुंफण्याचा

आवडता उद्योग जो त्यांच्या पाठीमागें होता, त्याची त्यांना आतां विशेष काळजी पडली. बदलीचा हुकूम मिळतांच, त्यांचा एकदम निश्चय ठरून गेला कीं कर्तव्य स्मरून इच्छिलेला हेतु जर आपल्यास तडीस न्यावयाचा आहे, तर ‘सर्वांस एवढी स्पर्धास्पदभूत जी राजसेवा तिच्यावर पाणी सोडल्या’-वांचून चालणार नाहीं. परंतु यावेळीं ते सर्वस्वी स्वतंत्र नव्हते; त्यांच्या डोक्यावर वडिलांचें दडपण होतें. ह्मणून वडिलांच्या आग्रहास मान देऊन, परशुराम क्षेत्राच्या राजधानीची सफर शास्त्रीबोवांस पत्करावी लागली. या स्थलांतरामुळें, व परके ठिकाणीं नीट सोय नाहीं, हवापाणी मानवेना अशा कारणांनीं लिहिण्याचें काम बरेंच मागें पडलें. एकदा हा उद्योग बंद करावा असेंही शास्त्रीबोवांच्या मनांत आलें. वरील अडचणीत आणखी भर घालण्यासाठीं, लिटनशाहीची चिरकालिक आठवण देणारें जें प्रसिद्ध ‘मुद्रणानुशासन’ त्याचा ही प्रादुर्भाव झाला. मग काय, ‘गंडस्योपरि पिटका संवृत्ता’ अशीच अवस्था! या वेळीं शास्त्रीबोवांसारख्या देशाभिमानी व निःस्पृह लेखकाच्या चित्ताचा किती हिरमोड झाला असेल याची कल्पना करणेंच पुरे आहे. तथापि मराठीभाषेंत ग्रंथ लिहिण्याचा आपला मूळ संकेत त्यांस एकाएकीं सोडवेना. ह्मणून सत्यास अनुसरून, होईल तोंवर, अशा अरुंद, खडकाळ, व मिशनरी, बाटे, गर्विष्ठ अधिकारी वगैरे महानक्रांनीं व्यापिलेल्या खाडींतूनच आपलें तारूं वल्हावून

नेण्याचा व आपलें नाविकचातुर्य प्रगट करण्याचा प्रसंग न घालविण्याचाच बेत त्यांनीं कायम केला.

तथापि इतक्यानें झालें नाहीं; त्यांस या वर्षी आणखी एक जबरदस्त धोका बसला. याच वर्षी ह्म० इ० स० १८७८ त त्यांच्या वडिलांस देवाज्ञा झाली. विष्णुशास्त्री यांच्या मनांत वडिलांविषयीं अत्यंत प्रेम व भक्ति असे. वडील जितके मातृभक्त होते तितके हे पितृभक्त होते असें ह्मणतात. वडिलांच्या वियोगानें त्यांस अत्यंत दुःख झालें. आणखी, आतां संसाराचें सगळें ओझेंही यांच्या शिरावर आलें. पूर्वी, वडिलांच्या हयातींत ते संसाराच्या दगदगींतून व काळजींतून अगदीं मोकळे होते; तशी गोष्ट आतां राहिली नाहीं. ही एक नवीन अडचण त्यांच्या देशहिताच्या उद्योगांत उत्पन्न झाली. तथापि मूळ उद्देशावर नजर देऊन अशा प्रकारच्या कांहीं खऱ्या व कांहीं मानीव अडचणींचा कोट फोडून एकदाचें मोकळें व्हावें; आणि देशकल्याणाचा किल्ला सर करावयास व देशभाषामंदिरावर आपली यशःपताका अक्षय्य उभारावयास, धोपट मार्ग करून घ्यावा असा त्यांच्या मनाचा निश्चय होऊन गेला; व लगेच तो त्यांनीं तडीसही नेलाच. वडिलांच्या मरणानंतर ते फार दिवस रत्नागिरीस राहिले नाहींत. त्यांनीं प्रथम रजा घेतली नंतर लगेच आपल्या चाकरीचा राजीनामा खरडून पाठवून दिला!

या कृतीचें सर्व लोकांनीं मोठेंच आश्चर्य केलें. त्यांच्या मित्रमंडळाची तर त्यांस निराळीच सल्ला होती. आणि वास्तविक आहे. अहो. आज दरमाहा शंभर

रुपयांची नोकरी ह्मणजे आहे कुठे? त्यांतून जों-पर्यंत वडिल होते, त्यांस पेनशन मिळत होतें तोंपर्यंत गोष्ट वेगळी होती. या पुढें कोणतेंही साहस करणें ते विचारानेंच केलें पाहिजे इ०. अशा प्रकारचा साधुपणाचा मळमळित उपदेश पुष्कळांनीं केला; पण तो त्यांच्या हृदयांत उतरला नाहीं. देशाभिमानाच्या अंतर्यामींच्या टोंचणीपुढें अशा उपदेशाचा टिकाव निघणें कठिणच. वरील उपदेशक मंडळीस त्यांचें एकच उत्तर असे; तें हें. "मला दिवसा एक निठवें धान्य प्राणधारणास पाहिजे, तेवढें कोठें गेलों व कांहीं केलें तरी मिळ-वितां येईल कीं नाहीं? वस आहे. मग जास्तीची इच्छा मी कां करावी? प्राण्यास ईश्वर निर्माण करतो, तो त्याच्या जीवनाची ही सोय करून ठेवतोच ठेवतो." या उत्तरापुढें त्यांची स्नेही व इष्ट मंडळी बहुधा निरु-त्तर होऊन जाई!

एथें एक गोष्ट लक्ष देण्यासारखी आहे. ती ही कीं, शास्त्रीबोवांचा स्वभावतःच मराठीभाषेकडे मोठा ओढा. त्यांचे वडील नामांकित ग्रंथकार होते व त्यांनीं स्वहस्तेंच आपल्या चिरंजीवांस "उष्टावण करून" "लेखन प्रविष्ट" केलें होतें. तथापि शास्त्रीबोवांची स्वभा-वतःच मराठीकडे प्रवृत्ति नसती, तर त्यांच्या हातून मरा-ठीची एवढी निरपेक्ष सेवा खचित झाली नसती. बहुधा, त्यांच्या बहुत विद्यालयबंधुवर्गाप्रमाणें त्यांचीही कोठें एखाद्या मोठ्या हुद्याचे जाग्यावर योजना होऊन, मरा-ठींत लिहिण्याच्या त्यांच्या हौशीचाही तेथेंच लय झाला असता. त्यांस इंग्रजी उत्तम येत होतें; तेव्हां

इंग्रेजी विद्वानांच्या नेहमीच्या वहिवाटीप्रमाणें, पेन धरण्यास घटावलेल्या हातास लेखणीचा विटाळ न होऊं देण्याची खबरदारी त्यानीं ठेवली असती, तरी सहज चालली असती. नादान ह्मणून टाकून दिलेल्या मराठी-भाषेवर आपली लेखणी चालवा, आणि कोकणांतल्या उखीर व खडकाळ माळ जमिनीला सीरोत्कपणसंस्कार करून लागवडीला तयार करण्यासाठीं जसे जबरदस्त दीर्घ श्रम करावे लागतात, तसे श्रम, व तशी खटपट करून, मराठी भाषेला कमावा; इतकें करण्याचें त्यांचें वास्तविक काय अडलें होतें? त्यांची होती तीच नोकरी जरी ते कांहीं दिवस ठाकून ठोकून धरून बसते, तरी लौकरच आपल्या कर्तबगारीनें ते उच्च पदाला पावते. मग तेथें स्वस्थ बसून त्यांस शेंकडो नांवाजण्यासारख्या गोष्टी सहज करितां आल्या असत्या. मोठमोठाले विद्वत्ताप्रचुर सरकारी रिपोर्ट लिहितां आले असते; "ग्याझीटीयरला" ऐतिहासिक माहिती देतां आली असती; व आह्मीं सरकारी कामें चोख बजावतों यांत देशाचें कल्याण कमी करतों असें नाहीं, अशी मोठ्या ऐटीनें आपली व खऱ्या देशभक्तांसारख्या वेड्यापिरांची सहज समजूत करतां आली असती. या शुभयोगाच्याही अगोदर, बुद्धीची तीव्रताच होती व कांहीं तरी करायाला पाहिजेच होतें, तर वेदाला, भाष्यांला, दर्शनांला वगैरे हात घातला असता, किंवा भगवद्गीता, रामायण वगैरेची इंग्रजींत भाषांतरें व त्यांवर पाश्चात्य विद्वानांनीं आणलेल्या अज्ञानमूलक आक्षेपाचें निरसन केलें असतें किंवा प्राचीन शिलालेखांचे अर्थ लाव-

ण्यांत व कोटिक्रम करण्यांत खरडे घासले असते म्हण-
जे बस झालें असतें. यांत स्वार्थ आणि परमार्थ अशी दोहोंचीही जोड झाली असती; एकदम जाडा विद्वान्, जबर ज्ञान अशीं सर्टीफिकिटें, मोक्षमूलरभट्ट, बोधलिंगाचार्य* अशांकडून मिळून सर्व जगतांत कीर्तिच कीर्ति होऊन गेली असती; सरकारांत राणीसाहेबांपर्यंत वर्दी पोचली असती; रावसाहेबी व रावबहादुरी तर खिशांतली होऊन केसीएसाय किंवा पी. एच. डी., डाक्टर असेच कांहीं किताब अमेरिका युरोप अशा ठिकाणाहून धांवत आले असते; व मोठी गोड गोष्ट ही कीं मग अनायासेंच बढतीचा मार्ग मृदु व सुखप्रवेश झाला असता. साधारणपणें अल्पस्वल्प स्वार्थासाठींही सरकार दरबारीं

* गुरुत्वामुळे अद्वितीय ह्मणून नांवाजलेल्या एका विद्वानास, युरोपखंडाच्या सफरीचें फळच काय असा डाक्टरीचा किताब मिळाला, त्या वेळीं एथील पारशीपंच कीं कोणत्याशा एका पत्रांत एक मौजेचा सचित्र लेख पाहिल्याचें आह्मांस स्मरतें. त्यांत असें दाखविलें होतें कीं एक हिंदु व एक युरोपीयन असे दोघे समोरासमोर उभे आहेत. त्यांचे उजवे हात शेकह्यांड करण्यासाठीं जोडले आहेत. हिंदूच्या डावे हातांत पागोटें असून त्यावर 'भट्ट' 'आचार्य' अशीं अक्षरें कोरलीं आहेत. युरोपीयनाच्या हातांत टोपी असून तीवर 'डाक्टर' 'नाइट' अशीं अक्षरें आहेत. आणि दोघांनींही आपापलीं शिरोभूषणें अदलाबदलीसाठीं पुढें केलीं आहेत. या तसबिरीखालीं पुढील अर्थाचें मार्मिक वाक्य लिहिलें होतें—

" स्वतःच्या गोष्टीचा कंटाळा यावा व परक्याची हरएक गोष्ट गोड लागून हवीशी वाटावी हा मनुष्याच्या मनोवृत्तीचा केवढा चमत्कार आहे!! "

इतर मनुष्यांची केवढी खटपट चालली असते व राजद्वारीं ते किती खेटे घालीत असतात हें आपल्यास ठाऊकच आहे. विष्णुशास्त्री यांस असा कांहीं प्रयास करावयास पाहिजे होता अशी गोष्ट नव्हती. विद्वत्ता, बुद्धिसामर्थ्य व वडिलार्जित वजन या तीनही गोष्टींची शास्त्रीबोवांस चांगली अनुकूळता असल्यामुळें भराभर बढती मिळून राजदरबारीं त्यांस हवें तसें नाचतां आलें असतें. तेव्हां एवढ्या गोष्टी स्वाधीन असल्यावर अशा स्वार्थपरंपरेकडे त्यांनीं थोडें तरी लक्ष देणें वाजवी होतें कीं नाहीं बरें ? पण सर्व व्यर्थ. त्यांचा सगळाच क्रम याच्या उलट. या डोकेफिरू तरुणानें वरील परंपरा कांहींच कींहो मनांत आणली नाहीं ! "विद्यापीठरूप महानीडां"तून सुटला तो लागला मराठीकडे भराऱ्या मारायाला ! तिकडे आपल्या सुंदर पंखांचें चापल्य दाखविण्यापासून आपल्यास उपयोग आहे किंवा नाहीं, याचा यानें क्षणभरतरी विचार केला कीं काय ? मुळींच नाहीं. आणि शास्त्रीबोवांस वास्तविक वरील गोष्टींचा विचार करण्याची कांहीं जरूर ही नव्हती. कारण त्यांस वरीलपैकीं एकही गोष्ट इष्ट नव्हती. यामुळें स्पेन्सर मिल्टन, जान्सन इत्यादि इंग्रेजी कवींनीं व 'अनाथांच्या काजा साह्य' होणाऱ्या ज्ञानदेव, तुकाराम, रामदास या आणि 'आडांतील गोड पाणी' अज्ञ जनास सुलभ करून देण्यासाठीं 'दोर पात्रें' पुरविणाऱ्या श्रीधर, मुक्तेश्वर, वामन, मोरोपंत वगैरे साधुवृंदांनीं मळवून दिलेला मार्गच त्यांस गोड वाटला. त्यांचा मूळचा उद्देश ह्मटला ह्मणजे मराठींत ग्रंथरचना करून तिला उन्नतपदास

त्यावयाचें व तद्वारा " आपल्या देशबांधवांची आठवण ठेवून त्यांस ज्ञानप्राप्तीचा मार्ग खुला करून द्यावयाचा." हा जो त्यांचा मूळ संकल्प होऊन बसला, त्यापुढें वरील परंपरेची किंमत त्यांस कांहींच भासली नाहीं.* आणि याचें कारण काय? तर त्यांच्या मनाचा तिकडे कल

---

* मिल्टनची गद्य भाषासरणी कठोर आणि पाणीदार आहे. व अशा भाषासरणीनें एके ठिकाणीं त्यानें देशभाषोत्कर्षविषयक आपला दृढ निश्चय येणेंप्रमाणें कळविला आहे.—

"I applied myself to that resolution which Ariosto followed against the pursuations of Bembo, to fix all the industry and art I could unite to the adorning my native tongue; not to make verbal curiosities the end (that were a toilsome vanity) but to be an interpreter and relator of the best and sagest things among mine own citizens through out this island in the mother dialect.

"That what the greatest and choicest wits of Athence, Rome or moderen Italy and those Hebrews of old, did for their country, I, in my portion, with this over and above of being a Christian, might do for mine; not caring to be once named abroad, by writing in Latin (like Bacon) though perhaps I could attain to that, but content with these British Islands as my world."

Prose Works—*Reason against Church Govt*:—*Book II.*

किती थोर आशा व केवढा उत्साह! ल्याटीन भाषेत लिहून युरोपभर कीर्ति मिळविण्याचें सामर्थ्य असतां, ती हौसही विचाऱ्यानें देशभाषेच्या कळवळ्यास्तव झुगारून दिली!! यावरून. आमचे विद्वान लोकांनीं आपले स्वभाषाद्वेषव्रताचा व एकंदर निष्काळजी वर्तनाचा विचार करावा. मिल्टनची ल्याटिनमध्यें चांगलीच पारंगतता असून तो क्रामवेलचा ल्याटिन सक्रेटरी होता, हें इतिहासप्रसिद्धच आहे.

इतकेंच ; यापलीकडेस अधिक कांहींच ह्मणतां येत नाहीं. या कृतीनें स्वतः त्यांस ऐहिक फायदा झाला ह्मणावा, तर तसेंही कांहीं नाहीं. एवढेंच नाहीं, तर फायद्याच्या ऐवजीं, याचें प्रायश्चित्त, नोकरी सोडून देऊन, त्यांस आचरावें लागलें हे सर्व प्रसिद्धच आहे. यावरून, मराठी भाषेची त्यांस किती आस्था होती व देशहितास्तव निर्भिडपणें स्वमतप्रतिपादन करणें किती अगत्याचें त्यांस वाटत असे, याविषयीं कोणाचीही सहज खात्री होईल. "शिवच्छत्रपति मराठ्यांच्या राज्याच्या अभ्युदयार्थ अवतरले; ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम, वामन, मोरोपंत इ० महापुरुष भक्तिभावाच्या प्रसारार्थ आणि महाराष्ट्र कवितेच्या अभ्युदयार्थ होऊन गेले; तसे, विष्णुशास्त्री चिपळूणकर हे, मराठी भाषेंत गद्यरचनेच्या उन्नत्यर्थ आणि स्वदेशाभिमानाच्या पुनरुज्जीवनार्थ होऊन गेले" असें जें एका प्रसिद्ध मराठी ग्रंथकारास "वाटतें," तें अगदीं यथार्थ आहे यांत "संदेह" नाहीं !*

विष्णुशास्त्री यांणीं नोकरी सोडली ती समजून उमजूनच सोडली; उगाच डोकें फिरवून, अविचारानें सोडली असें नाहीं. वर सांगितलेंच आहे कीं पहिल्यापासून त्यांच्या मनाचें धोरण अगदीं निराळें होतें. आपल्यास

* हें संपूर्ण वाक्य असें आहे—

" ........ गद्यरचनेच्या उन्नत्यर्थ आणि देशाभिमानाच्या पुनरुज्जीवनार्थ होऊन गेले कीं काय असें वाटतें":—बालबोध, पु० ७. अंक १०. मागें उपोद्घातांत ६ व्या पानावर बालबोधांतील ज्या लेखाचा उल्लेख करून या पानावर हवाला दिला आहे तो हाच लेख.

काय करावयाचें आहे व आपल्या हातून काय काय हो-ण्यासारखें आहे याचा त्यांच्या मनाशीं निर्णय ठरून गेला होता. आपल्या मनांतले देशकल्याणाचे उद्देश, व सरकारी नोकरी पत्करून काळक्रमणा करण्याचा आपल्या विद्वान् लोकांचा परिपाठ, यांचा मेळ आपल्यास कितपतसा घालतां येईल याची अटकळ त्यांस होऊन चुकली होती. त्यामुळें पदोपदीं जाचणारी व क्षणोक्षणीं इष्टोद्देशाला अडथळा आणणारी जी एवढी सरकारी नोकरी, ती सोडून देणेंच त्यांस बरें वाटलें. व तसें करतांना, त्यांस कांहींच कष्ट वाटले नाहींत. एवढेंच नाहीं, तर गुलामगिरींतून मोकळीक झाल्यामुळें त्यांच्या जीवास शांति आणि समाधान हीं प्राप्त झालीं. असा प्रकार चाकरीस लालचल्यामुळें ज्यांचे हृदय अगदीं स्वातंत्र्याभिमानशून्य झालें आहे अशा मंडळीचा होणार नाही हें स्पष्टच आहे. वरिष्टांच्या प्रेमळ कृपाकटाक्षांच्या ज्या शीतळछायेखालीं चाकरमान्या लोकांची खुरट वाढ पूर्ण व्हावयाची, व जी एकाद् वेळ अंतरली तर तें नाजुक रोपें कोमेजून कांहीं काळानें अज्जी करपूनहीं जावयाचें, अशा छायेखालीं शास्त्रीबोवांसारख्या स्वातंत्र्यप्रिय मनुष्यांस, सूर्यकिरणा मध्यें मोकळ्या हवेंत फोफावणाऱ्या वृक्षाप्रमाणें, उजगारण्याचा किती संभव होता याची कल्पना करणें फारसें कठिण नाहीं. चाकरमानी व स्वातंत्र्याभिमानी या दोहोंस मानवणाऱ्या हवा व जागा अगदीं निरनिराळ्या. या दोहोंचे स्थितीची अदलाबदल करूं पहाणें ह्मणजे, लापलंडांतील रेन हरिणाला आफ्रिकेंतील साहारा नांवाच्या

रखरखीत वाळवंटावर नेऊन सोडण्याप्रमाणें, आणि आपल्या हिंदुस्थानच्या मृगपतीला उत्तर ध्रुवाकडील शीत प्रदेशांत नेऊन वाढविण्याप्रमाणें केवळ अहितकारक होय !

रत्नागिरीस शेवटला नमस्कार केल्यावर तेथल्या एका मित्रास, त्यांनीं एक इंग्रेजी* पत्र पाठविलें

---

* विष्णुशास्त्री यांचे इंग्रेजी ज्ञानही उत्तम होतें हें निराळें सांगावयास पाहिजे असें नाहीं. तरी त्यांच्या मराठींतील लेखांप्रमाणें इंग्रेजी लेखनाविषयीं त्यांची प्रख्याति नाहीं.यास्तव त्यांच्या हातचा इंग्रेजी लेख मिळाला असतां वाचण्याविषयीं वाचकांस सहजच जिज्ञासा होईल. त्यांच्यासाठीं वरील पत्राचा अस्सल इंग्रेजी उतारा खालीं दिला आहे.

"No wonder that my throwing up my place has called forth many a remark both here and there. In these days of helplessness and subserviency Government Service is looked upon in something of a heavenly light, and one deliberately giving it up must consequently be looked upon as little hort of a madman or a suicide! But for my own part I have always thought very differently of the matter. Rather than bend the knee to tyranny, I would snap asunder the chain once and for ever. I have told you once and often on what terms I stood while here with..... , and I was resolved to throw up my place when I received the order for Ratnagiri. But various circumstances compelled me then to leave my native place and home. But even then I cherished the hope that I would achieve my liberty the moment a suitable opportunity occurred.

"It is then my supreme disgust of the drudgery of a Goverment-school life that led me to resign my place.

'निबंधचंद्रिका' नामक मासिक पुस्तकांत भाषांतरासह प्रसिद्ध झालें आहे, तें एथें थोडी फिरवाफिरव करून खालीं देतों. त्यावरून नोकरी सोडते वेळीं त्यांचे उद्देश काय होते याविषयीं कोणाच्याही मनांत संशय उरणार नाहीं. या पत्रांत ते लिहितात.—

"मी सरकारी नोकरीचा राजीनामा दिला, त्यासंबंधानें एथील व रत्नागिरीच्या मंडळींत बराच गवगवा झाला आहे. पण याचें आश्चर्य करण्याचें कांहींच कारण नाहीं. गुलामगिरी करून पोट भरण्याची आ-

---

........... I am resolved to try what might be done for public good with the potent instrumentality of a Press establishment worked by a vigorous hand. You will have in course of time a fresh edition of the Arabian Nights carried on to the end, the essays on Marathi Grammar in the शालापत्रक, essays on the remaining Sanscrit poets, and, several other works which I have long since contemplated.

"I have said, I believe, enough to reassure you that it was in no momentary freak that I resolved to bear the chain no longer.".

विष्णुशास्त्री यांचा सर्व भर मराठी भाषेकडे असल्यामुळें इंग्रजी भाषेंत रचना करण्यास त्यांस क्वचितच सवड मिळाली असेल. तरी A Poet turned Philosophor या नांवाचा एक निबंध कालेजांत असतां लिहिलेला ज्ञानप्रकाश वर्तमानपत्रांत छापलेला ऐकिवांत आहे. तो आह्मांस पाहावयास मिळाला नाहीं तरी तो कै. महादेवराव कुंटे यांच्या मन नामक काव्यावर टीकारूप लिहिला आहे व त्यावरून लिहिणाराच्या इंग्रेजींतील प्रवीणतेची बरीच साक्ष मिळते असें समजतें.

मच्या लोकांची हीन दशा लक्षांत आणली म्हणजे राजसेवा ही एक ईश्वरदत्त अजब चीज आहे असें जे समजतात तें नीटच आहे असें म्हटलें पाहिजे. अशा वेळीं सरकारी नोकरी बुद्धिपुरःसर सोडून देणें म्हणजे शुद्ध वेडेपणा किंवा प्रत्यक्ष आत्मघात करण्यासारखेंच नव्हे तर काय? परंतु मला विचाराल, तर या संबंधानें माझी समजूत अगदीं निराळी आहे. जुलमगार वरिष्ट अधिकाऱ्याला मस्तक नमविण्यापेक्षां एकदम सर्व संबंध तोडून मोकळें व्हावें हें बरें. मी एथें असतां,.... ........शीं कशा रीतीनें वागत होतों हें आपल्यास अनेक वेळां सांगितलेंच आहे. माझी रत्नागिरीस बदली झाली तेव्हांच मी नोकरी सोडावयाचा; परंतु कित्येक कारणांमुळें मला माझी जन्मभूमि व आप्तवर्ग सोडून जाणें भाग पडलें. तरी पण तेव्हां सुद्धां, नीटशी संधि मिळाली कीं स्वांतत्र्यावलंबन करावयाचा माझा पक्का विचार होता.

"यावरून तुमच्या लक्षांत आलेंच असेल कीं सरकारी शाळेंत पोरें हाकण्याच्या म्हारकीचा मला अगदीं तिटकारा आला होता; व हेंच माझें नोकरी सोडण्याचें मुख्य कारण. .... .... ... .... .... एक छापखाना काढून तो चांगली मेहनत घेऊन चालवावा व तद्वारें होईल तितकें करून देशहित करावें असा माझा विचार आहे. सवडी सवडीनें 'अरेबियन नाइटस' या पुस्तकाच्या उरलेल्या भागांचें भाषांतर तुम्हांस मिळेल. तसेंच, शाळापत्रकांत छापलेले मराठी व्याकरणावरील निबंध, बार्कीच्या संस्कृतकवींवर निबंध, व दुसरीं

जीं कित्येक पुस्तकें तयार कराण्याचें फार दिवसांपासून माझे मनांत वागत आहे, तीं आतां लौकरच लोकांपुढें येतील.

"वर जें लिहिलें आहे त्यावरून तुह्मांस कळेलच कीं रुपेरी बिडी पायांत न वागविण्याचा माझा निश्चय घटका अर्धघटकेचा नव्हता!"

नेहमींच्या वहिवाटीला विरुद्ध अशी एखादी गोष्ट घडली ह्मणजे सहजच तिच्याबद्दल लोकांत गवगवा होऊं लागतो. विष्णुशास्त्री यांणीं एकदम राजीनामा दिला ही गोष्ट बाहेर येतांच, सर्व महाराष्ट्रांत तिची चर्चा सुरू झाली. राजीनाम्याचे कारणाविषयीं अनेकांनीं अनेक तर्क केले. त्यांत त्यांस कोणी बरें ह्मटलें, कोणी वाईट म्हटलें. तरी एवढी गोष्ट निःसंशय खरी आहे कीं, त्यांच्या या कृतीचें सर्वांनींच मोठें आश्चर्य केलें. राजाश्रयानें हिंदुस्थानांत इंग्रेजी विद्येचा प्रवेश झाल्यापासून लोकांच्या मनाची प्रवृत्ति कांहीं विलक्षण तऱ्हेनें एकाच दिशेकडे वळली. इंग्रजींत थोडें टफ करतांहीं येऊं लागलें कीं मोठीशी चाकरी मिळण्यास आरंभीं कांहींच अडचण पडत नसे. यामुळें इंग्रेजी विद्या म्हणजे उपजीविकेचा सुलभ उपाय होऊन बसला, व जो उठला तो नोकरीच्या आशेनें इंग्रजी शिकूं लागला. आणि हें मान उत्तरोत्तर एवढें वाढत गेलें कीं तीन तीन चार चार परीक्षा देऊन पदवी मिळविलेले लोक पैशापासरी होऊन, हमालीची कां होईना, पण नोकरी करणें हें आपलें कर्तव्य आहे असें मानूं लागले. ज्यांनीं प्रथम इंग्रजी विद्या शिकण्याविषयीं दीर्घ प्रयत्न मांडले त्याच

आमच्या राज्यकर्त्यांना असें भय येऊन पडलें आहे कीं या लोकांस एवढ्या सरकारी नोकऱ्या आणाव्या तरी कोठून व याची व्यवस्था तरी काय करावी? या संबंधानें त्यांच्याकडून हर हमेश आह्मास कसे टोले मिळत आहेत हें सर्वांसही माहीत आहे. व ते कांहीं अंशीं तरी वाजवी आहेत असें कोणासही दुःखानें कबूल करणें भाग आहे.

प्रकृत चरित्रनायकानेंच स्थापन केलेल्या शाळेला थोड्या वर्षांवर जेव्हां कालेज जोडण्याचा शुभ योग आला, त्यावेळीं 'धन्याच्या ऐवजीं भलत्याला मलीदा' असा प्रकार होऊन, ज्या राजश्रीस त्या कालेजच्या इमारतीचा दगड बसविण्याचा व स्वनांवानें तें चालू करण्याचा मान मिळाला, त्यांच्याच मागून तत्स्थानापन्न झालेल्या अधिकाऱ्यानें आपल्या एके भाषणांत, देशाच्या उत्कर्षाचेंच कीं काय अशी एक गोष्ट सांगत असतां विनोद केला कीं आमचे भालदार, चोपदार, पंखेवाले वगैरे लोक आम्हाला पदवीवालेच मिळूं लागतील असा दिवस फार दूर नाहीं अशी माझी अटकळ आहे!* असो, तर

---

* I believe that institutions like your New School, have got all the elements—and if you have not, you will be able to obtain them with the aid of the Education Department to prevent as much as possible that the whole current of education should not lead only to what I am afraid, is present in the minds of many of you —Government service There is no doubt at the present moment a great danger that there will be such a demand for Government service that Government itself will be-

अशी ज्याकाळीं सार्वत्रिक प्रवृत्ति होऊन गेली, त्यावेळीं तिच्या विरुद्ध कोणीं आचरण केलें व त्याबद्दल मोठा गवगवा झाला तर त्यांत नवल कसलें ?

त्यावेळचीं वर्तमानपत्रें चाळलीं असतां, शास्त्रीबोवांनीं नोकरी सोडली यासंबधानें लोकांचा काय ग्रह झाला याचा खुलासा सहज होईलच. तथापि काठेवाडांतल्या एका संस्थानांतील आमच्या एका गुजराथी मित्राला त्याच्या दक्षणी स्नेही विद्वान् ग्रहस्थांनीं या सुमारास एक उपदेशपर पत्र लिहिलेलें, आम्हांस मिळालें आहे. त्यावरून हा खुलासा जास्त स्पष्ट होईल असें जाणून त्यांतला खालील उतारा एथें दिला आहे. प्रसिद्धीसाठीं लिहिलेल्या लेखापेक्षां खासगी पत्रव्यवहाराची वगैरे योग्यता कांहीं निराळी आहे हें सांगण्यास नकोच. या पत्रांत विष्णुशास्त्री यांचा संबंध आला आहे म्हणून मुद्दामच आम्ही तें पत्र मालकापासून मागून घेऊन संग्रह करून ठेविलें होतें विचित्र दैवगतीनें इतक्यांतच त्याचा उपयोग करण्याची वेळ आली !

"........તમારા ગયા પત્રમાં અને વળી હમણાના કાગળમાં પણ લખો છો કે તમારે તમારા ઉપરી સાથે બનતું નથી....... સાથે તમારો સંબંધ છે એવી લોકો અટકળ કરે છે. હું તમને

---

come of a kind of plethora of B.A.s ! And I believe that the day is not far distant that when the Government shouts qui hai, the chowbdar at Government house will be engaged with the A.D.C. in discussing some question of history; or perhaps the chowbdar will instruct the A. D.C. in waiting in Sanskrit.

Lord Reay's Speech—*July 16,-1886.*

મિત્રતરીકે ખુલ્લીરીતે લખું છું. કે બીજા લોકો ગમે તેવા મૂર્ખ કે દુષ્ટ હોય. તથા...એ લોકો ગમે તે કહે તો પણ આપ જો નોકરી કરવા ચાહતા હો તો તમારા ઉપરી સાથે વઢવાઢ કરવી સારૂ ગણાશે નહી. અને એ બાબત ફર્યાદ કરવી એ તો ઘણુંજ નઠારૂં છે. હું પણ જાણું છું કે તમારૂં કહેવું ખરૂં છે.........તથા ફલાનાને હું દોષિત ઠરાવીશ. અને હું જો કે બીજાને દોષિત ઠરાવીશ તોપણ તમને ઓછો ટપકો દઇશ એમ સમજાશે નહીં. તમારાથી જો મુંગા રહવાતું ન હોય તો નોકરી છોડી દેવી એ સારૂં છે. પણ એટલેથીજ જો પૂરૂં થતું હોય તો હું તમને ભાગ્યશાળી સમજીશ. કારણ સંવસ્થાનમાંના લોકોનું જીવિત ખાત્રી ભરેલું હોતું નથી. ઉપરીની ઇચ્છા વિરૂદ્ધ ગયાથી શા માઠા પરીણામ નિપજે છે તેનું ઉદાહરણ તરીકે અમારા દક્ષણમાં થોડા દહાડા ઉપર એક બનાવ બની આવ્યોછે. રા. વિષ્ણુશાસ્ત્રી ચિપળુણકર કરીને એક ગ્રેજ્યુએટ ગૃહસ્થ રૂ. ૧૦૦ ના પગાર ઉપર પુનાની હૈસ્કુલમાં માસ્તર હતા. એ ગૃહસ્થ વિદ્વાન છે તથા એમને મરાઠી ભાષામાં લખવાની ઘણી હોંસ છે. પણ તમે જેવા મનગમતા હઠીલા અને ઊંડા છો તેવા તે ન હતા. મને એવિશે ચોકસ ખબર નથી તો પણ તેમના લખાણમાં સરકારની વિરૂદ્ધ તથા સારાસારા વિદ્વાન લોકોને માઠું લાગે એવી ભારે ભાષા લખેલી હોય છે અને તેથીજ તેને નોકરી છોડી દેવા ફરજ પડી. એમ સાંભળાય છે. તે પણ ઘણા ધીરજવાન. હતા તેથી રૂ. ૧૦૦ ની નોકરી પર તેમણે લાત મારી. તેમના બાપનું સરકારમાં ઘણું વજન હતું. પણ તે શા ઊપયોગનું? સુખથી તે હાલ પુનામાં દાહડાં કાડે છે: એમણે કેટલીક ખાનગી નિશાળ કાઢી છે. તેથી શો લાભ થશે તે તો ખુલ્લું જણાય છે. અફસોસ! અફસોસ!! મને બિચારાની ઘણી દયા આવેછે. તે કદાચ નોકરીપર રહીને દેશની તથા દેશી ભાષાની સેવા બેશક વધારે કરી શકત; હવે તમારી હાલત એના થી તદન જુદી છે તે મને માલમછે ” ઇત્યાદી.

कायहो ! नामांकिताचे चिरंजीव, त्यावर आरंभीं वरिष्ठाचीही कृपादृष्टि, पण काय गृहस्थाला अवदसा आठवली पहा !—अशी अवहेलनात्मक टीका करून, व आपल्या वागणुकींत तर कोठें अशी चूक होत नाहींना याची पुनः पुनः खबरदारी घेऊन शास्त्रीबोवांच्या बरोबरीच्या व वडील अशा शेंकडो अळमळीत,गुंड्या, चाकरमान्या गृहस्थांनीं त्यावेळीं आपले ठिकाणीं समाधान मानून घेतलें असेल यांत शंका नाहीं !

कोंबडीविषयीं अशी गोष्ट सांगतात, कीं ती जेव्हां अंडीं उबवण्यासाठीं त्यांवर बसते,तेव्हां त्यांच्यांत कांहीं बदकांचीं अंडीं जरी नेऊन ठेवलीं तरी तिला तीं उमगत नाहींत व आपल्या अंड्यांप्रमाणें, तींही आपलींच आहेत असें समजून, त्यांस उबवते. पुढें अंडीं फोडून .पिलें बाहेर आलीं म्हणजे सुद्धां सर्व पिलें तिच्या भोंवतीं भोंवतीं उडत बागडत असतात. पण फिरतां फिरतां कोठें पाण्याचें डबकें आलें, कीं बदकांचीं पिलें चटकर आंत शिरून सरळ्या मारूं लागतात. काय विचारी ती कोंबडी व तिचीं पिलें !! हें पाहून त्यांचा व स्वतः तिचा एकच आकांत होऊन जातो कीं हीं बदकांचीं पिलें आतां बुडतील!आणि ती कोंबडी पंख फडफडवीत व चिवचिव शब्द करीत, त्या डबक्याच्या काठावर काकुळतवाणी गिरक्या घालूं लागते!! सरासरी अशीच स्थिति सर्व महाराष्ट्राची व विशेषेंकरून चाकरमान्या लोकांची या वेळीं झालीं असें म्हटल्यास चिंता नाहीं ! विष्णुशास्त्री यांनीं जें वर्तन केलें, तें याच्या शीलाला साजण्यासारखें होतें, तेंच केलें. इतरांस एकाएकी त्याची कल्पना कशी व्हावी?व त्यांस त्या-

त्या कृतीचा मोठा अचंबा वाटला यालो तरी कोणाचा काय उपाय ?

असो; शास्त्रीबोवा चाकरी सोडून मोकळे झाले येथपावेतों त्यांच्या आयुष्याचा दुसरा अंक समाप्त झाला. यापुढील त्यांचें चरित्र फार उदात्त आहे. "एवढी स्पर्धाभूत जी राजसेवा तिजवर पाणी सोडून" व "विद्याखात्याची व आपली फारखत करून घेऊन, मोकळे झाल्या" वर, त्यांनीं काय काय केलें व काय काय करण्याचा आराखडा घातला होता, हेंच काय तें आतां या तिसऱ्या अंकांत सांगण्याचें उरलें आहे. "इत उत्तर, अध्ययन, अध्यापन, व ग्रंथलेखन या तीन उद्योगांत आह्मी कालक्षेप करणार" असें मालेच्या एका अंकांत त्यांनीं कळविलें आहे.व असा संकल्प करून, ज्या कृत्यांस त्यांनीं आरंभ केला, त्या सर्वांची बरीच सविस्तर हकीगत, स्वतः शास्त्रीबोवांनींच आपल्या "मालेंत" वेळोवेळीं दिली आहे, हें सदर्हु मालेचे साठ, बहात्तर, आणि चौऱ्यांयशीं हे अंक पाहिले असतां कळेल. यास्तव त्याची पुनरुक्ति करीत नाहीं. ह्याच्या संबंधानें लिहिण्यासारखें आहे तेवढेंच संक्षेपानें लिहितो.

रत्नागिरीहून आल्यावर, शास्त्रीबोवांनीं आपल्या विद्यालयींल मित्रमंडळीची जुळवाजुळव करून, मोरोबादादाच्या वाड्यांत, एक इंग्रेजी शाळा, इ० स० १८८० त स्थापन केली. ती "न्यूस्कूल" ( नवी शाळा ) या नावानें प्रसिद्ध आहे. रा. बाळ गंगाधर टिळक व रा. महादेवराव नामजोशी यांचे सहाय्य त्यांस अगदीं अवल्लीपासून मिळालें व सदर शाळेची स्थापना

करण्याच्या श्रेयाचे ते वाटेकरी झाले. पुढें, रा. आगरकर, वामनराव आपटे वगैरे मंडळी, तेव्हां नुकतीच ग्राज्युएट झाल्यामुळें, कालेज सोडून जगाच्या उंबरठ्यांशीं येऊन, काय करावें काय नाहीं या विवंचनेंत होती, तीही लौकरच नव्या शाळेला येऊन मिळाली. आपण मोठ्या परिश्रमानें मिळविलेल्या उत्तम विद्वत्तेचें चीज व्हावयास व आपली तरुणपणाची महत्वाकांक्षा तृप्त व्हावयास या नवीन होतकरू मंडळीस राजाश्रयाखालीं कोठेंही अवसर दिसेना, यासाठीं त्यास 'नव्या शाळे' सारखे कांहीं उद्योग पाहिजेच होते. अशी स्थिती जाणून शास्त्रीबोवांनीं त्यांच्या कर्तबगारीचा उपयोग इष्ट कार्यांत करून घेतला ही केवळ त्यांच्या चातुर्याची गोष्ट होय; असें आह्मी समजतों. असो; ही मंडळी आल्यावर शाळेचें काम मोठ्या उमेदीनें चालू झालें.

या शाळेच्या संबंधानें एक गोष्ट लक्ष देण्यासारखी आहे.ती अशी कीं,'नवी शाळा' या हिच्या नामकरणांत नुसत्या शब्दांपेक्षां जास्त अर्थबोध असावा असें आह्मांस वाटतें—–निदान, शास्त्रीबोवांच्या एकंदर कृतीनें तरी, तशा अर्थबोधास तें पात्र झालें आहे असें ह्मणावयास कांहीं हरकत नाहीं.इंग्रेजींत "स्कूल" शब्दाचा अर्थ "एक प्रकारची शास्त्रपद्धति"व" तत्पद्धतीस अनुसरणारी मंडळी"असा आहे; व जवळ जवळ याच अर्थानें, मराठींतला "शाळा"शब्द बोलण्याचा प्रघात आहे असें दिसून येईल "आमक्या अमक्या गृहस्थाच्या घरची'शाळाच'चांगली" "त्याच्या घरची बाळबोध 'शाळा'." इ०वाक्यांत "विशेष शिक्षण पद्धति" "चालरीत" असाच 'शाळा' शा-

ब्दापासून बोध होतो. या दृष्टीनें पाहतां, अलीकडे ज्या नव्या सुधारलेल्या मतांचा प्रसार शास्त्रीबोवांच्या कृतींच्या द्वारा व अन्यद्वारा आमच्या लोकांत झाला आहे व होईल त्या मतांचें मूर्तिमान् स्वरूप ही " नवी शाळा" होय. आह्मांस वाटतें, असें शास्त्रीबोवांच्या शाळेंत साक्षात् शिकून जो छात्रवर्ग तयार होईल, किंवा या शाळेशीं ज्यांचें शिक्षणाच्या वगैरे संबंधानें नातें असेल तेवढेच केवळ नव्हत, तर ज्यांना ज्यांना शास्त्रीबोवांच्या कृति पसंत असतील, किंवा ज्यांच्या ज्यांच्य ह्मणून मनावर शास्त्रीबोवांच्या मतांचा संस्कार झाला आहे व होईल, त्या सर्वांसही " नव्या शाळेचे ( पद्धतीचे ) लोक" असें ह्मणावयास चिंता नाहीं. कारण शास्त्रीबोवांच्या लेखांनीं महाराष्ट्रांतील लोकमताला नवें वळण लाविलें यांत शंका नाहीं.

त्यांनीं जीं दुसरीं कृत्यें आरंभिलीं व कांहीं अगोदरच चालू केलीं होतीं तीं येणेंप्रमाणें:—— ( १ ) आर्यभूषण छापखाना, ( २ ) चित्रशाळा छापखाना, ( ३ ) किताबखाना, ( ४ ) काव्येतिहाससंग्रह नामक मासिक पुस्तक, आणि ( ५ ) केसरी, व ( ६ ) मराठा हीं अनुक्रमें मराठी व इंग्रेजी दोन वर्तमानपत्रें. याशिवाय तेव्हां त्यांची ( ७) " निबंधमाला" चालू होतीच; पण ती लौकरच संपवून " ग्रंथमालिका " काढावयाच्या दीर्घोद्योगास लागण्याकरतां त्यांनीं कंबर बांधली होती. वरील यादींत, चित्रशाळा, काव्येतिहाससंग्रह, व केसरी यांविषयीं विशेष उल्लेख करणें अवश्य आहे असें आह्मांस वाटतें. बाकीच्या कार्यांमध्यें

एकेक विवक्षित स्तुत्य उद्देश आहे खरा, तरी या तीहीं-च्या संबंधानें असें ह्मणावें लागतें कीं, आजपर्यंत न झालेलीं महत्वाचीं कामें यांनीं पूर्ण केलीं आहेत.

मार्मिकता हा गुण कांहींसा स्वभावजन्य आहे. तो शास्त्रीबोवांच्या अंगीं असल्यामुळें चित्रकलेसारख्या मनो-वेधक कलेकडे त्यांचें सहजच लक्ष गेलें. लहानपणापा-सून चित्रांची त्यास फार आवड असे. तरी ती पूर्ण करण्यास त्यांस अवसर मिळाला नाहीं. रा. बळवंत राव जोशी ह्मणून एक गृहस्थ मोजणीच्या खात्यांत नो-कर होते त्यांचा व शास्त्रीबोवांचा चांगला परिचय होता. त्यांस चित्रें काढण्याचा व लांकडावर कोरण्याचा फार नाद असे. ह्या कलेला उत्तेजन दिलें असतां,इंग्लंडातल्या प्रमाणें चित्रें तयार होऊन लोकांचा अनेक प्रकारें फायदा होईल असें त्यांनीं प्रथम शास्त्रीबोवांच्या मनांत भरविलें व या कलेकडे शास्त्रीबोवांचें स्वतः लक्ष असल्यामुळें त्यांच्या मनांत ही गोष्ट बिंबली. पुढें काव्येतिहाससंग्रह काढण्याचाही बेत झाला व जुन्या ऐतिहासिक पुरुषांच्या तसबिरा काढून घालाव्या असें ठरलें. त्याप्रमाणें कांहीं अंकांत, सवाई माधवराव, नाना फडणीस वगैरेंच्या तस-बिरा आल्या. पण त्या बऱ्याशा न निघाल्यामुळें तो बेत मग सोडून द्यावा लागला. तरी यानें एवढें झालें कीं त्यां-स या कलेची गोडी फार लागली व तिचा जीर्णोद्धार करण्याविषयीं त्यांचा निश्चय झाला. अलीकडे चित्रशाळेंत उत्तम चित्रें निघून तीं लोकांस अल्प किमतीस मिळूं लागल्यापासून, आपल्या लोकांमध्यें चित्रकलेंतील मार्मिकता बरीच वाढली,हें कोणास ही कबूल

केलें पाहिजे. पूर्वींच्या वेड्यावाकड्या तसबिरी जाऊन, त्यांच्या मोबदला, सुरेख चित्रांच्या तसबिरींनीं खेड्यापाड्यांतील सुद्धां घरांचे दिवणखाने, माजघरें, व देवघरें सुशोभित झालीं आहेत. चित्रशाळेचें अनुकरण पुष्कळांनीं केल्यामुळें, चित्रकलेचा बराच उद्धार झाला. असें ह्मटल्यास चिंता नाहीं.

"काव्येतिहासमंग्रहा" च्या प्रकाशनापूर्वीं "सर्वसंग्रह" नांवाचें पुस्तक मागें निघत असे. त्यांत नुसत्या जुन्या कवींच्या मराठी कविता मात्र छापत असत. पण सदर पुस्तकांत आणखी जुन्या बखरी, व संस्कृत कविताग्रंथ हे दोन अत्यंत महत्वाचे विषय जास्त येऊं लागले. ग्रांटडफ, एलिफन्स्टन व स्काट वगैरे हिंदी इतिहासकारांनीं ज्या बखरींचा मूळ आधार घेऊन इंग्रजींत इतिहास लिहिले, त्या जुन्या बखरीचा कालगतीनें समूळ नाश होण्याचाच समय आला होता, परंतु "काव्येतिहासमंग्रहा"नें तें भय नाहींसें करून, मराठींत इतिहास लिहिणारास उत्तम साधन करून ठेविलें आहे. या कामीं त्यांना रावसाहेब काशीनाथ नारायण साने व रा० जनार्दन बाळाजी मोडक यांचें चांगलें सहाय्य मिळालें.

तिसरें महत्कृत्य "केसरी" चा अवतार हें होय. एवढें स्वस्त व फिरून उत्तम पत्र मराठींतच काय, पण सगळ्या हिंदुस्थानांतील भाषांतही मिळावयाचें नाहीं, व आणखी कांहीं काळपावेतोंही होणार नाहीं. "केसरी" नें मराठी वर्त्तमानपत्रांच्या स्वरूपांत, लेखनक्रमांत व किमतींत केवढा बदल करून सोडला हें सर्वांच्या लक्षांत आहेच. मराठी भाषेच्या इतिहासांत

ही एक आठवणीची ठळक गोष्ट होऊन बसली असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

ज्या स्वतंत्रतेखातर शास्त्रीबोवांनीं इतका त्रास सोसला, तिचा अविछिन्न उपभोग घ्यावयास, व ज्या निर्मळ देशभक्तीनें त्यांनीं अनेक उपद्व्याप केले तिचें मधुर फळ चाखावयास, ते फार दिवस या अन्यायमय व जुलमी जगांत राहिले नाहींत. शास्त्रीबोवांसारखे मोहरे उत्पन्न करून त्यांच्यांत ब्रह्मदेव अल्पायुष्य घालतो हा त्याचा मोठाच अन्याय आहे असें एका कवीनें ह्मटलें आहे तें किती खरें आहे ! रत्नागिरीहून आल्यावर ३।४ वर्षांत, जी उद्योगपरंपरा त्यांनीं उभारली तिची नुकती मांडामांड कोठें होते आहे, नाहीं, तोंच, त्यांच्यावर काळानें झडप घातली; इ०स०१८८२त मार्च महिन्याच्या १७ तारखेला सकाळी ६॥ वाजतां त्यांचा काळ झाला. ते एकाएकींच मृत्यु पावले. एकवेळ ते तसवीर काढविण्यासाठीं ह्मणून दुकानीं गेले होते, तेथें घेरी येऊन खालीं पडले. यामुळें तोंडास वरकमी थोडी इजा झाली व सरासरी १५।२० दिवस ते साधारण अजारी होते. हाच अजार वाढून, शेवटीं नवज्वरानें त्यांचा शेवट झाला.

मोठा कलमबहादर, निःसीम देशभक्त, अत्यंत सद्गुणी, व खरा रसिक अशा या महापुरुषाचें अवतारचरित्र या ठिकाणीं आटपलें. निःसीम देशभक्तीनें, निःस्वार्थ लोककल्याणेच्छेनें आणि उत्कट भाषाभिवृद्धीच्छेनें जें अवाढव्य उद्योग शास्त्रीबोवांनीं उभे केले, त्यांचा नुकता आराखडा मात्र त्यांच्या हातून पडला.

त्यावर, त्यांच्याच हातें संपूर्ण तयार होऊन, भव्य मंदिरें उभीं आहेत, व त्यांच्या गोपुरशिखरांवर "नव्या शाळे" च्या लोककल्याणरूप पताका मंद वायूनें फडकत आहेत, असें पहाण्याचा शुभ योग आला असता, तर किती बरें झालें असतें! उत्पादकाच्या उत्साहावरून व हिमतीवरून पाहतां, या इमारतींची शोभा कांहीं अवर्णनीय दिसली असती; निदान ती जशी हल्लीं आपल्या दृष्टीस पडत आहे तिच्याहून खचितच अगदीं निराळी दृष्टीस पडली असती; व ती पाहून या उद्योपरंपरेच्या जनकास व सर्वलोकसमुदायास कांहीं स्वसंवेद्य विलक्षणच आनंद झाला असता यांत संशय नाहीं! दुर्बिणीनें सगळें आकाशमंडळ धुंडणाऱ्या एखाद्या हर्शेलास नव्या ग्रहाचें दर्शन झालें असतां ज्याप्रमाणें अत्यानंद व्हावा; किंवा अपार पश्चिम समुद्राचें ओलांडन करून व अनेक वावटळें सोसून आर्यभूमि सोधणाऱ्या एखाद्या कोलंबसास फार दिवसांच्या प्रवासानें बहामा बेटावरील्हा अंधुक टेंकडीकडे पाहून ज्याप्रमाणें मोठें कौतूक वाटावें; त्याप्रमाणेंच, कृतकार्यपरिसमाप्तीमुळें स्वतः शास्त्रीबोवांस व सर्वांस केवढें कौतुक व केवढें समाधान झालें असतें! तें कौतुक व तें समाधान एका गुणग्राहकास मात्र ठाऊक. पण तसा योग आला कोठें? सर्व आशा जागच्या जागींच राहून गेल्या, हें आमचें केवढें दुर्दैव!!

याप्रमाणें शास्त्रीबोवांच्या आयुष्यक्रमाचें साधारण स्वरूप आहे. वरील लेखांत, त्यांच्या ठिकाणीं वसत असणाऱ्या गुणदोषांचा निर्देश जागच्याजागीं केलाच आहे. तथापि ते विशेष विस्तारानें दाखविणें, त्यांचा

विकास कसकसा होत गेला हें सांगणें, व त्यांवर साधक बाधक प्रमाणसिद्ध टीका करणें, तसेंच, त्याच्या संबंधाचा महत्वाचा पत्रव्यवहार व दुसऱ्या अवांतर गोष्टी—ज्या त्यांच्या इष्टमित्रांस व आजूबाजूच्या गृहस्थांस मात्र ठाऊक असण्याचा संभव—त्या प्रसिद्ध करणें इत्यादि काम त्यांचें विस्तृत चरित्र लिहिणाराचें आहे. तसेंच, त्यांच्या लेखांचे गुणदोष काय, भाषासरणी कशी आहे, तींतील खुब्या काय आहेत, त्यांचीं मतें काय होतीं, त्यांचें पासून लोकांच्या मनावर काय परिणाम झालें, त्यांनीं आरंभिलेल्या उद्योगपरंपरेचें महत्व किती आहे, तिची प्रस्तुत स्थिति काय आहे व नीट चालविली असतां तिचे भावी परिणाम काय होतील आणि या सर्वांवरून या लोकनायकाच्या योग्यतेची पायरी कितवी बसते इत्यादि महत्वाच्या गोष्टींचा विचार होणें अवश्य आहे. यांतील पुष्कळ गोष्टी बऱ्याच वादग्रस्तही आहेत व त्यांचा समावेश एखाद्या विस्तृत स्वतंत्र ग्रंथांतच होणें रास्त आहे; यास्तव टीकारूप थोडा मजकूर मात्र येथें लिहून वरील गोष्टींचा उहापोह करण्याविषयीं मराठी भाषेच्या हितेच्छुंस सुचवितों.

शास्त्रीबोवांची जी मोठी कीर्ति ती ग्रंथकार या नात्यानें त्यांचें ज्ञान विशाळ असल्यामुळें व अनेक विषयांवर त्यांणीं आपली लेखणी चालविल्यामुळें, आमच्या देशासंबंधीं जेवढ्या म्हणून महत्वाच्या ठळक गोष्टी आहेत, त्या सर्वांवर त्यांचे विचार त्यांच्या लेखांत ठिकठिकाणीं भरपूर येऊन गेले आहेत. यास्तव त्यांच्या बुद्धीचें, त्यांच्या थोरपणाचें व त्यांच्या योग्यतेचें जें प्र-

माण बसवावयाचें, तें त्यांच्या विचारांवरून व मतांवरूनच बसविलें पाहिजे हें उघड आहे. तथापि हिंदुस्थानाच्या विद्यमान स्थितीकडे लक्ष दिलें असतां असें दिसून येतें कीं, ज्याला आपलें नांव करावयाचें असेल, व आपल्या हातून देशाचे थोडें तरी कल्याण व्हावें अशी ज्याची इच्छा असेल, त्याची इतिकर्तव्यता निव्वळ ग्रंथकार बनल्यानेंच आटपली असें होत नाहीं. जीर्ण झालेल्या व फार दिवसांपासून ओढगस्तीस आलेल्या हिंदुस्थानासारख्या देशांत शैथिल्याचा सर्वत्र एवढा जबर प्रभाव आढळतो, आणि क्रियादक्षतेची व चुणचुणितपणाची वृत्ति एवढी मावळलेली दृष्टीस पडते, कीं जे कोणी देशाच्या पुनरुज्जीवनार्थ कलमबहाद्दर बनतात त्यांस बोलल्याप्रमाणें कृतीही करून दाखवावी लागते. शिवाजीमहाराजाच्या हस्तें मराठ्यांचा उदय होण्याच्या पूर्वी, या देशाची स्थिति जशी प्रस्तुत आहे, तशीच थेट होती असें ह्मटल्यास चिंता नाहीं. तिला उद्देशून श्रीरामदासस्वामींनीं जें ह्मटलें आहे:—

क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे

विचारीं मना ! तूंच शोधून पाहे ॥

तें किती यथार्थ आहे! यास्तव शास्त्रीबोवांच्या योग्यतेचा विचार करावयाचा ह्मणजे, त्यांच्या विचारांचा व मतांचा विचार मुख्य असतांही, त्यांच्या वर्तनाचाच विचार येथें अधिक महत्वाचा आहे असें आह्मांस वाटतें. आणखी, एका इंग्रजी ग्रंथकारानें ह्मटलें आहे कीं, "कृती ही बिनचुक अर्थाची

भाषा आहे*" ह्मणजे कृतीवरून कोणाचें काय ह्मणणें आहे याचा निखालस निवाडा होतो. या दृष्टीनें पाहिलें तरी, शास्त्रीबोवांच्या मतांच्या खरेखोटेपणाची परिक्षा करतां येण्यासाठीं, अगोदर त्यांच्या वर्तनाविषयीं विचार करणें योग्य दिसतें.

शास्त्रीबोवांचें खासगी वर्तन फार शुद्ध व सरळ होतें. ते मनाचे मोकळे होते. त्यांस बोलावयास फारसें आवडत नसे. "निबंधमालेचे" कर्ते ह्मणून त्यांच्या भेटीच्या इच्छेनें, एकदा एक गृहस्थ त्यांच्याकडे गेले, तेव्हां दोघांचे नमस्कार होऊन हे गृहस्थ बैठकीवर बसले व शास्त्रीबोवाही बसले. बराच वेळ झाल्यावर शास्त्रीबोवा जवळच पडलेलें पुस्तक घेऊन वाचूं लागले व सदर गृहस्थही अंमळशानें उठून बाहेर आले; दोघांचें एक अक्षरही भाषण झालें नाहीं! हे गृहस्थ आमचे मित्र असून ते स्वतः वरील गोष्ट सांगतात. यावरून आह्मी एवढेंच समजतों कीं शास्त्रीबोवांचा स्वभाव फारच भिडस्त असून त्यांच्या ठिकाणीं बोलकेपणा अगदीं वसत नसावा. त्यांचा आवाज कोता व कांहींसा घोगरा होता, त्यांस त्यांचा उपाय नव्हता. पण ते आपल्या मित्रमंडळींत अगदीं प्रशस्तपणानें बोलत चालत. त्यांची चालचलणूक गरीब व भिडस्त होती. "निबंध मालें" तील एवढे पाणीदार लेख अशा मनुष्याच्या डोक्यांतून निघतात असें समजल्यावर कोणासही क्षणभर नवल वाटल्यावांचून राहत नसे. त्यांस उद्ध-

* Action is the language that never errs—*Burke.*

टपणा कधीं आवडला नाहीं; आणि जे कोणी उद्धटपणा करून बेपर्वाईनें वागत त्यांचा ते मनापासून फार तिटकारा करीत. यावरून, कित्येक चांगल्या चांगल्या ह्मटलेल्या गृहस्थांशीं त्यांचें वैमनस्य आलें.* स्नेहाला ते इतके उमदे होते व भोळसरही इतके होते कीं स्नेही ह्मणवून पुष्कळांनीं त्यांस फसविलें असें सांगतात; तरी शास्त्रीबोवानीं तोंडांतून ब्रसुद्धां काढला नाहीं. त्यांनीं कोणावर एकदा विश्वास ठेवला ह्मणजे ठेवला. तशींच लोभाची गोष्ट. त्यांच्या पसंतीला एकदा कोणी मनुष्य पडलें म्हणजे ते त्याचा कधींही अव्हेर करीत नसत. अंतःकरणाचे मायाळु; व त्या मायाळुपणाला शोभविणारें जें उदारपण, तेंही त्यांच्याठिकाणीं चांगलें वसत होतें. नाना फडके म्हणून एक वयोवृद्ध गृहस्थ, गरीब, त्यांच्या लोभांतले होते. या गृहस्थांनीं आपल्या लहानपणीं पेशवाईचा शेवटला शेवटला भाग पाहिला होता, व हे शास्त्रीबोवांच्या लहानपणीं त्यांस आपल्या अठवणीच्या पेशवाईच्या गतवैभवाच्या गोष्टी सांगत; व सांगतां सांगतां सद्गदित होऊन म्हाताऱ्याच्या

---

* मागें एका टिपेंत सांगितलेला, A Poet—turned a philosophor हा निबंध कै॰ कुंटे व शास्त्रीबोवा यांचें वरिष्ट नाबिदारपणाचें नातें उत्पन्न होण्यापूर्वी लिहिलेला आहे, व त्यांत, कुंटे यांचीं काव्यावरील मतें खोडून काढलीं आहेत. यावरून, कुंटे यांच्याशीं वांकडें आल्यामुळें शास्त्रीबोवांनीं त्यांची निबंधमालेंत फजीती उडविली असा जो कित्येकांचा ग्रह आहे तो निवळ खोटा आहे असें शास्त्रीबोवांस चाहणारी मंडळी ह्मणते. निबंधचंद्रिकेचे पहिले चार पांच अंक पहा.

डोळ्यांतून वारंवार टिपें गळत. या गोष्टी शास्त्रीबोवांस मनापासून आवडत, व पुनः पुनः सांगण्याविषयीं ते त्यांची विनवणी करीत. या गोष्टींनीं पूर्वीच्या वैभवाची बरीच कल्पना होऊन, देशाभिमानाच्या अंकुरास आरंभीं पाणी मिळालें असें शास्त्रीबोवा ह्मणत असत. या गरीब गृहस्थाच्या कुटुंबांत शास्त्रीबोवा आज मरेतोंपर्यंत दरमाहा पांच रुपये पोचवीत असत, असें त्यांचे एक मित्र सांगतात. याप्रमाणें त्यांचें खासगी वर्तन धुतलेल्या तांदुळांप्रमाणें निर्मळ व निर्दोष होतें.

धाकटे चिपळूणकरांची थोरवी सहन होत नसल्यामुळें त्यांस कोणत्यातरी मार्गानें हीनत्व आणण्यासाठीं कित्येक लोक असें वारंवार प्रतिपादन करतांना आढळतात कीं वडील चिपळूणकरांपेक्षां धाकट्यांचीच कांहो एवढी बढाई होत आहे ? ही मोठी आश्चर्याची गोष्ट नव्हेका ? परंतु अ ह्मास तर यांत कांहींच आश्चर्य नाहीं असें वाटतें. आह्मी असें ह्मणतों कीं दोघेही बापलेक विद्वान,बुद्धिमान व गुणी तर खरेच; हें कोणासही नाकबूल करतां येणार नाहीं; तरी दोघांच्या नीतिमत्तेविषयीं व कर्तृत्वाविषयीं विचार केला तर चिरंजीवांस वरच्या पायरीवर बसवावें लागेल व होत असलेल्या बढाईबद्दल त्यांचा हेवा करणाऱ्यांसही आश्चर्य करण्यास जागा नाहीं असें दिसून येईल.

सार्वजनिक वर्तनाविषयीं विचार करावयाचा झटला ह्मणजे एक मोठा विशेष—जो निर्मळ देशभक्ति—तो सकृद्दर्शनींच पुढें येऊन उभा राहतो. याविषयीं बो-

ळण्यापूर्वी दुसरें कांहीं विचार मनांत येतात त्यांचें दिग्दर्शन करतों.

जनसमाज हा एक महासागर आहे. त्यांत अनेकशः उसळणाऱ्या लाटांच्या श्रेणींप्रमाणें, लोकांच्या नानाविध क्रियांची व असंख्यात व्यापारांची खळबळ नेहमी चालत असून, त्याच्या प्रवाहाची गति एकसारखी पुढेंच चालू आहे. तथापि या प्रवाहाच्या पोटीं, तद्विरुद्ध दिशेनें आणखी एक प्रवाह, त्याच्या बरोबरीनें, जगांतील सर्व देशांत सर्वकाळीं वाहात आहे असें आढळतें. आतां या विरुद्ध प्रवाहाचा वेग आणि विस्तार हे कांहीं देशांत व कांहीं प्रसंगीं कमी जास्ती प्रमाणानें असतात असें खरें, तरी त्याचें अस्तित्व अजीबात नाहींसें झालेलें कधींच कोठें दिसून येत नाहीं. हा विरुद्ध दिशेनें वाहणारा प्रवाह कोणता ह्मणून ह्मणाल—तर समंजस असून, गरीब, साधे भोळे अशा लोकांचा व त्यांची कनवा बाळगणाऱ्यांचा समूह होय. अतिशय जुलमी राजांच्या एकछत्री राज्यामध्येंसुद्धां हा विरुद्ध दिशेनें वाहणारा प्रवाह निरुद्ध करण्याच्या नेहमी खटपटी चालू असतांही, त्याचा वेग कमी होत नाहीं, एवढेंच नाहीं पण, ज्या मानानें ह्याचा विस्तार कमी होतो त्याच मानानें त्याचा वेग वाढत जातो असें दृष्टोत्पत्तीस येतें. इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका इ० लोकसत्तात्मक देशांत तर ह्याचा वेग व विस्तार हे फार मोठेच आहेत. तथापि हिंदुस्थानांतही त्याचा सर्वस्वी अभाव नसून, धर्मप्रकरणांत त्याचा जोर विशेष दृष्टिगोचर होत आला आहे. मोठा पिट, फासेट, रिपन, बर्क, ब्राडला, ब्राइट, ग्लाडस्ट-

न इत्यादि इंग्लंडातील महात्मे पुरुष या विरुद्ध दिशेनें वाहणाऱ्या जनप्रवाहाचे पुरस्कर्ते होत. आणि बुद्ध, चैतन्य, नानक, ज्ञानदेव, तुकाराम, रामदास इत्यादि साधुवृंद हा हिंदुस्थानांतील जनप्रवाहाचे पुरस्कर्ते असून, धर्मसंबधानें साक्षात्, व परंपरया राज्यप्रकरणांत, असमंजस, गरीब, साध्याभोळ्या अशा लोकसमूहाची स्थिति सुधारण्यास व त्यांचीं सुखें व संतोष वाढविण्यास कारण झाले आहेत, असें विचार केला असतां दिसून येईल. आपल्या देशांतील या जनसमूहाचा स्वोन्नत्यर्थ जो यत्न चालू होता, त्याला अलीकडे इंग्रेजी शिक्षणानें चांगलेच चलन मिळालें व त्याचा वेग व विस्तार वाढून, तो राष्ट्रीयसभादिकांमध्यें अनेक रूपानें आविर्भूत होत आहे.

शास्त्रीबोवा हे विरुद्ध दिशेनें वाहणाऱ्या या जनप्रवाहाच्या पुरस्कर्त्यांपैकीं एक होत असें आह्मी समजतों. त्यांचा जन्म मध्यम स्थितीच्या कुळांत झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्यांचे वडिलांस बरीच मोठी सरकारी नोकरी मिळून कुटुंबाची स्थिति बरी झाली व विद्वत्तेमुळें उच्च वर्गाच्या मंडळींत ते मोडूं लागले, हें सर्व खरें, तरी त्यांनीं पूर्व स्थिति टाकली नाहीं हीच गोष्ट मोठी. ज्या जनसमूहांतून ते वर आले त्यांच्या कल्याणाकडे त्यांच्या मनाची नेहमी ओढ असे. धाकटे शास्त्रीबोवांनींही आपल्या वडिलांचेंच वळण धरलें. इंग्रेजी झाल्यापासून ज्याप्रमाणें या देशाच्या राज्यकारणी स्थितींत फेरफार झाला, तसा तो समाजरचनेंत ही होऊं लागला, या गोष्टी सर्वांस महशूर आहेत. जुनें सरदारी व दरबारी मंडळ मोडून, त्याचे जागीं इंग्रज लोकास

अनुकूळ असें जें नवें मंडळ तयार झालें, त्यांत, इंग्र . रकारानें आपलेसे करून घेतल्यामुळें इंग्रेजीस मिळालेले जुने सरदार वगैरे कांहीं थोडे लोक होते; तरी मोठा भरणा झटला झणजे, मूळचे गरीब स्थितींतले असून, नवीन इंग्रेजी विद्या संपादून मोठमोठ्या सरकारी चाकऱ्या मिळविलेल्या लोकांचा. असले लोक, अर्थात्, अर्ध्या हळखुंडानें पिंवळे होणारे असे असावयाचे, व त्याप्रमाणेंच ते होते. व त्याप्रमाणेंच त्यांचें वर्तन नवश्रीच्या मदानें उद्दाम, व पहिली स्थिति विसरल्यामुळें अनोळख्या. सारखें असें होतें. या इंग्रजी विद्वानांस इंग्रज सरकारानें तिसऱ्या प्रतीच्या व दुसऱ्या प्रतीच्या सरदारांत नेऊन बसविलें हें सर्वांस ठाऊक असेलच. अशा विद्वानांची दृष्टि, "ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी" या न्यायानें, उलटी होऊन, जिच्या योगानें ते उदयास आले त्या नव्या पद्धतीचे गुणानुवाद ते गाऊं लागले व दूरवर दृष्टि न देतां तिचेच पुरस्कर्ते झाले. या वेळीं, विरुद्ध दिशेनें वाहणाऱ्या जनप्रवाहाचा रोख बदलला ही गोष्ट नीट लक्षांत ठेविली पाहिजे. झणजे, पूर्वीच्या राज्यछत्राखालीं जे लोक बडे लोकांत मोडत होते, त्यांची सत्ता नाहींशी होऊन, ते दुर्बळ झाले व साधारण जनसमूहाचे पंक्तीस येऊन बसले, व या जनसमूहांपैकी ज्यांनीं इंग्रज सरकाराचा आश्रय केला, ते बडे लोकांत मोडूं लागले. अशा रीतीनें, एकदम उच्च पदवीस चढलेल्या मंडळींच्या ठिकाणीं जनप्रवाहाला अपायकारक असे जे, हांजीहांजीखोरपणा स्वजनांविषयीं अनास्था इत्यादि दुर्गुण प्रगट व्हावयाचे, त्यांचा यथा-

नुक्रमें प्रादुर्भाव होऊन, समाजांत कोणाचा कोणाशीं कसा संबंध याचा कांहींच धरबंध नाहींसा झाला, व सर्वत्र बजबजपुरी होऊन गेली. ही स्थिति अजून ही पुरी मोडली आहे असें नाहीं; तिची प्रतीति आपणा सर्वांस हल्ली ही नित्य येत आहे. अशा नव्या विद्वान सरदार मंडळींतच—थोरले चिपळूणकर काय आणि धाकटे काय—समाविष्ट होत. परंतु अश्चर्य काय!—कीं यांच्या आंगचें पाणी इतरांच्याहून अगदीं निराळें. जेव्हां जेव्हां प्रसंग पडले तेव्हां तेव्हां या दोघांनींही नव्या काळानुरूप जरी नवे मार्ग पत्करिले तरी ज्या समाजांतून आपण उदयास आलों त्या आपल्या गरीब बंधुवर्गाची त्यांनीं ओळख टाकली नाहीं असें उघड म्हणावें लागतें. थोरले चिपळूणकरांविषयीं त्यांच्या चरित्रलेखकानें म्हटलें आहे:— "दुसऱ्यांचे मर्जीखातर, आपला अभिप्राय एकीकडे ठेवून, प्रसंग पाहून बोलणें, हें त्यांस मुळींच आवडत नसे." तसेंच, "त्यांचे लोकसमूहाच्या हिताकडे चांगलें लक्ष असे." व म्हणून "ते सरकारी नोकरींत आपल्या योग्यतेप्रमाणें महत्पद पावले नाहींत." ही गोष्ट निःसंशय खरी आहे! वरिष्ठ अधिकाऱ्यांशीं व साहेबलोकांशीं हांजीहांजीखोरपणा करून त्यांच्या बरोबरीचे व त्यांच्या मागाहून झालेले विद्वान गृहस्थ, त्यांच्या पेक्षा मोठमोठाले पगार व अधिकार पटकावून बसले. परंतु कृष्णशास्त्री यांनीं, स्वाभिमान व देशाभिमान हे कायम ठेवून, आपल्यास जें मिळालें, तेवढ्यानेंच संतोष मानला. धाकटे शास्त्रीबोवांनीं तर वडिलांवर ही तान केली; व ज्या पुलावरून महत्पदप्राप्तीकडे जावयाचें त्याचे आधारभूत असे

जे खांब तेच उपटून टाकून, ज्या लोकसमूहांतून ते वर आले व ज्यांच्या कल्याणार्थ आजन्म खटपट करण्याचा त्यांचा मनोमय संकेत होऊन बसला होता, त्यांत ते येऊन मिळाले! शास्त्रीबोवांनीं नोकरी सोडल्यावर आपलें सर्व आयुष्य लोकहितार्थ खर्चण्याचा विडाच उचलला होता हें सर्वप्रसिद्ध आहे.*

वरील उपपादनावरून लक्षांत येईल कीं शास्त्रीबोवांचा वर्तनक्रम अशा प्रकारचा होता कीं त्यावरून त्यांच्या निर्मळ देशभक्तीविषयीं कोणासही शंकाच येऊं नये. आतां देशभक्ति म्हणजे काय हें पाहूं. देशभक्ति ह्मणजे देशाविषयीं भक्ति. अर्थात् देश ह्मणून कोणी एक जीवंत व्यक्ति आहे तर त्याची भक्ति करावयाची, असें नाहीं; देश म्हणजे देशांतील लोक---देशांतील समंजस साधेभोळे, गरीब लोक---समाजांत ज्यांचा वर्ग मोठा आहे ते. अशा मंडळींतीलच शास्त्रीबोवा हे एक होते व अशांच्या पैकींच त्यांनीं आपल्यास करून घेतलें होतें. तसेंच अशा वर्गांतील लोकांच्या उन्नतीसाठीं

* या ठिकाणीं, इ० स० १८८९ सालीं मुंबई मुक्कामीं जमलेल्या राष्ट्रीयसभेच्या मेळ्यामध्यें जनहितैकपक्षपाती मि० ब्राडला यांच्या भाषणांतील शब्दांची कोणास आठवण होणार नाहीं?

And as to my force that I may have had in advocating the cause of those to whom I belong at home, let me say I was sorry to hear, that I was thanked for my work in the popular cause. For whom should I work, if not for the people?—Born of the people, trusted by the people, I will die for the people!

*Indian National Congress Report* V. *1889.*

आणि कल्याणासाठीं, त्यांचे सर्व यत्न चालले होते. “ आमच्या पूर्वींचें विद्वान्मंडळ फार झालें तर आपले ठिकाणींच रममाण होत असे, ” पण “ आह्मीं आपल्या देशबंधूंची आठवण ठेवली, ” त्यांस विसरलों नाहीं. हें भाषण त्यांच्या अंतकाळच्या शेवटच्या घटकेंतलें आहे. तेव्हां अशा माणसाच्या निर्मळ देशभक्तीविषयीं कोणास तरी शंका येईल काय ? आणि अशी देशभक्ति जर खरी नव्हे, तर खरी तरी कोणची म्हणावी ?

शास्त्रीबोवांची देशभक्ति शुद्ध अंतःकरणाची असल्याकारणानें, देशाभिमान व लोककल्याणेच्छा हे गुण त्यांच्या ठिकाणीं उत्कटत्वानें वसत होते. देशाभिमान व लोककल्याणेच्छा हीं देशभक्तीचीं कार्यें होत. झाडास जशा शाखा तसे देशभक्तीच्या अनुषंगानें हे गुण यावयाचे. देशभक्ति एकदा अंतःकरणांत बाणली ह्मणजे आपल्या देशबंधूंचें बरें करण्याची साहजिक इच्छा उद्भवते. स्वदेशावर शास्त्रीबोवांचें किती प्रेम होतें व आपल्या देशबांधवाच्या कल्याणाविषयीं केवढी कळकळ वसत होती याची प्रतीति आपल्यास त्यांच्या लेखांवरून चांगली येतेच. या शिवाय त्यांनीं जी उद्योगपरंपरा उपस्थित केली होती ती वरून, नुसती तोंडाची वटवट करूनच स्वस्थ न बसतां, कांहीं तरी चिरकालिक व खऱ्या हिताचीं कृत्यें आपल्या हातानें घडावीं व इतरांस खऱ्या देशहिताचा मार्ग दाखवावा अशी त्यांची फार इच्छा होती, असेंही स्पष्ट दिसून येतें.

तसेंच देशभक्तीमुळें आपल्या देशासंबंधीं प्रत्येक वाईट

ऱ्या गोष्टीविषयीं मनुष्यास आवड व अभिमान वाटूं लागतो. ती आवड व तो अभिमान एका देशभक्तासच ठाऊक. आतां ही आवड व हा अभिमान वाईट गोष्टीविषयीं न वाटूं देणें हें मात्र समंजस मनुष्याचें काम आहे. शास्त्रीबोवांच्या ठिकाणीं जरी देशाभिमान वसत होता, तरी हरएक वाईट गोष्टीविषयीं त्यांची सर्वदा अनास्थाच असे; वाइटाबद्दल त्यांनीं कधीं हेका किंवा दुरभिमान धरला नाहीं. 'लोकभ्रम,' 'अनुकरण' इत्यादि निबंधांवरून हें उघड दिसून येतें. तसेंच, "सत्यनिरूपणाचा आमचा उद्देश आहे." "आमची चुकी आम्ही खुशाल कबूल करूं" इत्यादि उद्देश त्यांनीं "माले"च्या आरंभीं व पुढें ही वारंवार कळविले आहेत. आणखी, ते एके ठिकाणीं स्पष्ट ह्मणतात:—

"आह्मास ही गोष्ट कबूल आहे कीं, आपल्या देशांतली एखादी गोष्ट असली ह्मणजे तेवढ्यावरून तिची तारीफ करावी, किंवा तिचा वास्तविक दोष असेल तो छपविण्याचा प्रयत्न करावा हे दोन्ही प्रकार अश्लाघ्य होत; जो आपणास न्यायी व निष्पक्षपाती ह्मणवितो त्यास वरील दोनही गोष्टी खपावयाच्या नाहींत हें उघड आहे."*

देशाभिमानाप्रमाणें, शास्त्रीबोवांच्या ठिकाणीं स्वधर्माभिमानाची वृत्ति ही फार प्रबळ होती. यदृच्छेनें ज्या हिंदु समाजांत ते जन्मास आले, त्या समाजाला संमत असलेला हिंदुधर्म त्यांस जन्मतःच प्राप्त झाला होता, आणि यामुळें तो त्यांस अत्यंत मान्य

---

* निबंधमाला, अंक ७५. कुळकरण्यांची आवृत्ति, पान ११८४.

व पूज्य ही वाटत असे. हिंदुधर्माविषयीं त्यांणीं एके ठिकाणीं असें स्पष्ट सांगितलें आहे:—

"आज दोन वर्षांच्या झोकावरून आमच्या वाचकांच्या लक्षांत आलें असेलच कीं, प्रभु येशु, महंमद, राममोहनराय, पाळंदे, किंवा दयानंद सरस्वती यांपैकीं आह्मी कोणाचेही चेले नसून, त्यांच्या पंथांकडे आमचा विशेष ओढा आहे असें नाहीं. तसेंच वरील समाजमार्गांच्या अनुयायांस सांप्रत चालू असलेला हिंदुधर्म जसा केवळ उपहास्य व उच्छेद्य वाटतो, त्यांत गुणाचा लेश ही नसून दोषांनीं मात्र तो ओत प्रोत भरला आहे, व या भरतखंडाच्या उन्नतीस तोच मुख्यत: मोठा जबरदस्त अडथळा आहे असें वाटतें, तसेंही पण आह्मांस बिलकुल वाटत नाहीं."*

अगदीं वरवरही जो कोणी शास्त्रीबोवांचे लेख वाचून पाहील, त्याच्या ही गोष्ट सहज लक्षांत येईल कीं, साक्षात हिंदुधर्माच्या विरुद्ध तर काय—पण हिंदुधर्मांत मोडणाऱ्या चाली रीति, पुरातन काळापासून चालत आलेले आचारविचार, अनेक प्रकारचे संप्रदाय, मतें, वगैरे हरएक गोष्ट—कीं जिचा हिंदुधर्माशीं एकजीव होऊन गेला आहे अशी सर्व साधारण समजूत होऊन बसली आहे—अशांविषयीं त्यांणीं प्रतिकूळ असें कोठें ही लिहिलें नाहीं; एवढेंच नाहीं तर याच्या उलट असें मात्र वारंवार आढळेल कीं, लिहिण्याचा ओघ कसाही असो, तरी त्यांणीं 'सनातन

---

* निबंधमाला, अंक २४. कुळकरण्यांची आवृत्ति, पान ४०१.

हिंदुधर्मा' ची एकसारखी तरफदारीच केली आहे. हिंदुधर्माला दूषण दिलेलें किंवा जाणून बुजून त्याची टवाळी केलेली त्यांस यत्किंचित ही कधीं खपली नाहीं. जा धर्म आज एवढा प्राचीन काळापासून अबाधित चालत आला आहे व ज्यामध्यें शेकडों उलथापालथी झाल्या, व इतर धर्माकडून अतिशय पीडा सोसावी लागली तरी जो कायमचा कायमच, त्या धर्माला ज्याला पाहिजे त्यानें हवें तसें दूषण द्यावें अशी गोष्ट नाहीं. त्यांतील रहस्यांचा थांग चांगल्या निर्मळ निष्पक्षपाती व विचारवान् मनुष्यांसही लागणें कठिण; मग तेथें साधारण मनुष्यानीं मूर्खपणानें भरकटत जावें ह्मणजे काय गोष्ट ह्मणावी!

त्यांत ही, जे कोणी परधर्माची निंदा करून दुसऱ्यां पुढें स्वधर्माचें थोडांड माजवूं पाहतात, त्यांचा तर शास्त्रीबोवांस मोठाच राग येत असे. अशा लोकांचा खरपूस समाचार घेण्यांत त्यांणीं अगदीं आळस केला नाहीं. हिंदुधर्माचे मोठे निंदक ह्मटले ह्मणजे ख्रिस्ती प्रेषित, व त्यांच्या शिकवणीनें, डोळे मिटून त्यांचेच अनुकरण करणारे, प्रार्थनासमाज, आर्यसमाज, इत्यादि पंथांतील सुधारलेली मंडळी, हे होत; त्यांस जातां येतां टोला दिल्यावाचून शास्त्रीबोवांची लेखणी बहुत करून कधीं पलीकडे गेली नाहीं. त्यांच्या निबंधमालेचीं जरा पानें चाळलीं असतां, याचा प्रत्यय यावयास मोठी अडचण पडेल असा अर्थ नाहीं. हिंदुधर्माला प्राणभूत अशी जी चतुर्वर्णात्मक समाजरचना, जिचा इतर धर्माच्या लोकांनां मोठा अचंबा वाटतो, तिच्यावर, व तिच्यांतील पहिला जो ब्राह्मण वर्ण

त्याच्यावर परधर्मीयांचा व समाजभक्तांचा केवढा कटाक्ष आहे, तो जगजाहीर आहे. व हें जाणूनच ब्राह्मणांवर हंमेश येणाऱ्या खऱ्याखोट्या दूषणारोपाचें विवेचन करून खंडन करणें त्यांस अगत्याचें वाटलें. ‘ लोकहितवादी ’ करील वगैरे निबंधांत या विषयावर त्यांनीं बरेंच लिहिलें आहे, तरी तें स्फुटरूपानें आलें असल्यामुळें, पुरेसें न वाटून, केसरी निघू लागल्यानंतर थोड्याच अवकाशानें, त्यांनीं या विषयावर पुनः लेखणी उचलली व ‘ ज्याचा त्याचा ब्राह्मणांवर कटाक्ष ’ या सद्राखालीं बराच सविस्तर व स्वतंत्र लेख लिहिला. शास्त्रीबोवांच्या सर्वच लेखांप्रमाणें हाही चांगला वाचनीय असा उतरला आहे हें सांगणें नको. तथापि त्यांतील कोटीक्रमाकडे, व परपक्षाचे आरोप कबूल करून, दूषणांसही कसें भूषण आणलें आहे इकडे लक्ष देण्यासारखें आहे. याशिवाय, आवेश, वक्तृत्व इत्यादि गुणांनीं विशिष्ट अशा उत्कृष्ट भाषासरणीचेंही हें एक ठळक उदाहरण आहे. सगळ्या जगास पूज्य व पुरातन अशा ईश्वरप्रणीत वेदादि ग्रंथांविषयीं व ऋषिप्रणीत दुसऱ्याही धर्मपुस्तकांविषयीं आमची किती पूज्यबुद्धि असली पाहिजे व इंग्रजीच्या गंधानें सुधारक बनलेल्या आमच्या मंडळीची ती कशी आहे याविषयीं ‘ वेदार्थयत्न ’ नांवाच्या नामशेष मासिक पुस्तकावर टीका करीत असतांना त्यांनीं फार चांगलें प्रतिपादन केलें आहे. याप्रमाणें वर सांगितल्या ठिकाणीं व इतर पुष्कळ ठिकाणीं केलेल्या

उल्लेखांवरून त्यांच्या स्वधर्माभिमानाविषयीं कोणासही संशय येईल असें वाटत नाहीं. ८५

शास्त्रीबोवांचा घरांतील नित्यक्रम कसा होता याविषयीं आह्मांस जी माहिती समजली आहे, तीवरून ते ह्मणजे मोठे अग्निहोत्री असून, श्रोत्रीय ब्राह्मणाचा आव घालीत होते असा जरी अर्थ नव्हता, तरी त्यांची पद्धत चौकचारीची व शिष्टसंप्रदायास अनुसरून होती असें ह्मणावयास हरकत नाहीं. ह्मणजे, सुधारक मंडळी प्रमाणें अगदींच भ्रोष्टपणा न करतां,साधारणपणें गृहस्थस्थितीला आवश्यक असें नित्य ब्रह्मकर्म ते चालवीत असत, असें समजतें. शास्त्रीबोवांच्या मरणसमयींची एक गोष्ट एथें दाखल करून ठेवण्यासारखी आहे. ती अशी कीं, अगदीं अंत्यावस्थेंत डाक्टराचें कांहीं इंग्रेजी औषध प्यावयास गलासांत घालून त्यांच्या पुढें केलें असतां, तें अपवित्र अतएव अपेय आहे व पुनः गलासांत—कांचेच्या भांड्यांत घालून दिलें आहें म्हणून ते पीनात, इतकेंच नाहीं पण हातांत दिलें असतां तें त्यांणीं एकदम फेकून दिलें. या गोष्टींत किती तथ्यांश आहे हें जरी सांगतां येत नाहीं, आणि "याही पेक्षां धर्माच्या हेकटपणानें जें पिसें अंगांत शिरतें त्याला तर कांहीं सीमा आहे काय?"*

या शास्त्रीबोवांच्या अभिप्रायांशीं वरील गोष्टीचा मेळ घालतां येणें जरी कठिण आहे, तरी ज्यापेक्षां ती आम्हांस त्यांच्या आजूबाजूस वापरणाऱ्या मनुष्याकडून कळली आहे त्यापेक्षां ती नमूद करून ठेवावी हें आम्हास बरें दिसतें.

* कुळकर्णी यांची आवृत्ति—निबंधमाला पान २४६.

वरील मजकुरावरून व शास्त्रीबोवांचे वर सांगितलेले लेख वाचले असतां त्यांवरूनही, ते पक्के हिंदुधर्मी होते, त्यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता, दृढ निष्ठा होती, व डोळे मिटून ते त्यास अनुसरत असत, असा सकृद्दर्शनींच कोणाचाही सिद्धांत होऊन जाईल. व याप्रमाणेंच, शास्त्रीबोवांस मनापासून चाहणाऱ्यांपैकीं बहुतेकांचा समज झाला आहे यांत संशय नाहीं. कारण शास्त्रीबोवांच्या किंवा त्यांच्या सारख्या मतांचा अनुवाद करणारीं, केसरी, पुणेंवैभव, जगद्धितेच्छु, नेटिवओपीनियन वगैरे शहरी पत्रें, महाराष्ट्रांतील इतर ठिकाणचीं बहुतेक पत्रें, निबंधचंद्रिका वगैरे मासिकपुस्तकें यांवरून आणि मित्रमंडळीच्या वगैरे संभाषणांवरून पुष्कळांचा सदर प्रमाणेंच ग्रह झाला असल्याचें दिसून येतें. परंतु शास्त्रीबोवांच्या लेखांचा अंमळ जास्त विचार केला असतां व विषयांच्या संगतीकडे लक्ष दिलें असतां, त्यांच्या धर्मविषयक मतांविषयीं आम्हास कांहीं निराळा बोध होतो हें सांगितल्यावाचून राहवत नाहीं. तो अर्थात् हा कीं, त्यांनीं हिंदुधर्माचा अभिमान धरला होता ही गोष्ट खोटी नव्हे; तरी तो अभिमान विश्वासजन्य होता असें मात्र ह्मणवत नाहीं; तर देशभक्तिजन्य होता असें आमचें मत आहे. म्हणजे त्यांस स्वदेशाविषयीं जें अत्यंत प्रेम होतें—आणि तें किती होतें त्याचा मासला, त्यांनीं आपल्या 'डाक्टर जान्सन'च्या चरित्रामध्यें त्याच्या स्वदेशप्रीतीची स्तुति करीत असतांना चांगला दाखविला आहे—त्यामुळें, विस्कळित होत चाललेल्या हिंदुसमाजास बंधनरूप जो हिंदुधर्म, त्या-

चा अभिमान त्यांस वाटूं लागला इतकेंच. पूर्वीच्या आख्येच्या श्रीमंतांस दीन दशा प्राप्त झाली असतां साधारणपणें मनुष्यास त्यांची जशी कींव व करुणा येते तशी अनाथ हिंदुधर्माविषयीं, शास्त्रीबोवांसारख्या दयाभूत अंतःकरणाच्या उदार मनुष्यास यावी हेंही स्वाभाविक आहे.

मनुष्य कितीही ज्ञानी असला तरी लहानपणापासून त्याच्या मनावर ज्या गोष्टींचा संस्कार झाला असतो, त्यांतून त्याची पुढें सर्वस्वी सुटका होणें कठिण आहे. धर्मविषयक समजूत ही अशांपैकींच एक संस्कार आहे. साधारण मनुष्यांस तर या संस्काराच्या पेंचाला क्षणोक्षणीं किती वाकावें लागतें हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. परंतु जे चांगले ज्ञानी आहेत व अमुक गोष्टी वाईट आहेत अशी ज्यांच्या मनाची खात्रीही झालेली असते अशा मनुष्यांसही चिरपरिचित समजुतीच्या चिकाटींतून सहसा सुटवत नाहीं असेंही विचाराअंतीं दिसून येईल.*

---

* वरील विधानाचें एक चांगलें उदाहरण निबंधमालेंतच आम्हांस आढळलें आहे. 'भूत, पिशाच व शकुन' या प्रमाणें 'तिथि, नक्षत्र, योग व मुहूर्त' इत्यादिकांवर शास्त्रीबोवांचा विश्वास नव्हता हें त्यांच्या 'लोकभ्रमा' वरील निबंधावरून सर्वांस ठाऊक आहे. परंतु प्रसंगोपात्त त्यांच्या हातून खालील लेख एके ठिकाणीं लिहून गेला आहे.

"आपला व पुष्कळ लोकांचा अभिप्राय कळविणें हें ज्या अर्थी पुस्तककर्त्याचें कर्तव्य होय ............त्या अर्थी वर सांगितलेला 'टळटळीत अवसेच्या शुभमुहूर्तावर' जो विवाह झाला तो चमत्कारिकच असें म्हटल्यावाचून राहवत नाहीं......

अमुक गोष्ट आपल्यास पसंत नाहीं, पण शुद्ध लोकाचा-रास्तव आपण ती करीत आहों अशी लोकांची व आपल्या मनाची ते समजूत घालोत; तरी तसें करण्यांत त्यांच्या मनाचा कल तिकडे कांहींच नसतो असें मात्र निखालस ह्मणवणार नाहीं. मनुष्याच्या मनाच्या ह्या गुणामुळें, त्याचे शारीरिक व्यापारही तसेच बनत जाऊन त्यास हळू हळू तशा अनेक सवई सुद्धां लागतात. हें तत्त्व जर लक्षांत ठेवलें, तर गृहस्थावस्थेचा अनुभव घेतल्यावर सन्यास घेतला असतांही, आंघोळ करून शेंडी झाडण्याला हात जावा यांत कोणासही मोठें नवल वाटणार नाहीं. मीमांसकांच्या कर्मकांडाचा पाडाव करून ज्ञानमार्गाच्या पायावर रचलेल्या ब्रह्मवादाचा खटाटोप ज्यानें केला त्याच ब्रह्मजगद्गुरु आचार्यांस संध्योपासनादि कर्मांनीं सोंडलें असें नाहीं. एवढेंच काय पण ब्रह्मोपदेशाचा अधिकार मिळण्यासाठीं कर्मोपासनाही आवश्यक आहे अशी युक्ति त्याणीं काढली. तुकाराम, रामदास यांस जरी चालत आलेल्या हिंदुधर्माच्या संस्थांत दोष वाटले व त्यांनीं कर्ममार्ग टाकून ईश्वरोपासनेचाच एवढा उपदेश केला तरी त्यांसही नित्यनैमित्तिक कर्ममार्ग टाकून देववला नाहीं. ग्रीक तत्ववेत्ता व नास्तिक-

पुनर्विवाहाबद्दल शास्त्रार्थ मिळण्याची जर त्यांनीं एवढी खटपट केली, तर आज पांच सात वर्षें लोटलीं नाहींत तोंच सारें शास्त्र एकीकडे गुंडाळून ठेवून, सूर्यचंद्राच्या दृष्टीआड व पुरतें वेदाक्षरही न उमटूं देतां लटुपटीच्या खेळाप्रमाणें सारा विधि एका चार घटकेंत अटपून टाकला ! इत्यादि.”

अंक ४० कुळ० आवृत्ति पान ७९३.

शिरोमणि जो साक्रेटीज, याच्या विषयीं तर असें लिहिलें आहे कीं आपल्या नास्तिक मतांचा उपदेश करून देशांतील तरुण मुलांची मनें त्यानें बिघडविलीं या सबबी वरून त्याला सरकारांतून देहांत शिक्षेचा हुकूम झाला व त्याप्रमाणें तो मरण्यासही तयार झाला. इतकी त्याची स्वमतांविषयीं खात्री असतांही त्यानें आपल्या शिष्यमंडळीस ग्रीक देवांची पूजा करण्याविषयीं उपदेश केला व अगदीं मरते मरते समयीं एस्क्युलेपिअस देवास आपल्या नांवानें एक कोंबडें बळी देण्यास बजावून सांगितलें. हें केवळ सरकाराच्या रोषास भिऊन त्यानें सांगितलें असेल, व देवाविषयीं जी पूज्यबुद्धि तिच्याकडे त्यांचें मन कांहींच वळलें नसेल असें कोण ह्मणेल?*

याच तत्त्वास अनुसरून शास्त्रीबोवांचीं मतें कांहींशीं हिंदुधर्माला अनुकूळ अशीं झालीं असलीं तर त्यांत मोठेंसें नवल नाहीं. तशांत, स्वतः उत्तम ब्राह्मणकुळांत त्यांचें

---

* It may be added that as in religion, so in politics, few even of those who are enlightened enough to comprehend the meaning latent under the emblems of their faith, can resist the contagion of the popular superstition. Often when they flatter themselves that they are merely feigning a compliance with the prejudices of the vulgar, they are themselves under the influence of those very prejudices. It probably was not altogether on grounds of expediency that Socrates taught his followers to honour the gods whom the state honoured and bequeathed a cock to Esculapius with his dying breath.

Macaulay—*On Hallam's constitutional History.*

जन्म झालें असून हिंदुधर्माचे व त्यांतही ब्राह्मणधर्माचे पुरस्कर्ते जे गोब्राह्मणप्रतिपालक पेशवे, त्यांच्या राजधानीमध्यें त्यांचें लहाणपणापासून एकसारखें वास्तव्य, खिस्ती धर्माचें खंडन करण्याची वडिलांपासून मिळालेली दीक्षा, हिंदुधर्माची 'ना कोणी धनी ना कोणी गोसावी' अशी अनाथ स्थिति इत्यादि आणखी गोष्टी त्यांच्या मनांत हिंदुधर्माविषयीं पक्षपात उत्पन्न करावयास कारणीभूत झाल्या असतील यांत शंका नाहीं.

निबंधमाला सुरू झाल्यावर दुसरेच वर्षाचे अखेरीस शास्त्रीबोवा लिहितात:-"प्रस्तुत (धर्म) एकंदर विषयावर, व विशेषत: आमच्या अत्यंत निंद्य मानलेल्या हिंदुधर्माविषयीं आम्ही अवकाशानुसार आपलीं मतें आमच्या वाचकांस सादर करूं; तेव्हां वरील दोन नव्या निघालेल्या (प्रार्थनासमाज व आर्यसमाज) पंथांविषयीं आमचे विचार यथास्थित प्रगट करण्यांत येतील."* हें आश्वासन नीटपणें तडीस न्यावयाचा योग आला नाहीं याचें फार वाईट वाटतें. तसा योग आला असता तर त्यांची धर्मविषयक मतें कशीं काय होतीं याविषयीं आपल्यास पूर्ण माहिती होऊन लोकांस धर्मासारख्या अडचणीच्या गहन वनांतून फिरण्याला प्रस्तुत स्थितीला सुगम असा एखादा मार्ग मिळालासें झालें असतें. परंतु, केसरींत त्यांणीं "धर्म" या सदराखालीं एक निबंध लिहिला आहे तो व मागें सांगितलेलें 'ब्राह्मणांवरील

* निबंधमाला-हितेच्छूच्या पत्रास उत्तर. पान ४०२, कु० यांची आवृत्ति.

आरोपांचें ' प्रसंगोपात्त खंडन, या दोहोंवरून काय ती त्यांच्या धर्मविषयक मतांविषयीं आपल्यास माहिती मिळावयाची प्रस्तुत सोय उरली आहे.

हिंदुधर्माविषयीं शास्त्रीबोवांच्या मतासंबंधानें जें वर विधान केलें आहे तें त्यांस चाहणाऱ्या मंडळीस व हिंदुधर्माच्या कैवाऱ्यांस विशेषतः आवडणार नाहीं व पसंतही पडणार नाहीं, हें आम्ही समजून आहों. तथापि तें खरें असल्यामुळें व त्याला आधार त्यांच्या लेखांचाच असल्यामुळें तें नाकबूल करून ही उपयोग नाहीं. प्रस्तुतचा काळ हा स्वातंत्र्योत्कर्षाचा आहे. या वेळीं व्यक्तिस्वातंत्र्याकडे सर्वांचें लक्ष इतकें वेधलें आहे कीं धर्माच्या बंधनांस कोणी जुमानतील असा अर्थ नाहीं. धर्मबंधनें शिथिल होऊन, त्यांच्या जागीं परस्परांस सोईकर असून, फिरून प्रत्येकास हवें तसें वागण्यास स्वातंत्र्य मिळावें अशीं नवीन सामाजिक बंधनें तयार होण्याकडे अलीकडे जगाचा कल आहे, अशा समयास शास्त्रीबोवांसारख्या विचारशील व पाश्चात्यविद्येंत निपुण अशा मनुष्यानें धर्मबंधनांनीं गुर्फाटून जाणें ह्मणजे अशक्यच समजलें पाहिजे. या आमच्या ह्मणण्याच्या प्रत्यंतराकरतां त्यांचें धर्म या विषयावर साधारण काय मत होतें हें पाहूं या. 'डाक्टर जान्सन' या निबंधांत ते सांगतात.–

" असल्या ( धर्मासारख्या ) वादग्रस्त विषयावर उगाच हुजत घेत बसणें व एकमेकांच्या रिकाम्या कुटाळक्या करण्यांत कालक्षेप करणें यांत कांहीं जीव नाहीं. हें करण्यापेक्षां जो धर्म ज्यास जन्मतः प्राप्त झाला आहे, त्यासच अनुसरून, त्यांतच सदाचरणाचा

व परमार्थाचा जो मार्ग त्यास सापडेल, तो त्यानें स्वीकारला असतां कलहाचें तोंड मिटेल, अमूल्य काळाचा अपव्यय होणार नाहीं, व खरी धार्मिकताही जगांत वाढेल असें आह्मांस वाटतें."*

या ठिकाणीं धर्मविषयक औदासिन्य जें केवळ मुग्ध ठेवलें आहे तें केसरींतील "धर्म" या सदराखालील निबंधांत अगदीं स्पष्टपणें प्रगट केलें आहे. हें 'धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम्' असें जें त्यावर शिरोऽवतरण केलें आहे त्यावरूनही सहज दिसून येतें. "सर्वच धर्म खरे होत" किंवा "मनुष्यांस सर्वच धर्म मृगजळाप्रमाणें चकवितात" असा त्यांच्या मनाचा ग्रह होऊन, ह्यूम, गिबन, लाक या नास्तिक तत्त्ववेत्त्यांप्रमाणें जरी नाहीं, तरी बेकन, मिल्टन इत्यादि महाजनांचा पंथ त्यांनीं अनुसरला होता. ह्मणजे ते जसे ख्रिस्ती होते खरे तरी त्यांच्या मतांचा रोख एकंदरीनें पाहिला तर नास्तिकपणाकडेच होता, किंवा अगदीं बरोबर ह्मटलें ह्मणजे, धर्मासंबंधानें सर्वांस पूर्ण मोकळीक असावी, कारण ईश्वराविषयीं ज्ञान हें मनुष्य दृष्टीच्या आटोक्या बाहेर असल्यामुळें त्यावर विचार करण्याचा व त्या विचारानुसार वर्तन करण्याचा सर्व अधिकार प्रत्येक मनुष्यास आहे हें तत्त्व त्यांच्या मनांत बिंबल्यामुळें धर्माविषयीं औदासिन्य त्यांनीं धरलें होतें; तसाच प्रकार शास्त्रीबोवांचाही होता असें आह्मास वाटतें. मागें सांगितलेंच आहे कीं ते हिंदुधर्माप्रमाणें वागत असत

---

* निबंधमाला—पान ८०२-३. कुळकरणी यांची आवृत्ती.

व साधारण मनुष्यास कोणता तरी धर्म आवश्यक आहे असेंही कदाचित् त्यांचें मत असेल, तथापि प्रस्तुत काळ-माहात्म्याचा पगडा त्यांच्या मनावर बसला नव्हता असें मात्र क्षणभरही कोणास मानतां येणार नाहीं.

याचें आणखी एक प्रत्यंतर असें आहे कीं, त्यांनीं जागोजाग हिंदुधर्माचा जरी कैवार घेऊन त्याजवर आलेल्या आक्षेपांचें निवारण केलें आहे तरी त्यांनीं विनाकारण कोणत्याही धर्माची निंदा केली नाहीं. जे धर्मैकनिष्ठ आहेत, त्यांस बहुधा परधर्माची प्रशंसा तर राहोच—पण त्यांचीं मतेंही सहन होत नाहींत. इतर कोणत्याही बाबतींत भिन्न मत पडलें तर कोणास त्याचें फारसें वाटत नाहीं; हा केवळ कमिजास्ती ज्ञानाचा किंवा रुचिभिन्नत्वाचा प्रभाव आहे असें ह्मणून तो स्वस्थ बसेल. पण धर्ममतांसंबंधानें असें होत नाहीं. धर्मनिष्ठतेमुळें ज्यांच्या मनःप्रवृत्ति संकुचित झाल्या आहेत—ज्यांच्या समजुती कोत्या झाल्या आहेत—त्यांस परधर्माचा मोठाच द्वेष वाटत असतो. पण शास्त्रीबोवांच्या लेखांत तर अशी असूयाजनित कल्पना किंवा द्वेषमूलक भावना कोठेंच दिसून येत नाहीं. सांप्रतकाळीं हिंदुस्थानांत जे अनेक धर्मपंथ व धर्मसांप्रदाय वगैरे चालू आहेत, ते विस्तृत हिंदुधर्माच्या केवळ शाखा असून, आमचेच आहेत; आणि भूतदयेनें ओथंबल्यामुळें करुणाशील मनुष्यांच्या प्रीतीस पात्र झालेला व सगळ्या जगाच्या सरासरी एक तृतीयांश भागाला व्यापून राहिलेला, जो बौद्धधर्म, तो जरी साधारणतः हिंदुधर्माला प्रतिकूळ ह्मणून समजला जातो, तरी वास्तविक पाहतां, तोही आ-

मच्या लोकांच्या स्वोद्भूत बुद्धिविकासाचाच परिणाम असून आमचाच ह्मटल्यास चिंता नाहीं; तेव्हां याच्या विरुद्ध विष्णुशास्त्री यांनीं लिहिलें नाहीं हें नीटच केलें. परंतु ज्या यवनांनीं हिंदुराष्ट्रांचा संहार उडविला, त्यांच्या संपत्तीचें हरण केलें, त्यांच्या धर्माचा उच्छेद केला, नानाप्रकारची विटंबना केली, एवढेंच नाहीं तर कडव्या जुलमानें त्यांस बाटविण्यासही कमी केलें नाहीं, त्या यवनांच्या महंमदी धर्माच्या वाटेसही शास्त्रीबोवांची लेखणी कधीं गेली नाहीं. तरवारीच्या धारेनें धर्म वाढवावा अशी धर्मप्रसाराची प्रशस्त पद्धत ज्या धर्मांत उपदेशिली आहे व जिला मनोभावें करून अनुसरून, मुसलमानांनीं एका हातांत कुराण व एका हातांत तरवार घेऊन या देशांत कल्होळ करून सोडला त्या धर्माचा आह्मी हिंदूनीं द्वेष केला तर साजणार नाहीं असें नाहीं.

तीर्थें तीर्थें तीं मोडलीं ।
ब्राह्मणस्थानें विघडलीं. ।
सकल पृथ्वी आंदोळली ।
धर्म गेला ॥

असा, ते वेळची स्थिति दर्शवून 'धर्म गेला' म्हणून श्रीरामदासांनीं जो करुणास्पद आक्रोश केला आहे तो वाचून कोणाचें मन उद्वेग पावून थरारत नाहीं? परंतु या उद्वेगाचा नुसता अंकुरही शास्त्रीबोवांच्या लेखनांत कोठें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. बहुधा हिंदुधर्माप्रमाणें महंमदीधर्मालाही या देशांत जी दीनावस्थेची कळा प्राप्त झाली आहे

तिजमुळें तो त्यांस अनुकंपनीय मात्र वाटला असावा असें आह्मास वाटतें. पण तेंच फिरून ख्रिस्तीधर्माकडे, व प्रार्थना-समाजादिकांकडे वळले पुरे कीं जो कडाका उडविलेला दृष्टोस पडतो तो कांहीं पुसूं नये, 'मोरोपंताच्या कविते' सारखा विषय, अर्थात् त्यांत धर्ममतांचा संबंध आला तरी केवळ एकदेशानें येणार असें असूनही, शास्त्रीबोवा त्या निबंधाच्या आरंभींच वाचकांस सुचवून जागे करून ठेवतात :—

"दुसरी गोष्ट प्रकृत स्थलीं अगोदर सुचवून ठेवण्यासारखी ही वाटते कीं प्रस्तुत विवेचनांत 'आमचे नवीन विद्वान लोक,' 'त्यांनीं उपस्थित केलेले सुधारणेचे मार्ग,' 'वीररसप्रधान काव्य,' व 'ख्रिस्तीधर्म' यांचा संबंध कोठेंच येणार नाहीं असेंही बहुशः होणार नाहीं. या चौकड्या पैकीं, ....................................... दुसऱ्याच्या व चौथ्याच्या संबंधानें तरी कोठें लिहिणें येईल कीं नाहीं याचें सध्यां कांहीं सांगवत नाहीं इ०."

आतां या एवढ्या कडाक्याचें कारणही फार खोल आहे असें नाहीं, तें अर्थात् हेंच कीं, प्रस्तुत राजकारणीस्थितीमुळें ख्रिस्तीधर्माचें जें सर्वत्र माहात्म्य होत आहे, त्यापासून व त्याला अनुसरून जीं सोंगें शास्त्रीबोवांच्या वेळच्या इंग्रजी विद्वानांनीं उभीं केलीं होतीं त्यांपासूनच, मुसलमानी धर्मापेक्षां हिंदुधर्मास विशेष धोका आहे असें शास्त्रीबोवांचें मत झालें होतें.

या प्रमाणें साधारणतः 'धर्म' या विषयावर त्यांची समजूत झाली असल्यामुळें, हिंदुधर्माशीं—कीं ज्यावर त्यांची इच्छा होती त्याप्रमाणें समग्रतेनें लिहिण्याचा समय

आला नाहीं——त्याशीं त्यांचा संबंध कशा प्रकारचा होता याचा उलगडा करतां येण्यास आतां वाचकांस कांहीं अडचण पडेल असें वाटत नाहीं. आतां त्यांच्या प्राणोत्क्रमणावेळची जी एक हटवादीपणाची गोष्ट आह्मास कळली तशी मागें सांगितली आहे, ती आह्मी केलेल्या विधानाशीं अगदीं विरुद्ध जाते खरी व हिंदुधर्माचे अभिमानी जे शास्त्रीबोवांचे चाहते आहेत त्यांस आह्माला प्रश्न करण्यासही जागा आहे खरी, तरी तिची वासलातही कांहीं लावतां येत नाहीं असें नाहीं. एक तर ती गोष्ट संभवनीय दिसत नाहीं. 'धर्माच्या हेकटपणानें जें पिसें अंगांत शिरतें त्याची तर कांहीं सीमा आहे?' असा प्रश्न ज्यास उत्पन्न झाला तोच विचारी मनुष्य ती सीमा कमी करण्याच्या ऐवजीं वाढविण्याचाच यत्न करील व स्ववर्तनानें दुसऱ्यास तसा धडा घालून देईल हें किती संभवनीय आहे याचा विचार वाचकांनीच करावा. आणि दुसरें यदाकदाचित् खरीही असली तरी मनुष्याच्या अंत्यावस्थेंत भ्रम पडून जी उन्मादावस्था प्राप्त होते तिच्या लहरींत असें कांहीं झालें असेल अशी कल्पना करणेंही कांहीं चुकीचें होणार नाहीं. परंतु वरील पुणेरी बातमीच्या बरोबर उभी करावयाला आमच्याकडे एक मुंबईतली आख्यायिकाही आली आहे तीही येथें आमच्या तर्फेच्या पुराव्याला उपयोगी पडेल. शास्त्रीबोवांची रत्नागिरीस रवानगी होण्याच्या वेळीं ते एकदां कांहीं कामानिमित्त मुंबईस आले होते. हे नामांकित ग्रंथकार व 'नाट्यकथार्णवकार' रा. रा. शंकर मोरो रानडे हेही होतकरू ग्रंथकार;

तेव्हां दोघांचें नातें जमून, शास्त्रीबोवा रा. शंकरराव यांजकडे उतरले होते. 'निबंधमाले'चा गंध अगोदरच चहोंकडे पसरून, तिनें ब-याच मंडळीस तिच्या कर्त्या-विषयीं दर्शनोत्कंठ करून ठेवलें असल्यामुळें, त्यांचा मुक्काम मुंबईस होता तोंपर्यंत, त्यांस भेटण्यासाठीं कित्येक लोक येत असत. त्यांच्या समागमें शास्त्रीबोवांनीं फुर्सदीप्रमाणें मुंबईतील टाऊन हाल, नेटिव जनरल लायब्ररी, बागा व पदार्थसंग्रहालय वगैरे ठिकाणें पाहिलीं. तथापि मुंबईतील नाट्यगृहांची तऱ्हा कांहीं निराळ्या प्रकारची आहे ती दाखवावी ह्मणून 'नाट्यकथार्णवकार'—प्रमुख कांहीं मंडळी एके रात्रीस त्यांस जुन्या ग्रांटरोड नाटकगृहांत घेऊन गेली. मुंबईंत ऊष्मा बहुधा हंमेश असतोच; त्यांतही नाटकगृहांतील रोषनाईनें तो जास्तच होतो. प्रेक्षकजनांच्या सोईसाठीं सोडावाटर विकणारेही तच्छमनार्थ हिंडत असतात. त्यांपासून शास्त्रीबोवांच्या बरोबरच्या मंडळीनें सोडावाटर घेऊन बिनदिक्कत सेवन केलें. शास्त्रीबोवांसही घ्या ह्मणून ह्मणाले; परंतु मला जरूर नाहीं ह्मणून सांगितल्यावरून सदर मंडळीस अर्थात्च शंका आली कीं धर्माच्या अडकाठीमुळें त्यांनीं नको ह्मटलें असेल. तेव्हां याचा निकाल करून घेण्यासाठीं एकानें तसें त्यांस विचारलेंही; त्याचा जबाब त्यास असा मिळाला कीं सोडावाटर पिण्याला मला संकोच किंवा धर्माचा वगैरे कांहीं प्रत्यवाय वाटतो असा अर्थ नाहीं; पण मी आजवर कधीं प्यालोंच नाहीं; ह्मणून नको ह्मणतों, झालें. यावर सर्वांच्या आग्रहा-

स्तव त्यांनीं एक दोन घोट घेऊन तें चाखून पाहिलें, पण त्यांस तें आवडलेंसें दिसलें नाहीं. ही गोष्ट त्यावेळीं शास्त्रीबोवांबरोबर असलेल्या मंडळीपैकींच एका गृहस्थानें आह्मांस सांगितली आहे, व तिला साक्षीदार असलेली मंडळीही बहुतेक हयात आहे तेव्हां तिची शाहानिशा सहज होईल.

वरील मजकूर वाचून, हिंदुधर्माचे जे द्वेष्टे आहेत त्यांस कांहींसा आनंद वाटेल व चढून गेल्यासारखेंही होईल. परंतु वस्तुस्थितीचा थोडा विचार केल्यावर हा त्यांचा आनंदसंभ्रम फार वेळ टिकेल असें आह्मांस वाटत नाहीं. कारण शास्त्रीबोवांचीं 'धर्म' या विषयावर कशींही मतें असलीं, व लेखनद्वारा त्यांनीं केवढेंही औदासिन्य प्रगट केलें असलें, किंवा तें प्रसृत करण्याचा केवढाही नेटाचा उद्देश असला, तरी ते पक्के हिंदुधर्माभिमानी होते याविषयीं कोणी वाद घालील अशी गोष्ट नाहीं. हल्लीं चालू असलेल्या हिंदुधर्माचा त्यांस मोठाच अभिमान होता, व त्याचा बचाव त्यांनीं मोठ्याच आस्थेनें केला आहे; हें तर काय पण त्यांच्या निंदकांच्या मतांवर यथास्थित प्रहार करून त्यांचा पार विध्वंस करून टाकला आहे; याविषयीं कोणासही बिलकुल संशय नसावा. व तें त्यांचें कुलव्रत, त्यांस चाहणारे व खरे देशाभिमानी लोक जे हजारों हजार या देशांत आहेत, तेही बिनदिक्कत चालवितील हेंही हिंदुधर्माच्या द्वेष्ट्यांनीं पक्कें समजून ठेवावें.

शास्त्रीबोवा हे पंतोजीचें काम करीत होते. तेव्हां तें त्यांनीं कसें काय बजावलें, त्यांची शिकवण्याची पद्धत

कशी होती, मुलांचें चित्त आपल्याकडे वेधून घेऊन वर्ग हुकमांत ठेवण्याची त्यांची हातोटी कशी होती वगैरे गोष्टींविषयीं दोन शब्द लिहिले पाहिजेत. शिवाय एकंदर वाचकांस, व विशेषतः जे पंतोजीचें काम करीत असतील व त्यांशीं ज्यांचा संबंध आहे अशा लोकांस तर ह्या गोष्टी कळण्याविषयीं विशेषच उत्कंठा होईल. परंतु आह्मास वाईट वाटतें कीं त्यांची जिज्ञासा तृप्त करावयास आमच्यापाशीं या सदराविषयीं सांगावयासारखें नाहीं. ज्या ज्या कामांत शास्त्रीबोवा पडले, ह्या सर्वांत त्यांनीं आपल्या योग्यतेप्रमाणें चांगलेंच यश संपादलें, पण तसें तें मास्तरगिरींत त्यांस मिळालें नाहीं. भाषांतरें व त्यांतही विशेषें करून मराठीचें इंग्रजींत भाषांतर शिकवणें, इतिहास सांगणें व संस्कृताचे पाठ देणें हे विषय कांहींसे ते हौशीनें व मन लावून शिकवीत असत. परंतु शिक्षकाच्या ठिकाणीं जे विशेष गुण असावे लागतात, त्यांचें नेमस्त वास्तव्य हीं त्यांच्या ठिकाणीं दिसून आलें नाहीं. आधीं, ते वर्गांत आले आणि सर्व कांहीं व्यवस्थेशीर असलें तर ठीक; मग शिकणें साधारणपणें बरें होई. परंतु मुलें जर का गोंधळ करूं लागलीं व त्यांची शिकण्याची लहरच लागत नसली ह्मणजे आटपलें. शास्त्रीबोवांनीं आपलें सांगत जावें, कांहीं बोलत असावें, आणि ज्यांना ऐकावयाचें असेल त्यांनीं ऐकावें, असा प्रकार असे. किंबहुना, मुलें गडबड करूं लागतांच शास्त्रीबोवांनीं आपली खुर्ची फिरवून, एखादें हातांत असलेलें पुस्तक वाचीत बसावें, असेंही केव्हां केव्हां घडल्यावाचून राहात नसे. वरिष्टांशीं न पडल्यामुळें

सरकारी शाळेंत त्यांचें मन लागलें नसेल; तेव्हां तेथली गोष्ट एक राहो; पण स्वतः त्यांच्या नव्या शाळेंतही सरासरी हीच तऱ्हा. या हकीगतीवरून पाहतां एक नाहीं एक असे तीन दोष शास्त्रीबोवांकडे येऊं पाहतात. एकतर, ते शिकविण्याच्या कामास योग्य नसावे; किंवा मुलांच्या शिक्षणाविषयीं ते केवळ निष्काळजी असावे, किंवा स्वकर्तव्यांत तरी ते चुकले ह्मणून ह्मटलें पाहिजे.

पहिल्यानें शिकविण्याच्या सामर्थ्याविषयीं विचार करूं. संस्कृत, मराठी आणि इंग्रजी या तीनही भाषांत चांगली गति, उत्तम बहुश्रुतपणा, मार्मिकपणा, शिक्षण पद्धतीच्या तत्वांशीं परिचय, इतके गुणांची शास्त्रीबोवांस सोय असल्यामुळें, ते ह्मणजे शाळेंतल्या पोरांस शिकविण्यास असमर्थ होते, किंवा कसें शिकवावें हें त्यांस ठाऊक नव्हतें असें ह्मणतां येणार नाहीं. त्यांनीं एका शालोपयोगी पुस्तकावर टीका करतांना म्हटलें आहे:—

"पुस्तकें हीं एक प्रकारें शिक्षकच होत.... ........ दुसऱ्यांस समजेसें शिकवणें ही विद्या कांहीं, कित्येकांस वाटते तशी सोपी नाहीं. स्वतः कसाही कोणी विद्वान असला तरी दुसऱ्याच्या मनांत आपलें इष्ट हृद्गत उतरविणें हें, मोठ्या भांड्यांतला पदार्थ लहान भांड्यांत ओतूं पाहण्याप्रमाणें, बरेंच कठीण आहे. भांडें केवढें ही मोठें असलें व तें कितीही भरलेलें असलें, पण त्याला धार जर नाहीं, तर तें जसें या कामाला नादान; तशीच शिक्षकाची ही गोष्ट आहे!" शालापत्रक— पु० ११, अंक ८.

हाच दृष्टांत स्वतः त्यांसही लागू पडून, त्यांच्या पदरीं ही उणीव बांधावयास वरीच जागा झाली आहे. परंतु या गोष्टीकडे आमची दृष्टि थोडी निराळी चालते. एक तर, निबंधमालेंत त्यांनीं हातीं धरलेल्या विषयांचें विवेचन किती पद्धतशीर केलें आहे, व वाचकांस समग्र विषय नीट लक्षांत यावा अशा विषयीं किती काळजी घेतली आहे, हें लक्षांत आणलें असतां, त्यांस दुसऱ्याच्या मनांत विषय भरवितां येत नव्हता, व शिकवण्याची रीत माहीत नव्हती असें मानणें निव्वळ चुकीचें होणार आहे. दुसरें, वर्गांतील मुलें जर शांत असलीं व इतिहास वगैरे त्यांच्या आवडीचे विषय शिकवावयाचे असले, म्हणजे ते ते किती उत्तम शिकवीत, अवांतर किती उपयुक्त माहिती सांगत, व एकंदरीनें लेखनांतलीं रहस्यें व कार्यकारणभाव यांचें उपपादन किती सुरेख करीत, याचा अनुभव त्यांच्या हाताखालीं शिकलेल्यां पैकीं कोणालाही विचारला असतां सहज कळेल.

बरें तर, शिकविण्याचें एवढें सामर्थ्य अंगांत होतें, हें जर खरें, तर शास्त्रीबोवा शिकविण्याविषयीं केवळ निष्काळजी होते असें तरी म्हटलें पाहिजे. मुलांच्या शिक्षणाविषयीं एवढा निष्काळजीपणा धरणें कोणासही ठीक वाटणार नाहीं हें उघड आहे. त्यांतून, त्यांच्या सारख्या विद्वानास—कीं ज्याचा संकल्प लोकांस शिकवून अनेक प्रकारची माहिती करून देऊन, सज्ञान करावें हाच आहे,—त्यांला तर बालशिक्षण हा विषय केवढा महत्त्वाचा वाटावा! कारण हेच अंकुर

पुढें मोठे वृक्ष होऊन, त्यांपासून देशास इष्ट फलोत्पत्ति व्हावयाची. तेव्हां या अंकुरांस खतमाती नीट मिळून त्यांची वाढ चांगली होईल अशाविषयीं सावधगिरी ठेवणें हें देशोन्नति करूं इच्छिणारास किती आवश्यक आहे! असा जो दोष शास्त्रीबोवावर येण्याचा संभव आहे, त्याच्या संबंधानें आह्मास एवढेंच ह्मणावयाचें कीं त्यांची योग्यता व त्यांस मिळालेली कामगिरी यांचा थोडा विचार प्रथम केला पाहिजे. सर्वांसही ठाऊक आहे कीं वर्ग शिकवणें ह्मणजे त्यांत बहुधा दोन कामांचा अंतर्भाव होत असतो.—एक धडे शिकवणें व एक मुलांना दाबांत ठेवून व्यवस्था राखणें. पण बहुधा, पहिलें काम महत्वाचें असतांही, दुसऱ्याचीच मातब्बरी विशेष धरावी लागते हें उघड आहे. शाळेंत पाय ठेवल्यापासून शिक्षकाला किती फौजदाऱ्या व मुनसफ्या रोज निवडाव्या लागतात! तेव्हां असलें निव्वळ जरबेचें व पोरकट काम शास्त्रीबोवांसारख्या विचारनिमग्न विद्वानास कंटाळवाणें झालें असेल, व त्यामुळें वर्गांत गोंधळ होऊन त्यांचें मन अभ्यासाकडे लागलें नसेल, असें वाटतें. पण शास्त्रीबोवा उत्तम शिक्षक होते व शिक्षकाच्या कामाचा बोज त्यांस चांगला कळत होता यांत कांहीं संशय नाहीं. वरील उताऱ्यांत जें ह्मटलें कीं पुस्तकें किंवा पुस्तककार "हे एक प्रकारें शिक्षकच होत, " हें जर खरें आहे, व त्यांनीं आपल्या लेखांत सुलभ विवेचन करून लोकांस शिकवलें हें जर सर्वमान्य आहे, तर शास्त्रीबोवांनीं शिक्षकाचें काम चांगलेंच बजावलें असें ह्मणावयास कोणती हरकत आहे? यावरून पाहिजे

तर असें ह्मणा कीं ते वरिष्ट प्रतीचे शिक्षक होते, व ही गोष्ट आह्मास कबूल आहे. एखाद्या श्रीश्री गग शिकवणाऱ्या अेरावांस शाळेंत शिरल्याबरोबर आपल्या सिंहासनाचा केवढा मान वाटतो, व दुसरें कांहीं केलें नाहीं तरी फिकीर नाहीं पण वानरनायकाप्रमाणें हुप केल्याबरोबर चहोकडे गुपचिप व्हावें असा आपला दरारा ठेवण्याविषयीं त्यांस केवढी हौस असते! असल्या गोष्टींत शास्त्रीबोवांस मौज वाटली नाहीं किंबहुना त्याचा तिरस्कारही वाटला तर त्यांत नवल कसलें? त्यांतून अलीकडील सार्वजनिक शिक्षणपद्धति किती दूषणीय आहे, शाळेंत मुलें चटोर होऊन कशीं बिघडतात, तसेंच ग्रहणपात्रता आल्यावांचून शाळाखात्याच्या इयत्तांप्रमाणें मुलांच्या अपक्व मेंदूंत भाराभर विषय कोंबण्याची कशी तऱ्हा आहे याही गोष्टी लक्षांत आणल्या असतां, 'सरकारी शाळेंत पोरें हाकण्याच्या मास्तरकीचा मला अगदीं तिटकारा आला होता, व हेंच माझें नोकरी सोडण्याचें मुख्य कारण' असें जें नोकरी सोडतेवेळीं शास्त्रीबोवांचें मत झालें, तें किती वाजवी होतें, हें कोणीही कबूल करील. त्यांतून पूर्वींची आपली रीत ह्मटली ह्मणजे विद्यार्थ्यानें गुरुगृहीं राहावयाचें, त्याची मर्जी संपादन करून विद्या करावयाची, निदान आर्त व लीन बुद्धीनें त्याजकडे जाऊन विद्या शिकावयाची, अशा प्रकारची कांहीं पद्धत असती; किंवा कालेजांतले विद्यार्थी जसे वयांत आल्यामुळें, कांहीं विद्याभिरुचीनें कांहीं नफ्यातोट्याच्या लालचीनें शिकण्याविषयीं उत्सुक असतात, तशा विद्यार्थ्यांस शिकवावयाचें असतें, तर शास्त्रीबोवांच्या गुणांचा

फार चांगला प्रकाश पडला असतां व त्यांस नांव ठेवण्यास सहसा जागा उरली नसती हें खचित आहे.

यावर कित्येकांचें असें ह्मणणें येईल कीं हें सर्व खरें; पण ज्यापेक्षां शास्त्रीबोवांनीं शिक्षकांचें काम पतकरलें होतें, त्यापेक्षां तें आपल्या शक्तीप्रमाणें चोख बजावणें त्यांस योग्य होतें; तें त्यांनीं तसें बजावलें असें ह्मणतां येत नाहीं. तेव्हां हा स्वकर्तव्यविमुखतेचा तरी दोष त्यांच्याकडे येतो कीं नाहीं? पण एथेंही थोडा विचार केला पाहिजे असें आह्मी ह्मणतों. वर सांगितलेंच आहे कीं त्यांची योग्यता वरिष्ट प्रतीची होती. बुद्धिमत्ता, विद्वत्ता व योग्यता यांचा विचार केला असतां, त्यांच्यासारख्या मनुष्यास कांहीं निराळ्या प्रकारची कामगिरी पाहिजे होती असें आह्मास वाटतें. त्यांची बुद्धि तीक्ष्ण होती, त्यांचें ज्ञान विशाळ होतें, त्यांची उद्योगाची हिंमतही जबरी होती व हीं तिन्ही कामास लावण्याचे त्यांचे उद्देशही तसेच वरिष्ट पायरीचें व थोर मनाचे होते. वास्तव या चारही गोष्टींची सार्थकता होईल अशा एखाद्या कामगिरीवर त्यांची नेमणूक झाली असती तर त्यांच्या गुणांचें तेज पडून देशास त्यांचा उत्कृष्ट उपयोग झाला असता. जे बुद्धिमान आहेत व आपली योग्यता जाणून आहेत, त्यांची खटपट आपल्या बुद्धिवैभवाचा जेणेंकरून विकास होईल व आपल्या योग्यतेचा लोकोपयोगाकडे विनियोग होईल असे उपाय योजण्याविषयीं एकसारखी चालली असतें; ती सिद्धीस न गेली व अशी स्थिति त्यांस प्राप्त न झाली तर ते कधीं स्वस्थ बसावयाचे नाहींत; हरप्रयत्नानें आपला

इष्ट उद्देश सिद्धीस नेण्याची ते संधि पाहात राहतील. नदीच्या प्रवाहास जसा मध्यें कितीही प्रतिबंध झाला, तरी तो या वाटेनें नाहीं या वाटेनें, नियत प्रदेशाकडे धाव घेण्याचा जोर करीत असतो; किंवा वाफ भांड्यांत कोंडली असतां ती जशी वाट काढून बाहेर पडण्याचा सतत यत्न करीत असते, तसें कर्तृत्वाच्या मनुष्यासही आपल्या योग्यतानुरूप पदवी प्राप्त होई तोंपर्यंत कधीं बरें वाटावयाचें नाहीं. मग त्या प्रवाहानें आडवा आलेला बांध फोडून शेतांचा नाश केला नाहीं व वाफेनेंहीं भांडें फोडून आसपासच्या मनुष्यांस इजा केली नाहीं तर भाग्य मोजावयाचें! असो तर या न्यायानें पाहिलें तर शास्त्रीबोवांची जी खरी योग्यता होती व त्यांचे देशकल्याणाविषयीं जे बेत चालले होते, त्यांच्या गर्दींत आजूबाजूच्या अल्प स्वल्प कार्यांकडे किंवा आपल्या योग्यतेच्या मानानें कमी दर्जाचे कार्यांकडे त्यांचें दुर्लक्ष झालें तर त्यांच्याकडे काय बोल? डेन्स लोकांपासून पराभव पावून, आल्फ्रेड धी ग्रेट हा एका धनगराकडे वेशांतरानें राहिला असतां, राज्यकारणांत ध्यान गेल्यामुळें त्यानें चुलीवरील भाकरी जळूं दिल्या; किंवा वाफेच्या यंत्रांत सुधारणा करणारा जो प्रख्यात जेम्स वाट, हा, पोरवयांत, एका कारखान्यांत बाष्पपात्रांत वाफ सोडण्याच्या व ती बंद करण्याच्या कामावर असतां, वाफ आंत येण्याच्या नळीच्या द्वारावर जो पडदा असतो तो उघडणाऱ्या दांड्याची दोरी चाललीलेनें यंत्राच्या एका भागाला अडकवून ठेवून, यंत्रांच्या गति पाहात बसे; किंवा डाक्टर जान्सन यास पुस्तकविक्र्यानें आपली

पुस्तकें जुळून शिस्तवार लावण्याच्या कामावर रोजिं-दारीनें घेतलें असतां, तें सोडून तो मधून मधून पुस्तकेंच वाचीत राही; किंवा पेशवाईंतील प्रसिद्ध न्यायरत्न जे रामशास्त्री, ते, आपल्या पूर्वाश्रमांत शागीर्द होऊन एका सावकाराकडे राहिले असतां, यजमानाच्या पायां-वर पाणी ओततां ओततां, जवळच खरेदी चाललेल्या मोत्यांच्या चौकड्याचा ढाळ पाहण्यांत गुंतले; या गोष्टी इतिहासप्रसिद्ध आहेत; यांतील नायकांस आज कोणी निष्काळजीपणाचा किंवा स्वकर्तव्यविमुखतेचा दोष दे-ण्यास बहुधा तयार होईल असें वाटत नाहीं; इतकेंच काय, पण त्यांच्या इष्टकार्यदक्षतेची, अवलोकनाची, रसि-कतेची व मार्मिकपणाची उलटी तारीफच होईल अशी आमची खात्री आहे. मग याच दृष्टीनें प्रकृत प्रक-रणीं शास्त्रीबोवांचीही अशाच दोषापासून मुक्तता होऊं शकत नाहीं काय ?आल्फ्रेडच्या घरधनिणीनें जशी त्याची खूप खरडपट्टी काढली; जेम्स वाटला जसा कारखानदार वारंवार धमकावीत असे; जान्सनला जसें त्या पुस्तकवा-ल्यानें दरडाविलें; आणि रामशास्त्र्यांस जसें सावकारानें गर्विष्ट मुद्रेनें खडखडाविलें; तसाच प्रकार, प्रस्तुत प्रक-रणीं निष्काळजीपणाचा व स्वकर्तव्यविमुखतेचा दोष विष्णुशास्त्री यांस देतांनाही होणार आहे असें आम्ही स-मजतों. वरील उदाहरणांत एक तरी सवड होती कीं त्यांतील प्रसिद्ध व्यक्तींच्या गुणांची पारख व्हावयाला तेव्हां कांहीं मार्ग नसल्यामुळें, त्यांच्या यजमानांनीं फार तर अज्ञानानें व दांडगेपणानें त्यांचा उपमर्द केला इतकेंच म्हणतां येतें. पण विष्णुशास्त्री यांस सांप्रत दोषी

ठरवितांना, असमंजसपणा, दुराग्रह, अविनय इ० आ-णखी दोषांसही आपण आपल्यास पात्र करून घेत आहों हें विसरतां कामा नये !

या प्रमाणें 'मास्तरगिरी'च्या संबंधानें शास्त्रीबो-वांवर येणाऱ्या दोषांची सरासरी अवस्था आहे. वास्त-विक विचार केला असतां, प्रकृत प्रकरणीं शास्त्रीबोवांचा-ही दोष नाहीं, आणि बालस्वभावाला उचित जें चा-पल्य त्याच्या भरांत गोंधळ उडविणाऱ्या विद्यार्थ्यांचा ही नव्हे. मग ह्यांत दोष तरी कोणाकडे, असें जर को-णी विचारलें तर आह्मी इतकेंच म्हणूं:--

भवति योजयितुर्वचनीयता । *

म्हणजे 'ज्यांनीं कोणाची योग्यता न जाणतां अ-स्थानीं योजना केली त्यांच्याकडे दोष येतो !'

आपल्या देशांत जी विलक्षण परकीय राज्यपद्धति अमलांत आहे, तिच्या योगानें गुणज्ञता बहुतेक नाहींशी होऊन, सर्वच कारभार अटकळीच्या उलट होऊं ला-गला आहे; आणि याची उत्कृष्ट उदाहरणें विष्णु-शास्त्री, सुरेंद्रनाथ बानर्जी इत्यादिकांच्या चरित्रांवरून मिळतात. युरोपांत व विशेषतः विलायतेंत विद्वा-नांचा व गुणिजनांचा केवढा बोज राखला जातो ! कोणी विद्वान होऊन अंमळ हुशारी दाखवूं लागला, किंवा

---

* कनकभूषणसंग्रहणोचितो
यदि मणिस्त्रपुणि प्रतिबध्यते ।
न स विरौति न चापि स शोभते
भवति योजयितुर्वचनीयता ॥

इतर कामांतही कोणी गुणी निघाला तर त्यांची हुशारी व गुण जागापुढें आणण्यासाठीं, व ते आणखी वाढवितां यावे ह्मणून, किती साधनांची अनुकूळता असते! एकतर, अशा माणसांचा संग्रह सरकारांत व्हवयाचा. मानमरातबाच्या, लाभाच्या, व सवडीच्या जागांवरून बहुधा त्यांची योजना होते. शिवाय, राजघराण्यांतल्या वगैरे इतर श्रीमान लोकांकडून ही त्यांचें चिज होतें. विख्यात वक्ता मोठा पिट याला, त्याच्या वक्तृत्व चातुर्यालाच केवळ खुष होऊन, एका डचेसनें एक मोठा ठेवा मरतेसमयीं बहाल केला.* बर्कचीही अशीच संभावना होऊन, त्याचें नशीव उदयास आलें. असो; हें तर राज्यकारणी पुरुषांविषयीं झालें. आतां निव्वळ विद्वानांविषयीं, ग्रंथकारांविषयीं, कवींविषयीं, शास्त्रविद्येंत निपुण अशांविषयीं पाहिलें, तरी त्याच्यासाठींही मोठमोठ्या

---

* During the recess of 1744, the old Duchess of Marlborough died……………………Pope, long before her death, predicted the fate of her vast property:

‘ To heirs unknown descends
the unguarded store,
Or wanders, heaven-directed,
to the poor. ’

Pitt was then one of the poor; and to him Heaven directed a portion of the wealth of the haughty Dowager. She left him a legacy of ten thousand pounds, in consideration of the noble defence he had made for the support of the laws of England, and to prevent the ruin of his country.

*Macaulay's Essays—Earl of Chatham.*

जागा मुद्दाम राखून ठेवलेल्या असतात, व कित्येकांस त्यांच्या गुणांखातर पेनशनही करून देण्यांत येतें. मग तेथें त्यांस वेळ, पैसा आणि स्वस्थता हीं सुलभ होऊन; त्यांचे आवडते व्यवसाय त्यांस करावयास सापडतात. आपल्या देशांत पहावें तर सर्वच याच्या विपरीत. इकडील लोकांपैकीं कित्येक बुद्धिमान लोकांस सरकारानें आपलेसे करून, मोठ्या जागांवरून नेमिले आहेत; नाहीं असें नाहीं. परंतु ते जे कुणीकडल्या कुणीकडे कसे वाहावत गेल्यामुळें व त्यांच्या देशाभिमानाचा प्रकारही आणीक असल्यामुळें, त्यांच्या योगानें देशहित कितीसें होण्यासारखें आहे याचा वृत्तांत शास्त्रीबोवांच्या लेखांवरून सर्वांसही विदित झाला आहे; यास्तव त्यावर लिहिणें नको. पण हा तरी अगदीं अव्वलीचा प्रकार. अलीकडे प्रतिवर्षी जे शेंकडों विद्वान विद्वत्परिषदेकडून पसार होत आहेत त्यांची वाट काय? त्यानीं सरकारदरबारीं शिरावें तर सरांसरी 'सरड्याची धाव कुपणापावेतों' अशीच गत झाली आहे. येथें कशी कदर आहे कीं तीस रुपयांपासून आरंभ करून हांजीहांजीखोरपणानें, कोठें मामलेदारी, कोठें मुनसफी मिळविली ह्मणजे कृतकृत्यता झाली. त्यांतही जिथें तिथें इंग्रेजी अधिकाऱ्यांची शिफारस ही पाहिजेच. कोणी आपल्या हिमायतीनेंच चालूं ह्मणेल, तर काहीं सोय आहे? व्यापारांत तरी कांहीं सोहलत मिळेल, ही आशा नाहींच, असें आपल्यांतील वजनदार गृहस्थांच्या ही प्रचीतीस येत चाललें आहे. त्यांतून, विष्णुशास्त्री, सुरेंद्रनाथ, नव्या शाळेचे लोक, यांच्या सारखे कोणी गृहस्थ स्वावलंबन पत्करून, आपल्या ऐपतीप्रमाणें

देशकल्याणाची टुरटुर करूं लागलेच तर सुधारणेची ध्वजा धरणारी मंडळी त्यांची छीथू करावयास किंवा हात पाय पाय मोडून बंदीखान्यांत लोटावयाला आहेच ऊभी* अशा स्थितींत विष्णुशास्त्र्यांसारखे स्वातंत्र्यप्रिय लोक प्रसंगवशात् आरंभीं सरकारी नोकरींत शिरले व तेथील अत्यंत अन्यायमय व अमंळ गोंधळ पाहून नाखुश झाले तर त्यांत आश्चर्य कसलें ? विद्वत्परिषदेकडून जे लोक पसार होतात, त्यांतून कित्येक तर मोठे नांवाजण्यासारखे असतात, आणि चांगली अनुकूळता झाली तर ते आपल्या

---

* सुधारक हे शब्दच मुळीं भ्रामक आहेत. सुधारक ह्मणविणारांत शेकडों लोक दुराग्रह आढ्यता इत्यादि विकारांनीं ग्रासलेले आढळतात. आणि जुन्या मताचे ह्मणून गणले जाणारे ही सगळे मूर्खशिरोमणि नाहींत. आतां या देशाच्या स्थितिविशेषामुळें अधिकारबळानें व राज्यकर्त्यांच्या आश्रयानें सुधारकांकडून देशकार्यासाठीं निरपेक्ष यत्न करणाऱ्यांस अनेक विपत्ति भोगाव्या लागणार आहेत. तरी त्या सोसणें हें कर्तव्यच होय असें मानून त्यांनीं समाधान करून घ्यावें; याशिवाय दुसरा इलाज नाहीं. टक्के टोणपे खाल्ल्यावांचून सुख्या अंगानें देशोन्नति होणें नाहीं असा जगाचा अनुभव आहे. देशकार्यार्थ कैदेंत गेल्याचीं उदाहरणें सर्व देशांत—विशेषेंकरून युरोपीय राष्ट्रांत अगदीं साधारण आहेत. त्याबद्दल खेद वाटण्याचें कारण नसून, हें उलटें देशाभिमानी जनांस भूषणच आहे. 'दुःखिताश्रुप्रमार्जन' नांवाचें एक पुस्तक, देशकार्यार्थ विपत्ति भोगणाऱ्यांच्या सांत्वनासाठीं एकानें लिहिण्यास घेतलें आहे. त्यांत देशकल्याण कसें करावें व तें करतांना कसकशा विपत्ति भोगाव्या लागतात याचें प्रतिपादन ऐतिहासिक उदाहणांनीं केलें आहे. हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यास देशाभिमानी जनांस हुशारी आणण्यास कारण होईल असें आह्मांस वाटतें.

आर्यजननीस खरोखर भूषित करतील अशी त्यांची योग्यताही असते असें आह्मी खात्रीनें सांगूं शकतों. पण हीं व आणखी दुसरी पुष्कळ गुणवान मंडळी गुणज्ञाऽभावामुळें केवळ कोनाकोपऱ्यांत लोळत आहे, तीस जर पुढें यावयाला अवसर मिळेल तर देशाचा केवढा फायदा होणार आहे!* प्रस्तुत त्यांच्या बुद्धीचा विकास व उपयोग म्हटला म्हणजे त्यांच्या आसपासच्या मंडळींत काय होईल तेवढाच. अर्थात, रानांत फुललेल्या फुलासारखीच सरासरी त्यांची गति व्हावी ही केवढी खेदाची गोष्ट आहे! गुर्जर देशस्थ एका प्रसिद्ध कवीनें अन्योक्तीनें म्हटलें आहे.—

ઊગે પુષ્પ સોહામણું, નજરે ના દેખાય ।
વન સઘળું વાસિત કરે મિથ્યા ખિલિ ખરિ જાય ॥

आखोकवि

शास्त्रीबोवांच्या स्वभावांतला दोष म्हटला ह्मणजे कुत्सितपणा हा होय असें पुष्कळांचें मत आहे. हा त्यांच्या लेखांत व्यक्त झाला आहे, तें पुढें एके ठिकाणीं सांगण्यांत येईल. परंतु तो त्यांच्या वर्त्तनांत ही दिसत असे असें समजतें. वर्गामध्यें शिकवीत असतांना ही

* याचें प्रत्यंतर राष्ट्रीय सभेचे रिपोर्ट वाचले असतां, कोणास ही येणार आहे. त्यांवरून, आपल्या लोकांचें परभाषाप्रभुत्व विचारगांभीर्य, राज्यकारणदृष्टि इ॰ गुण पाहून ग्लाडस्टन साहेबांप्रमाणें कोणीही क्षणभर चकितच होईल. राष्ट्रीय सभेच्या अभावीं हे गुण केवळ लुप्तप्रायच आजवर होते कीं नाहीं ?

प्रसंगवशात् ते 'राजा शिवाजीवर' 'ख्रिस्ती भटांवर' 'प्रार्थनासमाजादिकांवर' व इतर प्रसिद्ध व्यक्तींवर मनसोक्त टीका करीत असत. अर्थात् ही टीका ह्मणजे हमेश त्यांचा पोवाडा नसून, बहुधा दोषाविष्करणत्मकच असे; आणि तींत दुष्ट हेतु जरी नसला, तरी क्षुद्रबुद्धि, व कुचाळ्या करण्याची आवड हीं तरी असावीं असा समज आहे. त्यांच्या हाताखालीं शिकलेला एक चेला (अ. न. ग), जो त्यांचा मोठा भक्त आहे असें नाहीं, त्यानें आम्हांस खालील स्वतःची गोष्ट कळविली आहे. "मी शाळेंत शिकत असतां, एके वर्षीं पुणें प्रार्थनासमाजाचा वार्षिक उत्सव आला. एके दिवशीं मी तो पाहण्यास गेलों, तों राव०वामनराव मोडक यांचें पुराण चाललें होतें. तेथें विष्णुशास्त्री पण येऊन, त्यांच्या नेहमीच्या वहिवाटीप्रमाणें एकीकडे सर्वांमागें बसले होते. एक पैसा, सुपारी, व मूठभर तांदूळ देऊन, ते मला म्हणाले, 'जा रे जा. पुराणिकबोवांच्या पाठीवर हें एवढें नेऊन ठेव नी ये.' मला काय? मी तसें केलें. व सर्व मंडळी मजकडे पाहून हंसूं लागली. मी कांहीं तरी मौजच केली असें वाटून मलाही आनंद झाला."

भोजविक्रमादिकांच्या आश्रयाखालीं, कालिदास भवभूत्यादिकांच्या काळीं नाटकाची कला काय असेल ती कसो; तरी ती आपल्यामध्यें अलीकडे बिघडूनच गेली आहे, व तिजविषयीं साधारणतः लोकांचा ग्रह अनुकूळ नाहीं. पण नाटकांचाच एक संक्षिप्त व एकदेशी प्रकार जो तमाशा, त्याच्याविषयीं तर याहीपेक्षां वाईट ग्रह आहे. आणि तो गैर आहे असेंही ह्मणवत नाहीं.

पण हे दोनही मनोरंजनाचे प्रकार विष्णुशास्त्री यांस फार प्रिय होते. त्यांतही नाटकें पाहण्यापेक्षांही, लावण्या व पवाडे ऐकण्याचा नाद त्यांस फार होता, व यासाठीं त्यांनीं कित्येक उकिरडे पवित्र केले असतील !* अर्थात् या नादाबद्दल पुष्कळांचा गैर समज होऊन, ते कित्येकांच्या अवहेलनसे व हेटाळणीस पात्र झाले आहेत असें समजतें. सदर मनोरंजक कलांबद्दल वाईट ग्रह होण्याचें मूळ कारण पाहूं गेलें, तर बहुधा त्या ज्यांच्या हातांत पडल्या आहेत त्यांचें अज्ञान व वाईट स्थिति हें होय असें दिसून येईल. नाटकी ह्मटला ह्मणजे तो पाणक्या असावयाचा असा

---

* मे० अक्वर्थ साहेब व रा. रा. शंकरराव शालिग्राम यांणीं मोठ्या श्रमानें आलीकडेस एक पोवाड्यांचे पुस्तक तयार करून छापविलें आहे. तें पुष्कळांचें पाहण्यांत असेल. रा. शंकरराव यांणीं पूर्वींच एक लावण्यांचें व पोवाड्यांचें पुस्तक काढलें होतें. पण प्रस्तुतचें पुस्तक मोठें असून इतर गुणांनींही अधिक योग्यतेचें झालें आहे. जें काम केवळ आमच्या लोकांनीं करावयाचें, तें साहेब बहादुरांनीं स्वतःच्याच उत्साहानें उचलून एतद्देशीय गृहस्थाच्या मदतीनें पार पाडलें यावरून त्यांच्या रसिकतेची व गुणज्ञतेची जितकी स्तुात करावी तितकी थोडी. महाराष्ट्रांत त्यांची कीर्ति कायम करण्यास हें पुस्तक बरेंच कारणीभूत होईल असें आह्मांस वाटतें.

सदर पुस्तकाच्या प्रस्तावनेंत रा. रा. शंकरराव यांणीं कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या संगतींत पोवाडे ऐकण्याची हौस पुरवून घेतली असा नुसता मोघम उल्लेख केला आहे. पण ज्याच्या संगतींत त्यांची हौस पुरली त्याच्या स्वतःच्या हौशीची व ती कशी पुरवून घेतली याबद्दलची कांहीं माहिती दिली असती, तर अप्रासंगिक झाली नसती, व लोकांवरही फार उपकार झाले असते.

आपला सिद्धांत होतो. अशीच तऱ्हा तमासगिरांची. पूर्वींचे ते 'शाहीर बोहिला जिजाईनें (शिवाजी महाराजांच्या आईनें)' अशा इतमामाचे व 'मनगटां कडें चढविलें सोन्याचें' अशा बिदागीचे शाहीर, गोंधळी, आणि तमासगीर गेले; आतां हे लोक ह्मटले ह्मणजे एथून तेथून भीक मागे! मग अशांच्याविषयीं वाईट ग्रह कां होऊं नये? पण खरे मार्मिक व रसिक जे आहेत, ते बाहेरल्या स्वरूपालाच फसून जात नाहींत. 'सरसिजमनुविद्धं शैवलेनाऽपि रम्यम्' या दुष्यंताच्या दृष्टीनें ते प्रत्येक गोष्टींतला सरस भाग निवडून, त्याचें ग्रहण करतात. लावण्या व पोवाड्यामध्यें, आवेश, चटकदारपणा, प्रयोगशुद्धि इत्यादि भाषागुण, शृंगारवीर-करुण इ०रसाविर्भाव, आणि रीतभात, इतिहास इत्यादि जुनी माहिती या गोष्टी कोणाही मार्मिक व रसिक मनुष्याचें मन वेधणाऱ्या आहेत. यांच्यासाठींच लावण्यावर व पवाड्यावर शास्त्रीबोवांची विशेष भक्ति होती. याप्रमाणें कीर्तनांवर व पुराणांवरही त्यांचा फार भर होता. कोणी नामांकित कीर्तनकार किंवा पुराणिक पंडित पुण्यांत आला कीं त्याचा एकही समारंभ शास्त्रीबोवांकडून कधीं वांदडा जात नसे. याबद्दल कांहीं माहिती त्यांनीं निबंधमालेंत 'वक्तृत्व' या निबंधाच्या आरंभीं दिली आहे. त्यावरून, त्यांस त्यांची किती गोडी होती हें सहज समजतें.

शास्त्रीबोवांची उद्योगनिरतत्वाबद्दल व दृढ निश्चयाबद्दल जितकी स्तुति करावी तितकी थोडीच. ते जबरे उद्योगी होते. त्यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे— "गेल्या

दशकांत( दहावर्षांत ) कागदाला टांक लागल्याव्यतिरिक्त आमचे फारच थोडे दिवस गेले असतील! " ते निश्चयाचे पुरे घड होते. अमुक एक गोष्ट करावयाची अशी त्यांच्या मनानें एकदा उचल घेतली म्हणजे ते तिचा एकसारखा पिच्छा पुरवीत. अनेक अडथळे जरी आले, तरी आपला निश्चय सोडीत नसत. " निबंधमाले"ला सुरवात झाली तेव्हां पुष्कळांनीं निषेधून त्यांच्या मनाचा हिरमोड केला; पण त्यांनीं आपल्या मनोरथाप्रमाणें ७।८ वर्षे तें काम यथास्थित झेपून नेलें. चित्रशाळेच्या कारखान्याची तऱ्हा नवीनच असल्यामुळें, त्यांतही बहुत अडथळे आले, तरी त्यांनीं दृढनिश्चयानें तें काम चांगलें नांवारूपास आणलें हें आपण प्रत्यक्ष पहातच आहों. शेवटीं शेवटीं जी " उद्योगपरंपरा" त्यांनीं उभारली होती तिच्यायोगानें " बहुकार्यव्यापृतत्वाचें " भय त्यांच्या मनासही कांहींसें वाटूं लागलें होतें, असें " मालेंतील " उल्लेखांवरून दिसतें. पण त्यास न जुमानून, सर्व खटला यथास्थित रेटण्याची त्यांनीं कंबर बांधली होती.

निश्चयाचें साहाकारी जें धैर्य, तेंही त्यांच्यामध्यें पुष्कळ होतें. शास्त्रीबोवा कोणत्याही कामांत व्यत्यय आला असतां एकाएकीं बावरून जात नसत; दमानें व नेटानें काम चालवीत. " मालागुंफना"च्या कामांत शत्रूंनीं अनेक विघ्नें आणून घातलीं; पण तेवढ्यांस त्यांनीं दमानें पाठ दिली होती. एक सालीं तर, त्यांच्यावर वरिष्ठांचा रोष, त्यामुळें बदली होऊन स्थलांतर, त्यांतच आणखी अक्षय्य पितृवियोगाचा प्रसंग, नोकरी सोडून घरीं बसणें, व अनेक उद्योग माथीं घेणें, इत्यादि गोष्टी

एका मागून एक उपस्थित झाल्या. साधारण मनुष्याची तर अशा वेळीं पांचावर धारण बसली असती. पण शास्त्रीबोवांनीं या सर्वांस पाठीवर गुंडाळून घेऊन, "माले"चें काम खुशाल चालविलें होतें !

तशीच, समयोचित योजनेविषयीं त्यांचे सोबती त्यांची स्तुति करतात. समयास एखादी गोष्ट सुचणें ह्मणजे मोठ्या चातुर्याचेंच काम आहे. ह्मटलें आहे—का हानिः ? समयच्युतिः। एखादी क्षुल्लक गोष्टही वेळेवर सुचली तर मोठेंच काम होऊन जातें; आणि तीच न सुचली तर नुकसान होण्यास उशीर लागत नाहीं. "केसरी" व "मराठा" यांची गर्जना जों कोठें होऊं लागते आहे व भाला चमकतो आहे, तों त्यांच्यावर कोल्हापूर संस्थानच्या ते वेळच्या बरवे दिवाणाकडून गदा आलीच, ही गोष्ट सर्वविश्रुतच आहे. कोल्हापूरचें प्रकरण ह्मणजे लहानसहानांतलें नव्हतें. पहिल्यानेंच सर्व मंडळीच्या तोंडचें पाणी पळालें. "उद्या खटला सुरू होणार, काय करावें ? पैसा नाहीं" असें ह्मणून जो तो आपल्याशींच चूर. अशी स्थिति पाहून शास्त्रीबोवा ह्मणाले, "बरें, कांहीं चिंता नाहीं; बाकीची सर्व तयारी तुमचेकडून असूंद्या ह्मणजे झालें." असें ह्मणून "केसरी व मराठा यांच्या संरक्षणार्थ फंड" अशी एक छांदार जाहिरात त्यांनीं जागचे जागींच खरडली ! दुसरे दिवसापासून वर्गणी जमा व्हावयाला सुरवात ! यावरून आणखी असें दिसतें कीं आपल्याकडे लोकांचीं मनें कितपत आकर्षिलीं गेलीं आहेत व आपल्यावर त्यांचा कितपत विश्वास उत्पन्न झाला आहे, याची स्वतः त्यांस

बरीच अटकळ झाली होती. आणि हीच खऱ्या लोकधुरीणत्वाची मुख्य खूण होय.

निव्वळ लेखांवरून त्यांचीं मतें काय होतीं याविषयीं जर विचार केला तर असें दिसून येतें कीं स्वभाषेची स्थिति, तिची योग्यता, नष्ट होण्यापासून तिला जगविण्याचा उपाय, हिंदुस्थानाचे इतिहासग्रंथ जे प्रस्तुत लिहिलेले हयात आहेत त्यांची अयोग्यता, सुधारणेच्या ह्मणून ह्मटलेल्या नवीन नवीन कृत्यांचा अप्रयोजकपणा, इंग्रेजांचें अयोग्य गोष्टींत अनुकरण, स्वधर्म स्थिति, ख्रिस्ती धर्माची फजिती व निंदा, देशस्थिति, पराधीनता, राज्यकर्त्यांचें वर्तन इत्यादि अनेकविध, महत्वाच्या, लोकोपयोगी आणि मन वेधणाऱ्या विषयांवर त्यांचीं मतें व विचार प्रसिद्ध झाले आहेत. त्यांचे साधारण स्वरूप पाहिलें, तर प्रौढ असून पाणीदार, गंभीर असून निकराचें, सुबोध असून मार्मिक असें आहे. शास्त्रीबोवांचे बहुतेक विचार प्रशस्त असून, कोणाही समजदार मनुष्यास पसंत पडून आवडण्यासारखे आहेत. आतां ज्या व्यक्तिविशेषांच्या मतांवर त्यांनीं यथास्थित टीका केली आहे, त्यांस जर हे विचार न आवडले तर त्यांत मोठासा दोष नाहीं व नवलही वाटण्याचें कारण नाहीं, हें स्पष्ट आहे. तथापि अशांचें मनही, त्यांस शास्त्रीबोवांनीं केलेल्या टीकेच्या यथार्थत्वाविषयीं साक्ष पटविल्याशिवाय राहणार नाहीं असें वाटतें. “ शास्त्रीबोवांची टीका सर्वांशीं खोटी नाहीं ” असें एका टीकाविषयक गृहस्थानें भाषण केलेलें आमच्या कानावर आलें आहे.

निबंधमाला सुरू करण्यांत शास्त्रीबोवांचा मूळ उद्देश मराठी भाषेचें 'पुनरुज्जीवन' करावें हा होता. "सध्यां मराठी भाषा मोठ्या कचाटींत सापडली आहे. इंग्रजी सारख्या प्रबळ परभाषेचा तिजवर अगदीं पगडा बसून, तिचें स्वत्व ह्मणजे निराळेपणा नष्ट होण्याच्या बेतांत आहे........ कारण, विचार व कल्पना यांची उत्पत्ति ज्या मनापासून व्हावयाची, तेंच इंग्रजी बनल्यावर मूळच्या भाषेची प्रधानता कोठें राहिली ?" याप्रमाणें मराठीची ते वेळेची स्थिति वर्णून, 'तिला सुधारण्याची व बुडूं न देण्याची तजवीज कोणती' हें सांगतात :—

"हल्लींची स्वभाषेविषयीं उपेक्षाबुद्धि जोंपर्यंत आमच्या लोकांच्या मनांत अशीच राहील, तोंपर्यंत कोणत्याही उपायास लेशमात्रही यश येणार नाहीं.......पण परभाषाद्रूपणरूप जें क्षयाचें बीज आपल्या भाषेस लागून, दिवसेंदिवस तीस खिळूं पहात आहे, तें जर का एकदां दूर होईल व विद्वानांची तिजकडे प्रवृत्ति होईल, तर तिच्या अभिवृद्धीस आरंभ झाला ह्मणून समजावें............सर्व जगांतील ज्ञानभांडार इंग्रजींत साठवलें असल्यामुळें तिचें साहाय्य मराठीसारख्या परिपक्व होऊं पाहणाऱ्या भाषेस जितकें मिळेल तितकें थोडें आहे............मराठी भाषेच्या हितकर्त्या विद्वानांनीं हें पक्कें लक्षांत वागवावें कीं इंग्रजींतील केवळ अर्थ मात्र घेऊन, त्यास शुद्ध मराठीच्या साच्यांत त्यांनीं ओतलें पाहिजे. अशा तऱ्हेचे ग्रंथ बनले असतां ते भाषेस हितावह होऊन, भूषणप्रद होतील."*

---

* निबंधमाला.—मराठी भाषेची सांप्रतची स्थिति. अंक १.

अशा प्रकारच्या ग्रंथरचनेनें मराठीचें पुनरुज्जीवन करण्यासाठीं " संस्कृतांत व विशेषतः इंग्रेजी भाषेंत जें अगाध ज्ञान भरलें आहे, त्याचा पाट फोडून आपल्या भाषेकडे वळवावा "* व देशोन्नतीच्या कार्यास हातभर लावावा, असा शास्त्रीबोवांचा पहिल्यापासून बेत होता. कारण, " देशस्थिति सुधारण्याचा राजमान्य मार्ग ह्मटला ह्मणजे लोकांस ज्ञानसंपन्न करणें हा होय."† आतां या देशोन्नतीचें 'प्रधान लक्षण' ते असें सांगतातः—

" मानसिक उन्नति ह्मणजे देशाभिमान, जात्यभिमान, स्वाभिमान, अनुचित कर्मांपासून निवृत्ति, स्वातंत्र्यावलंबन, दैन्यवर्जन इत्यादिकांविषयीं स्फूर्ति ज्या मानसिक स्थितीपासून होते ती. ही स्थिति असणें हेंच देशोन्नतीचें प्रधान लक्षण होय; व तिचा अत्यंताऽभाव ह्मणजे देशाच्या अपकर्षाची परमावधि होय."‡

शास्त्रीबोवांस स्वभावतःच स्वातंत्र्याची फार अभिरुचि. स्वातंत्र्यावलंबनावाचून निर्भिडपणा व स्पष्टवक्तेपणा कोणासही यावयाचा नाहीं असा त्यांचा सिद्धांत झाला होता. यास्तव स्वातंत्र्यापुढें त्यांस द्रव्याची, अधिकाराची वगैरे लालुचीची मातब्बरी कांहींच वाटत नसे. आणि यास अनुसरून त्यांची राहण्याची पद्धत अगदीं साधी होती. हल्लींची आपल्या लोकांतील स्वार्थपरतेची व हांजीहांजीखोरपणाची स्थिति वर्णून, ते एका ठिकाणीं

---

* नि० मा० प्रस्तुत मालेचे उद्देश. अंक २.

† नि० मा० आमच्या देशाची स्थिति अंक ८३ पान १२९६.

‡ नि० मा० आमच्या देशाची स्थिति अंक ७७ पान १२२५.

आपला खेद येणेंप्रमाणें दर्शवितातः—" पूर्वींच्या लोकांत अकिंचन स्थितींत राहणारे, निस्पृह व स्पष्टवक्ते अशा प्रकारचे पुरुष जसे पुष्कळ आढळत असत तसा प्रकार आतां अगदीं विरळा ! "*

खऱ्या देशभक्ताची 'कसोटी' ते अशी सांगतातः—

" खरा लोककल्याणेच्छु व देशाभिमानी पुरुष म्हटला म्हणजे त्याच्या ठायीं पराकाष्ठेची निस्पृहता वागत असली पाहिजे; तो वचनाचा धड असला पाहिजे; कसलीं-[illegible] आलीं—किंबहुना जीवितसंशयाचा प्रसंग जरी [illegible] येऊन ठेपला तरी त्यानें डगमगतां कामा नये. "†

[illegible]तंत्र्यप्रियतेमुळें शास्त्रीबोवांनीं स्वातंत्र्याच्या स्थितीचें जागोजाग किती उत्साहपूर्वक व किती सुंदर केलें ! एथें त्यांचे आवडीचे दृष्टांत म्हटले म्हणजे अं-[illegible]न यथेच्छ फिरणाऱ्या पक्ष्याचा किंवा वनगहनांत [illegible]द्ध संचार करणाऱ्या वनगजाचा हे होत. विद्या-[illegible]या मुलखांतली स्वतंत्रस्थितीचें हें वर्णन पहाः—

" विद्यामंदिरांत लहान व थोर ही लौकिक गणना लागू पडत नाहीं..........या पवित्र मंदिरांत प्र-[illegible]गास राजाचा एक मार्ग व रंकाचा एक मार्ग असा बिलकुल नाहीं—सर्वांस रस्ता एकच; त्याप्रमाणेंच [illegible]क्रमून आंत प्रवेश करतांच पूर्वींचे व्यावहारिक [illegible]हीं सर्व गळून जातात. नव्या राज्यांत गेलें अ- तेथील कायदे जसे मानले पाहिजेत, त्याप्रमाणें वि-

---

* नि० मा०—आमच्या देशाची स्थिति. अंक ७८ पान १२३७.

† नि० मा०—अंक ६४ पान १०५९.

च्यादेवीच्या राज्यांत पाऊल ठेवल्याबरोबर पूर्वी सारें विसरलें पाहिजे. तेथें रशियाचा बादशहा रखा व अगदीं कंगाल मनुष्यही सारखा ! ते ही स्थिति लक्षांत आणली असतां महाजनांच्या अपम नाबद्दलची शंका व्यर्थ होय हें उघड आहे !"*

ह्याचप्रमाणें आणखी:—

"स्वातंत्र्याची स्थिति पारतंत्र्यापेक्षां किती सुखावह असते हें कोणासही सांगावयास नकोच. यदृच्छेनें अंतरालांत फिरणाऱ्या व वनगहनांत यथेच्छ विहार करणाऱ्या पक्ष्यांत आणि मोठ्या सोन्याच्या रत्नजडित पिंजऱ्यांत कोंडलेल्या पोपटांत किती अं हीच गोष्ट राष्ट्रासही लागू आहे.†"

देशोन्नतीसाठीं लोकांचें ऐक्य होणें फार अग आहे असें शास्त्रीबोवांचें मत होतें.—"प्रत्येक दे तेच्छूचें कर्त्तव्य एवढेंच होय कीं जेणेंकरून आपा तले तंटे मोडून साऱ्यांचा एक विचार होईल व ल्या आंगचे दोष जाऊन, त्यांच्या जागीं राष्ट्राभ्युद कारण जे अनेक सद्गुण ते येतील असें आचरण ठेवा

शास्त्रीबोवांस जात्यभिमान फार होता व त्य होऊन रा. फुले, रा. लोखंडे वगैरे चवचाल शूद्र

---

* नि० मा० अंक ४८ पान १००७. असाच उ आला आहे. अंक ७६ पान १२०४.

† नि० मा० अंक ७८ पान १२२७. असाच उल्लेख आला आहे. अंक ८० पान १२६२.

‡ नि० मा० अंक ४८ पान १०२७.

च्या अप्रबुद्ध कृतींवर त्यांनीं कडक लेखणी धरली असा पुष्कळांचा ग्रह झाला आहे. तरी खालील उताऱ्यावरून, व शेणवी वगैरे जातीविषयीं जें प्रसंगानें लिहिलें आहे त्यावरून, वाचकांच्या या ग्रहांत बराच फरक पडेल असें वाटतें.

"दुसरी ही गोष्ट आहे कीं.......आधुनिक विद्वन्मंडळांत शूद्रांविषयीं पूर्वीप्रमाणें ग्रह राहिले नाहींत. .... ...भोजनादि कांहीं व्यवहाराखेरीज ब्राह्मणशूद्रत्वाचा संबंध आलीकडील मंडळींत तादृश कोणी ओळखीत नाहींत; व दिवसेंदिवस असलाच प्रकार वृद्धिगत होत जाईल असा देशस्थितीच्या मानावरून सुमार दिसतो."*

स्त्रीशिक्षणाविषयीं व एकंदरीनें अबलोन्नतीविषयीं शास्त्रीबोवांनीं कोठें फारसें लिहिलें नाहीं; प्रसंगोपात् काय लिहिणें आलें तेवढेंच. स्त्रियांस कसें वागवावें याविषयीं त्यांचें मत :—

"बायकोस आपणावांचून दुसरी गति नाहीं, आपण पाहिजे तसा अंमल तिजवर चालविला असतां चालणार आहे हें लक्षांत आणून तिला सतत जाच करणें हें परम अधमाचें कृत्य आहे; व रथचक्रन्यायानें स्त्रीचा अधिकार संसारकृत्यांत पुरुषाच्या बरोबर आहे यास्तव तोही तिला देणें रास्त आहे. परंतु 'अबला यत्र प्रबला' असा प्रकार घरांत असून पुरुषानें निर्माल्य होऊन बसणें, किंवा वेडे लाड करून बायकोस वडील माणसांहून शिरजोर करून ठेवणें हीं दोनही कृत्यें अ-

* नि० मा० अंक ४८ पान १०२५.

त्यंत लज्जास्पद होत ! यास्तव स्त्रीचा बंदा न राहतां तिजशीं प्रेमानें वागण्याचें उदाहरण प्रस्तुत ( जान्सन-च्या ) चरित्रापासून घेण्यासारखें आहे."*

आणखी एकच उतारा खालीं घेतों :—

"पहिला मोठा अपशकुन विधवा स्त्रियांचा. या करुणास्पद विषयावर क्षणभरही विचार करतानां ज्याचें हृदय अत्यंत खेदानें व संतापानें व्याप्त होऊन जात नाहीं त्यास केवळ पाषाणहृदय व अधमाधम म्हणावयास कांहीं हरकत नाहीं..........इतरांस दुःखाची स्थिति प्राप्त झाली असतां ते लागलेच सर्वांच्या दयेस व मैत्रीस पात्र होतात; पण तेंच सगळें वरील अनाथ प्राण्यांच्या ठायीं विपरीत होतें !... ....महादुःखाबद्दल त्यांचा कळवळा कोणास येत नाहीं इतकेंच नव्हे, तर त्यांच्याच प्रारब्धदशेचें तें फळ असें ह्मणून त्यांचा उलट छळच होण्यास आरंभ होतो, हा प्रकार आमच्या देशास अत्यंत लांच्छनरूप होय यांत संशय नाहीं. असो; या संबंधानें जितकें लिहावें तितकें थोडेंच. प्रस्तुत स्थळीं इतकेंच सांगतों कीं, ज्या अपशकुनाच्या प्रकारासंबंधानें आह्मी सध्यां लिहीत आहों तो सर्वथा व्यर्थ आहे हें तर आहेच; पण या शिवाय तो मानणं हें निपद्ग्रस्त मानवी प्राण्याचा उपमर्द करणं ही होय. केवळ दैवगतीनें किंवा यदृच्छेनें प्राप्त होणाऱ्या स्थितिविशेषावरून मनुष्यास मंगळ किंवा अमंगळ मानावें हा केवढा अन्याय आहे !

---

* नि० मा० अंक ४० पान ७९७.

स्त्रियांचें वैधव्य हें जर त्यांच्या अशुभत्वास कारण, तर बाप, भाऊ, बहीण वगैरे कोणी मेल्यानें त्यांच्या नातेवाइकांचें तरी कां तोंड बघावें? पण मुळींच हा केवढा मूर्खत्वाचा प्रकार आहे! जी अत्यंत सदाचरणानें आपलें आयुष्य क्रमून आपल्या कुलास तर काय, पण सगळ्या मनुष्यजातीस भूषण आणीत आहे—कारण मनुष्याचें अंतःकरण स्वभावतःच किती अस्थिर व दुष्ट असतें हें सर्वप्रसिद्धच आहे—त्याच साध्वीचें दर्शन, पुरते तेरा दिवसही न जाऊं देतां जो निर्लज्ज व विषयांध पुरुष, पुनः नवरा मुलगा होऊन उभाच, अशा पुरुषानें अशुभ मानावें हा काय उलटा न्याय!! आणि अशा निष्पाप स्त्रीचें दर्शन जर शुभ नव्हे तर सगळ्या कपाळभर जिनें कुंकवाचा पट्टा ओढला आहे अशा एखाद्या नगरभवानीचें, किंवा उभय कुलास व अवघ्या मनुष्यजातीस, जिनें, स्त्रियांची सहज भूषण जी लज्जा, ती समूळ टाकून देऊन काळोखी आणली अशा बाजारबसवीचें, तिच्या केवळ बाह्य वेशावरून, अत्यंत शुभ दर्शन झालें काय?"

हा उतारा जरासा लांबच आहे, तरी महत्वाचा असल्यामुळें त्यास जागा दिल्याशिवाय राहवलें नाहीं. शास्त्रीबोवा स्त्रीपुनर्विवाहाच्या विरुद्ध ह्मणून जरी बहुशः गवगवा आहे, तरी,हा लेख त्यांच्या दयाभूत अंतःकरणाची व स्त्रियांच्या वैधव्याविषयीं त्यांच्या कळवळ्याची चांगलीच साक्ष पटवितो, यांत संशय नाहीं. आमची खात्री आहे कीं स्त्रीपुनर्विवाहाचा पुढाकार करून विधवांविषयीं कनवाळूपणाचा जे मोठा आव घालतात, त्यांच्या अत्यु-

क्तीनें फुगवून लिहिलेल्या लेखांतही इतका करुणाकर व सदयतेचा लेख सापडणें विरळा! तशांत दुसऱ्या विषयाच्या अनुसंधानानें सहजवृत्त्या येऊन गेल्यामुळें तर त्यावरून, लिहिणाराच्या हृदयांतील 'करुणा खेद व संताप या वृत्ति' जास्तच प्रस्फुट होत आहेत.

शास्त्रीबोवांचे लेख वाचले असतां व त्यांच्या मतांचा विचार केला असतां, कांहीं दोषास्पदही विशेष दृष्टीस पडतात, त्यांचाही एथें निर्देश केला पाहिजे. प्रथमतःच जे ठळक व विशेष लक्षांत येण्याजोगे आहेत ते,— आत्मश्लाघा, घमेंड, व अवडंबर हे होत. ज्यांस शास्त्रीबोवांची कृति मान्य नाहीं व जे तिराहित नसून त्यांच्या प्रतिपक्षिवर्गांत मोडतात, त्यांस वरील तीनही विशेषांची उदाहरणें जागोजाग दाखवितां येतील यांत शंका नाहीं. यानंतर दुसरे दोष म्हटले म्हणजे निष्ठुर व कडक भाषासरणी, कित्येक व्यक्तिविशेषांविषयीं अनुदार विचार, त्यांस जागोजाग खोंचा मारून व लावून लिहिणें, हरहमेश मिशनरींची व ख्रिस्ती धर्माची निंदा करणें व प्रत्येक चांगल्या वाईट गोष्टींतले दोष काढण्याची हौस धरणें इत्यादि होत.

आतां शास्त्रीबोवांच्या तर्फेनें तेथें कांहींच लिहितां यावयाचें नाहीं असें नाहीं. एक तर, "एकोऽपि दोषो" इत्यादि सर्वमान्य कविवचनें त्यांची पाठ राखायाला उभीं आहेतच. या शिवाय, शास्त्रीबोवांचा स्वभाव व एकंदर देशस्थितीचा झोंक या दोहोंकडे युगपद् लक्ष दिलें असतां, वरील दोषाचें अदोषितत्व सिद्ध व्हावयास कांहींच उशीर लागणार नाहीं. साधारणतः शास्त्रीबोवांच्या

भाषेंत काय आणि वर्तनांत काय—गुळमुळीतपणा, हांजी-हांजीखोरपणा, अर्धवटपणा, भित्रेपणा, हे प्रकार अगदीं दिसून येत नाहींत. त्यांस ते कधीं आवडले नाहींत. एवढेंच नव्हे तर ते यांचा नेहमी तिटकारा करीत. तेव्हां, ज्या गोष्टी आपल्याला आवडत नाहींत, एवढेंच नव्हे तर विचाराअंतीं देशहिताला ज्या मोठ्या अपायकारक होत असें ठरतें, अशा गोष्टींवर टीका करतांना व दोषाविष्करण करतांना कोणी उग्र स्वरूप धारण केलें तर त्यांत नवल कसलें? एका नामांकित टीकाकारानें मिल्टनच्या लेखनसरणीविषयीं म्हटलें आहे कीं " एखाद्या गोष्टीच्या वाइटाविषयीं त्याचा ग्रह एकदा झाला म्हणजे तो तीवर तुटून पडे, कधीं गय करीत नसे,"* हीच गोष्ट शास्त्रीबोवांस लागू आहे. आणखी, लोकांमध्यें शैथिल्य भरलें आहे, सर्वत्र अनास्था पसरली आहे, मिशनरींचें बंड वाढत चाललें आहे; त्यांच्या चिथावणीनें नव्या पंथांनीं हिंदुधर्मांत अनेक फळ्या पडत चालल्या आहेत; जे चांगले विद्वान्, समजुतदार व ज्यांवर देशसुधारणेची भिस्त असे गृहस्थ ही स्वकर्तव्यांत माघार घेत आहेत; मोठ्या नांवाखालीं बहुत अयोग्य प्रकार जिरले जात आहेत; अंधपरंपरेनें लोकांची त्यांकडे प्रवृत्ति होत चालली आहे; हांजीहांजीखोरपणा, लुब्रेपणा वाढत चालला आहे; बादशाही अमलाचा कडकपणा भासूं लागला आहे; व सत्यप्रीति आणि देशप्रीति यांचा लोप होत आहे; अशी एकंदर स्थिति डोळ्यासमोर असतां—निदान अशी

* He had a strong mind and a vigorous hand. When he felt strongly, he wrote fiercely.—*Stopford A. Brooke*

स्थिति आहे अशी शास्त्रीबोवांप्रमाणें खात्री झाली असतां, कोणी समंजस मनष्य त्यांच्या लेखांतील प्रखरत्वाबद्दल त्यांस दूषण देण्यास तयार होईल असें वाटत नाहीं. लोकांस जागृत करून स्वकर्तव्योन्मुख करणें जर अवश्य आहे तर विरहदुःखानें क्रियाहीन होऊन गेलेल्या दुष्यंतास ताळ्यावर आणण्यासाठीं इंद्रदूत जो मातली त्यानें योजलेला उपायच योग्य आहे; कारणः—

ज्वलति चलितेंधनोऽग्निर्विप्रकृतः पन्नगः फणं कुरुते ।

याची प्रचीति व्यवहारांत कोणास नाहीं? तर शास्त्रीबोवांच्या ठिकाणीं वरील दोषाचें जें वास्तव्य होतें तें निर्दोषत्वरूपानेंच होतें; ह्मणजे आमच्या देशस्थितीच्या मानानें पाहिलें असतां तें दोषास्पद न होतां, उलटें गुणावहच झालें होतें, असें ह्मणावयास चिंता नाहीं. एका इंग्रजी कवीनें ह्मटलें आहे —

Thus to relieve the wretched was his pride
And even his failings leaned to virtue's side.

तशीच जगन्नाथरायांची ही खालील उक्ति प्रसिद्धच आहेः—

विश्वाभिरामगुणगौरवगुंफितानां
रोषोपि निर्मलधियां रमणीय एव ।
लोकंपृणैः परिमलैः परिपूरीतस्य
काश्मीरजस्य कटुताऽपि नितांतरम्या ॥*

---

* याचें भाषांतर विविधज्ञानविस्तारांत आलें आहे तें:—
जो विश्वतोषद गुणांस सुबुद्धि वाहे
तद्दोषही सुरमणीयचि नित्य पाहे ।
चेतोहरीं परिमलीं परिचारकाचें
जेसें कटुत्व बहु रम्यचि केशराचें॥

शास्त्रीबोवांचा ख्रिस्तीधर्मावर मोठा कटाक्ष होता, याचें कारण, त्यांच्या धर्मविषयक मतांचें विवरण करतांना, मागें सांगितलेंच आहे कीं, या देशाच्या राज्यकारणी स्थितीमुळें त्यास जी तेजी आलेली दिसते ती ह्यांस सहन होत नव्हती. याशिवाय, ख्रिस्तीधर्माचा द्वेष हें त्यांचें कुळव्रत होतें. वडील शास्त्रीबोवांनीं, 'लहरी' नावांच्या पत्रांत त्यावर किती कडाका उडविला होता आणि प्रेषितांबरोबर व बाव्यांबरोबर किती वेळा वादप्रसंग घालून, कसें जेर केलें होतें ही हकीगत त्यांच्या चरित्रलेखांत फार सुरेख वर्णिली आहे. तेव्हां हाच वडिलांचा कित्ता चिरंजीवांनींही चालविला होता. प्रार्थनासमाजादिक हीं केवळ ख्रिस्ती धर्माचीं सोंगें होत अशाच समजुतीनें त्यांजवर ही त्यांचा विशेष वाकडा डोळा होता. 'आमचे नवीन विद्वान लोक, त्यांनीं उपस्थित केलेले सुधारणेचे मार्ग, वीररसप्रधान काव्य, व ख्रिस्तीधर्म' हा 'चौकडा' शास्त्रीबोवांनीं निवडून काढून त्यांजवर जें मनसोक्त हत्यार धरलें व जेथें तेथें त्यांचा अगदीं उपहास केला याचें कारण, रा० जोतिबांच्या 'गुलामगिरीवर' टीका करतांना, ते कळवतात :—

"आमचे शूद्र बंधु अद्याप केवळ अज्ञान व भोळे असल्यामुळें..........त्यांच्या मनांत हव्या त्या मूर्ख कल्पना भरवून देतां येणार आहेत, तर ही त्यांची प्रतारणा न व्हावी..........हें वरील विवेचनाचें मुख्य बीज होतें. याशिवाय..........विक्षिप्तपणाचे अनेक हास्यास्पद प्रकार वाचकांस कळवून त्यांस घटकाभर

करमणूक करावी....... ...हे उद्देश केवळ गौण होते."

एथें जे उद्देश गौण ह्मणून ह्मटले आहेत तेच वास्तविक पाहतां अशा उपहासामध्यें मुख्य असावे असें आह्मास वाटतें. नाटकादिकांत ज्याप्रमाणें विदूषकादि पात्रें किंवा गोंधळांत, तमाशांत दिवटी धरणारा वगैरे मनुष्यावर थट्टामस्करीचा सर्व भार; त्याप्रमाणेंच 'निबंधमाला'-कर्त्यांचा वरील 'चौकड्या'वर कडाका होता. सर्व लोकांस प्रिय होऊं पाहणाऱ्या वक्त्यास व लेखकास अशीं लोकांस रंजविण्याचीं कांहीं साधनें हवींच असतात हें उघड आहे.

शास्त्रीबोवा उत्कृष्ट ग्रंथकार होऊन गेले. त्यांचा जितका वास आपल्यामध्यें झाला, त्यापैकीं निव्वळ बाल्यदशा खेरीज करून, त्यांचा सर्वकाळ ग्रंथरचनेंत गेला, असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. यामुळें त्यांची लेखनसरणी अगदीं घटून जाऊन, मराठी भाषा केवळ अंकित होऊन राहिली होती. ते मोठे विद्वान् होते आणि सतत व्यासंगानें अनेक प्रकारचें ज्ञान त्यांनीं संपादन केलें होतें. त्यांचे मुख्य व आवडते विषय ह्मटले ह्मणजे काव्य आणि इतिहास. तथापि आपल्यासाठीं अमुकच एक विषय त्यांनीं निवडून घेतला होता व त्याशीं आपल्या लेखणीला त्यांनीं अडकवून ठेवलें होतें असें नाहीं. जेणेंकरून रसिकता, मार्मिकता व बहुश्रुतपणा येऊन, ज्ञानवृद्धि होते व विचारशक्तीस प्रखरत्व येतें, अशा सर्व विषयांस त्यांनीं आपल्या ज्ञानभांडागारांत स्थळ दिलें होतें. आणि थोडा विचार केला असतां दिसून येईल कीं, का-

त्येतिहासांत अंतर्भाव होत नाहींत अशा कोणत्या गोष्टी आहेत? सर्व चराचर सृष्टींतील कोणतीही दृश्याऽदृश्य गोष्ट घेतली तरी ती या द्वंद्वांत समाविष्ट झाल्याविनां राहणार नाहीं. तथापि, गहन शास्त्रीय विषय, प्राचीन शिलालेखांचा व वस्तूंचा वगैरे शोध, जमिनी-वरील कर, हिंदुस्थानाची निर्धनता इत्यादि राज्यकारभा-रासंबंधीं विचार, धर्मसंबंधी सुधारणा, चालीरीतीसंबंधीं सामाजिक सुधारणा, अशांपैकीं एखादाच विषय उचलून त्याचाच हव्यास चालवावयाचा किंवा भाषांतरें करावयाचीं अशी बहुधा आपल्यांतील ग्रंथकारांची चाल आहे. त्यांतून सरकारी नोकरी संभाळून ग्रंथकार बनण्याची आपल्या इकडे सर्वत्र शिस्तच पडून गेली आहे. ग्रंथकर्तृत्वाचा धंदा पत्करून ग्रंथकार झाल्याचीं उदाहरणें फारच थोडीं सांपडतील. याचें कारण उघडच आहे, एकच विषय घेऊन त्यावर लिहिणें फार सोपें पडतें; व त्या विषयांत विद्वत्ता मिरवतां येऊन, नांवलौकिक मि-ळविण्याची व वारिष्ट अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत भरण्याची ही उत्तम सोय होते. परंतु शास्त्रीबोवांस या पैकीं ए-कही हेतु इष्ट नव्हता, हें मागें एके ठिकाणीं सांगितलेंच आहे. त्यांची सर्व धाव दुसरीच कडे. सर्वसाधारण ज्ञानप्रा-प्तीचेच विषय उचलून, देशस्थिति, सामाजिकस्थिति, धर्म-स्थिति इत्यादि मोठमोठ्या ठळक ठळक टेपाडांवरून, धो-पट मार्गानेंच त्यांनीं आपल्या लेखणीला चालविलें. समय-विशेषीं इष्टविषय समर्थनार्थ, दरीखोऱ्यामध्यें उतरून, ए-खाद्या विशेष विषयाचा व त्यांतील गुंतागुंतीचा त्यांस विचार करावा लागे. परंतु तेथें कामापुरता मात्र मुक्काम

करून, आंतील प्रदेशाची पाहणी करीत आणि लगेच आपल्या मार्गाला जाऊन मिळत. सारांश, त्यांच्या ज्ञानरूप वातावरणाची जशी विस्तीर्ण मर्यादा होती, त्याप्रमाणें त्यांनीं आपल्या लेखणीला भराऱ्या मारावयासही कोठें प्रतिबंध ठेवला नव्हता. लहानपणापासून मराठी लिहिण्याची हौस, तीवर एकसारखा व्यासंग, विद्वत्ता व विशाळ ज्ञान, निर्मळ देशभक्ति व खरी लोककल्याणेच्छा यामुळें आलेली रुक्षता व प्रखरता इत्यादि गोष्टींनीं त्यांचे लेखांस सरळपणा व सुबोधपणा आला, ते प्रौढ व गंभीर झाले, त्यांत माहिती भरपूर आली, आणि ते सर्वांस मान्य व अत्यंत प्रिय होऊन बसले!

भाषेचा उद्देश ह्मटला ह्मणजे आपले विचार दुसऱ्यास कळविण्याचा होय. अर्थात्, जेणेंकरून थोड्या शब्दांनीं, नीटनेटकेपणानें, व सुलभतेनें ते दुसऱ्यास समजतील, ती भाषासरणी उत्तम ह्मणून ह्मणावयाची. भाषासरणींत भाषण व लेखन या दोहोंचा समावेश होतो. यास्तव ज्यामानानें वरील गुण कोणी आपल्या भाषणांत किंवा लेखांत साधील त्यामानानें तो उत्तम वक्ता किंवा ग्रंथकार ठरेल हें उघड आहे. परंतु कित्येक जण, बोलतानां, घाईमुळें, विचारांचा, व्याकरणशुद्धीचा वगैरे अगदीं गोंधळ करून, अर्धी अर्धी वाक्यें व विचार तसेच टाकून देतात, आणि यामुळें ते काय ह्मणतात हें इतरांस तर कळत नाहींच, पण स्वतः त्यांसच कळत नाहींसें होतें. लिहिणाराची स्थिति यापेक्षां कांहीं बरी असते. त्याला विचार

करण्याला वेळ मिळून, आपला लेख नीटनेटका करण्याला बरीच सवड असते. पण एथें काय मौज होते कीं, कर्त्ता, कर्म, क्रियापद, व वाक्यार्थ हीं जुळविण्याच्या खटपटींत पडून, तो आपली भाषा अगदीं बोजड व कंटाळवाणी करून टाकतो,—मग दूरान्वयादि दोष येऊन, ती समजेनाशीं झाली नाहीं ह्मणजे मोठें भाग्य! तात्पर्य, भाषण किंवा लेखन चांगलें वठावें असें जर कोणास वाटत असलें तर एक नियम त्यानें मुख्यत्वेंकरून लक्षांत वागविला पाहिजे. तो हा कीं, त्यानें आपल्या भाषणांत लेखनाचा नीटनेटकेपणा आणण्याचा यत्न करावा, आणि लेखनांत बोलण्यांतलें सौलभ्य, व प्रस्फुटत्व साधेल याविषयीं जपावें. कोणतें ही भाषण किंवा लेख चांगला उतरला आहे किंवा नाहीं हें पाहणें असल्यास तें भाषण कागदावर टाचून वाचून पहावें, आणि लेख दुसऱ्याकडून वाचवून ऐकावा ह्मणजे त्यांच्या उत्कृष्टतेचा तेव्हांच निवाडा करतां येईल. प्रख्यात वक्ता बर्क याणें भाषासरणीची ही कसोटी चांगली लक्षांत वागविली होती. तो पहिल्या प्रतीचा वक्ता होता हें तर सर्व विश्रुतच आहे. तसाच तो ग्रंथकारही उत्कृष्टापैकींच होऊन गेला. फ्रान्स देशांत राज्यक्रांति होण्याचीं चिन्हें जेव्हां दिसूं लागलीं तेव्हां सर्व युरोपभर विद्वान व राज्यधोरणी मंडळांत चर्चा माजून एकच खळबळ सुरू झाली; ती बर्क यास न आवडून, तिच्या विरुद्ध त्यानें यत्न चालविला असतां, त्याच्या लक्षांत आलें कीं वक्तृत्वाचा प्रभाव नियमित स्थळीं व नियमित प्रेक्षक मंडळावरच काय तो पडणार, तो त्या प्रसंगाला पुरेसा होणार नाहीं. असें

जाणून त्यानें लागलेंच कलम उचललें व असें उत्कृष्ट निबंध लिहिले कीं, त्याचा प्रसार सर्व युरोपांत होऊन, तेणेंकरून राज्यक्रांतीची लाट जी इतर राष्ट्रांवर उसळू पाहात होती, तिचा वेग मंद होत होत, अगदीं नाहींसा झाला, व तीं मोठ्या अरिष्टांतून बचावलीं ! आणि हा सर्व प्रभाव कसला?—तर त्याच्या उत्कृष्ट भाषासरणीचा ! तिच्या संबंधानें एका भाषागुणदोषविवेचकानें ह्मटलें आहे कीं, तो बोलल्याप्रमाणें लिहित असे, व मोठ्या ग्रंथकारासही जी भाषा लिहितांना संकोच वाटावयास नको अशा भाषेनें तो बोलत असे. विष्णुशास्त्री यांच्या लेखनांतही ह्याच वरील नियमाकडे लक्ष दिलेलें दिसून येतें. गुरुजी सभोंतावलच्या शिष्यास उपदेश करीत आहे किंवा वक्ता श्रोत्यापुढें भाषण करीत आहे असा त्यांचे लेख वाचतांना भास होतो. याची प्रचीति कोणासही घेतां येण्यासारखी आहे. शास्त्रीबोवांच्या लेखनांत दुसरे कित्येक उत्कृष्ट गुण आहेत खरे—व ते पुढें आम्ही सांगणारच आहों—तरी त्यांस जें एवढें मोहकत्व आलें आहे व ते सर्व साधारण लोकसमूहास जे एवढे प्रिय झाले याचें कारण मुख्यत्वेंकरून त्यांतील वक्तृत्वाचा गुण होय असें आम्हांस वाटतें.

याच गुणामुळें शास्त्रीबोवांची भाषासरणी अगदीं सोपी व सुलभ झाली आहे; तींत कृत्रिमपणाचा लवलेशही नाहीं. त्यांचे लेख वाचूं लागलें असतां, नदीच्या प्रवाहाप्रमाणें भाषेचा ओघ अप्रतिहत एकसारखा चालला असतो, व त्याबरोबर वाचणाऱ्याचें मन वाहावत जाऊन, तन्मय होतें.

अशा उत्कृष्ट भाषासरणीचीं उदाहरणें त्यांच्या लेखांत वाचकांस जागोजाग सांपडण्यासारखीं आहेत. विचारांची संगति जुळण्यासाठीं लेख पुनः वाचावा लागो, पण अर्थ समजण्यासाठीं कोठेंही अडखळावें लागणार नाहीं, असें जें मेकालेच्या लेखनशैलीविषयीं ह्मटलें आहे तेंच शास्त्रीबोवांच्या लेखांस अक्षरशः लागू पडतें.

भाषा रसाळ असून, अलंकारिक आहे. जागोजाग उपमा, दृष्टांत वगैरे अलंकारांची योजना केलेली आहे. परंतु उगीच खोगीरभरती करून ते अस्थानीं घुसडून दिलेले नाहींत, तर जागचेजागीं येऊन, अगदीं समर्पक असतात. त्यामुळें वर्ण्य विषय विशद होऊन मन प्रसन्न होतें. मागें ८७ व्या पानावर शालापत्रकांतला जो उतारा घेतला आहे, त्यांत शिक्षक विद्वान असला तरी त्यास उत्तम शिकवतां येईलच असा नेम नाहीं याचें समर्थन, भरलेल्या भांड्याच्या दृष्टांतानें, किती सुरेख केलें आहे ! शास्त्रीबोवांचें लेख सर्वसाधारण लोकांसाठीं मुख्यत्वें लिहिले असल्यामुळें व त्यांस नवीन नवीन विचार शिकावयाचे असल्यामुळें त्यांनीं ते होतील तेवढे उपमांनीं व इतर अलंकारांनीं खुलवून लिहिले आहेत. बहुधा प्रत्येक नवीन विचार, नवीन कल्पना किंवा कार्यकारणभाव हीं दाखल करतेवेळीं त्यांनीं तीं उपमादृष्टांतादिकांनीं विशद करून दाखविलीं आहेत. त्यांची कल्पनाशक्ति एवढी प्रबळ होती कीं लिहितेवेळीं उदाहरणें, उपमा वगैरे एकामागून एक त्यांस भराभर सुचत असत. इतकें असून क्लिष्टकल्पना किंवा पांचटकोट्या कोठेंही आढळत नाहीं. — उदहरणार्थ खालील उतारा.

"मनुष्याची बुद्धि कितीही प्रखर असली तरी अभ्यासावांचून व उद्योगावांचून तिचें कांहीं तेज पडावयाचें नाहीं. पहा कीं, (१) एखादी जमीन उत्तम लागवडीची जरी असली तरी तिची मालमशागत जर नीट केली नाहीं, तर तिचें स्वरूप पाहिजे तसें वठावयाचें नाहीं. ( २ ) मोठा उत्तम जातीचा आंबा जरी घेतला तरी तो रुजून त्याचें झाड होऊन तें पूर्णदशेस आल्याविना त्याचा गुण प्रगट व्हावयाचा नाहीं. मोठा हपूसचा आंबा आहे ह्मणून लहानसा रोपडा असतांही त्याचीं पानें चावलीं तर गोड लागतील काय ? ( ३ ) अथवा वाफेचें उदाहरण घ्या. हिच्या अद्भुत शक्तीचें या काळांत कोणास वर्णन द्यावयास पाहिजे असें नाहीं. पण तिचें सामर्थ्य प्रगट होण्यास तिची तशी योजना झाली तर उपयोग. ती न झाली, तर जी हजारो खंडीचें ओझें वायुवेगेंकरून एका देशांतून दुसऱ्या देशांत नेऊन टाकते.........तीच एरवीं सैंपाकघरांत चुलीवरील भांड्याचें झांकण नुसती थडथडावीत बसेल इतकेंच!"*

एकच विचार विस्तारानें खुलवून वाचकांच्या मनावर कसा प्रतिबिंबित केला असतो याचेंही वरील एक उदाहरण आहे. प्रतिपक्षाच्या मताचें खंडण धडधडीत स्पष्ट शब्दांनीं न करतां बहुधा दृष्टांतानें तें दर्शविण्याची त्यांची चाल आहे. जसें:—

"ज्या कल्पना लोकांच्या कधीं मनांतच आल्या नाहींत त्यांचे वाचक शब्द किंवा वाक्यें त्या भाषेंत

* नि. मा.—डाक्टर जान्सन. पान ७९५.

असावीं कशीं? ....Hearth, Oak, Skating वगैरे शब्दांस मराठींत प्रतिशब्द जसे सापडणें नाहींत, तसेच, Parliament, Limited monarchy....वगैरेस तरी कसे सापडतील? बरें, अशानें मराठीवर दरिद्रतेचें दूषण येईल काय? तिकडे कांहीं जिन्नस होतात ते इकडे होत नाहींत ह्मणून आमचा देश जसा भिकारी होत नाहीं, त्याप्रमाणें तिकडील कांहीं कल्पना व विचार इकडच्या भाषांस मुळींच माहीत नसले ह्मणून या भिकारच ठरल्या असेंही पण होत नाहीं."†

प्रसिद्ध कवींच्या बहुतेक ग्रंथांतून मनोरम अवतरणें करण्याचें त्यांचें कौशल्य अगदीं अवर्णनीय आहे. त्याच्या योगानें वाचणाऱ्याच्या मनावर ग्रंथकाराच्या विशाळ वाचनाचें व चातुर्याचें वजन पडून, तो चकित होऊन जातो. प्रत्येक निबंधाच्या आरंभीं त्यांनीं एकेक अवतरण केलें आहे त्यांत निबंधांतील अर्थ, लहानशा कांचेच्या आरशांत सभोंवतालचा विस्तृत प्रदेश स्वच्छ दिसावा त्याप्रमाणें कसा प्रतिबिंबित झालेला असतो हें पाहून मन थक्क होतें. निबंध मालेच्या शेवटल्या चौऱ्यांयशीव्या अंकाच्या आरंभींचें प्रसिद्ध अवतरणच पहा—" गाहंतां महिषा.........विश्रामं लभतामिदं च शिथिलज्याबंधमस्मद्धनुः।" या वरून मालेच्या अंताबरोबर स्वतः आपल्याही अंताची शास्त्रीबोवांस प्रेरणा झाली होती कीं काय असा भास होतो. त्यांच्या लेखणीचा दम 'शिथिल'

---

† नि. मा.—भाषांतर. पान ११७.

झाला नव्हता एवढेंच नाहीं पण जास्ती वाढला असतांही तिचा टणत्कार एकाएकीं जो बंद पडला तो पडला. तो फिरून कानीं पडण्याची आतां कोठून आशा !

त्यांची वर्णन करण्याची हातोटी अनुपम आहे. त्यांचीं वर्णनें वाचतांना विवक्षित गोष्ट आपल्या समोर घडत आहे असा भास होतो व चित्तवृत्ति क्षणभर तन्मय होते. हातांत घेतलेल्या विषयाची जुळणी करण्यांत त्यांच्यासारखी कर्तबगारी फारच थोड्यांस साधेल. सर्व विषय कोठेंही गोंधळ न होऊं देतां, यथाक्रम मांडून, त्याच्या सर्व दिशांकडे लक्ष पुरवून, संगतवार प्रतिपादन केला असतो. विषय कितीही कठिण किंवा अपरिचित असो तरी तो वाचकांच्या मनांत भरवून देण्याची शैली त्यांस उत्तम साधली होती.

शास्त्रीबोवांच्या लेखांचा व विचारांचा एक मोठाच विशेष सांगण्यासारखा आहे. तो हा कीं त्यांच्या वाचनानें वाचणाऱ्याचें चित्त, निरुत्साह जरी असलें तरी आशायुक्त होऊन, उत्कंठित होतें. आपण कांहीं तरी करावें, कांहीं तरी करण्याजोगें आहे, अशी मनाची साहजिक प्रवृत्ति होते. उचललेल्या विषयांतील दोषांवर यथास्थित टीका करून, आपल्या प्रतिपक्षाची टेर उडवून देण्याची त्यांची तऱ्हा—जी त्यांच्या प्रतिपक्षी वर्गास फार जाचत असे, ती सुद्धां वाचकाच्या मनाला उत्तेजित करण्याला बरीच कारण होते. तसाच त्यांचा हास्यविनोदाचा प्रकारही सुशिक्षितपणाचा असून, हृदयंगम आहे. प्रतिपक्षाच्या एखाद्या वेडगळ किंवा अल्प समजुतीच्या मतावर कडाका उडवीत असतां मध्येंच

कांहीं हास्यविनोदाचीं मजेदार वाक्यें यावीं किंवा खोंचदार शब्द यावे आणि तेणेंकरून वाचकांचें चित्त उल्लसित होऊन एकदम हशाची उकळी यावी, अशी प्रतीति कोणत्या अरसिकास येत नसेल ?

आतां आणखी एक सांगण्यासारखा विशेष सांगून पुरे करतों. इंग्रेजी टीकाकारांनीं भाषेच्या दोन रीति सांगितल्या आहेत—एक Classic Style आणि दुसरी Romantic Style. यापैकीं शास्त्रीबोवांचें लिहिणें romantic style मध्यें मोडतें.* यामुळें त्यांच्या लिहि-

---

* In classical writing every idea is called up to the mind as nakedly as possible, and at the same time as distinctly; it is exhibited in white light, and left to produce its effect by its own unaided power. In romantic writing, on the other hand, all objects are exhibited as it were through a coloured and iridescent atmosphere. Round about every central idea the romantic writer summons up a cloud of accessory and subordinate ideas for the sake of enhancing its effect, if at the risk of confusing its outlines. The temper, again, of the romantic writer is one of excitement, while the temper of the classical writer is one of self-possession. No matter what the power of his subject the classical writer does not fail to assert his mastery over it and over himself-while the romantic writer seems as though his subject were ever on the point of dazzling and carrying him away. On the one hand there is calm, on the other hand enthusiasm the virtues of the one style are strength of grasp, with clearness and justice of presentment : the virtues of the other style are glow of spirit, with magic and richneess of suggestion.

ण्यांत एक प्रकारची ऐट आली आहे; ती त्यांचीच. त्यांनींच ती प्रथम मराठींत आणली व त्यांनाच उत्तम साधली होती. इतरांनीं तिचें अनुकरण केलें आहे, पण ती तशी साधत नाहीं असें चांगल्या वाक्बगार ग्रंथकारांचें मत आहे. एका कवीनें ह्मटलें आहे:—

किं कवेस्तस्य काव्येन किं काण्डेन धनुष्मतः।
परस्य हृदये लग्नं न घूर्णयति यच्छिरः॥ सभातरंग

याची प्रतीति शास्त्रीबोवांचे लेख वाचले असतां कोणास येत नाहीं? एथें कवीनें, श्लेषयोजनेनें कवीच्या व शूराच्या कृतीचें साम्य ध्वनित केलें आहे. पण एवढी खटपट करण्याची वास्तविक कांहींच गरज नाहीं. खऱ्या शूराचें वर्तन आणि मनोवेधक व उत्तम लेखकाची वाणी, हीं स्वभावतःच सरळ आणि झोंकदार असतात!

एथपावेतों, विष्णुशास्त्री यांचा चरित्रवृत्तांत, त्यांचें खासगी व सार्वजनिक वर्तन, त्यांचीं मतें, व त्यांची लेखनसरणी याविषयीं अनुक्रमेंकरून आह्मी लिहिलें. आतां त्यांच्या योग्यतेविषयीं साधारणपणें उपसंहाररूप दोन शब्द लिहावयाचे आहेत.

विष्णुशास्त्री यांनीं एवढें केलें काय असा प्रश्न कित्येक जणांच्या तोंडून वाचकांनीं ऐकला असेल, व त्याचा उल्लेख आरंभीं उपोद्घातांत आह्मी केलाच आहे. हा प्रश्न करणारे बहुधा दोन प्रकारचे लोक आहेत असें दिसून येतें—एक अगदीं अडाणी लोक व एक अगदीं उच्च दर्जाचे. या दोन्ही प्रकारच्या लोकांची

दृष्टि आकुंचित झालेली असते. एकास कारण त्यांचें शुद्ध अजाणपण व दुसऱ्यांस त्यांचा दुराग्रह व आ-ढ्यता; या दोहोंमुळें सामान्य जनांचे व्यवहार त्यांस बरोबर कळूं नयेत अशीच सरासरी स्थिति असते. विष्णुशास्त्री स्वतः सामान्य लोकांपैकीं असून सामान्य प्रतीच्या लोकांसाठींच त्यांचीं सगळीं कृत्यें होतीं. त्यांनीं कोठें सरकारचीं मोठमोठीं कामें बजावलीं नाहींत किंवा रावबहादुरी मिळविली नाहीं, कौन्सिलदारीची खटपट केली नाहीं किंवा विलायतेचा प्रवास करून सुधारणेचें कंकणही हाताला बांधून घेतलें नाहीं, त्याचप्रमाणें भा-रतादिक प्रचंड ग्रंथांचीं इंग्रेजींत भाषांतरें केलीं नाहींत किंवा प्राचीन शिलालेख लावले नाहींत, समाज स्था-पिले नाहींत किंवा व्यापारोत्तेजक, ग्रंथोत्तेजक, अशा मंडळ्या काढल्या नाहींत, किंवा प्रत्येक सार्वजनिक कृत्यांत पुढें पुढें करून नांव गाजविण्याची इच्छा धरली नाहीं; अशापैकीं कोणतेंच कृत्य त्यांनीं केलें नाहीं, तेव्हां त्यांची योग्यता वरील दोनही प्रकारच्या लोकांस भा-सावी कशी? शास्त्रीबोवांचीं कृत्यें उच्च दर्जाच्या लो-कांच्या नजरेनें क्षुद्र दिसलीं व त्यांचें फारसें महत्व त्यांस वाटलें नाहीं किंवा अज्ञजनांच्या नजरेंत तीं भरलीं नाहींत तर त्यांत काय आश्चर्य आहे? तथापि सर्वसा-धारण लोकांचें कल्याण व्हावें व त्यांनीं सुधारावें अशा खटपटी मनःपूर्वक केल्यानें व अशा खटपटी आपल्या अवसानाप्रमाणें चालवून त्यांत यश मिळविल्यानेंच जर कोणाची योग्यता धरावयाची आहे तर शास्त्रीबोवांनीं असें पुष्कळ केलें आहे यांत संशय नाहीं; व त्याबद्दल

आपल्या सर्वांच्या मोठ्याच आदरास ते पात्र झाले आहेत हें कृतज्ञपणें कबूल करणें भाग आहे.

अगोदर आपल्यामध्यें त्यांचा वास फार अल्पकाळ झाला. ऐन उमेदीच्या म्हणजे ३२ वे वर्षीं सगळा ग्रंथ आटपल्यामुळें त्यांस, आपले सर्व बेत तडीस न्यावयास पुरेसा अवधि मिळालाच नाहीं. तो मिळाला असता तर महाराष्ट्राची आजला कांहींच्याबाहीच स्थिति झाली असती व सुधारणेमध्यें त्याची मजल बऱ्याच पल्ल्याला जाऊन पोंचली असती. अगदीं साधारण गोष्टींशीं आरंभ होऊन त्यांच्या चरित्रवृक्षाचें खोड कसें पोसत चाललें होतें व त्यांच्या कृत्यांचा शाखाविस्तार कसा माजत चालला होता हें लक्षांत आणलें असतां, त्यांच्या हातून देशोन्नतीच्या कामांत केवढी भर पडली असती याचें कांहीं अनुमान करतां येईल. तथापि अशा अनुमानांत तूर्त काय जीव आहे ? ते आपल्यांत मुळींच उदयास आले नसते किंवा दीर्घकाळ जगते तर या देशाची अमुक अमुक तऱ्हा झाली असती ह्या विचारांचा हल्लीं काय उपयोग आहे ? यास्तव ते जरी एका बाजूस ठेवले, व एवढ्या अल्पकाळांतही त्यांनीं जे उद्योग केले व तेणेंकरून एक प्रकारचें जें नवें पाणी लोकांत आणलें, त्यावरूनच केवळ जरी विचार केला, तरी मोठ्या चिरायु धेंडांपेक्षांही त्यांचे उपकार या देशावर कमी झाले असें ह्मणतां येणार नाहीं. आडमार्गानें जन्मभर लोककल्याणाचा शीण करण्यापेक्षां, निःस्वार्थ बुद्धीनें व योग्य मार्गानेंच यत्न केल्यास अल्पकाळांतही मोठें कार्य होऊं शकेल हें उघड आहे. काढ्याचा तांब्याभर

घोटा पोटांत ओतण्यापेक्षां जाज्वल्य मात्रेचीं एक दोनच बोटें चाटविल्यानें रोग्याला थोडा उपयोग होईल असें नाहीं.

मागें चरित्रकथनामध्यें, शास्त्रीबोवांनीं उपस्थित केलेल्या उद्योगपरंपरेविषयीं आम्हीं लिहिलेंच आहे; तेव्हां एथें आणखी कांहीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. त्यांनीं जीं जीं कामें हातीं घेतलीं त्या सर्वांत ते आपली च्छाप ठेवून गेले ही गोष्ट कांहीं सामान्यांपैकीं नाहीं. त्यांची निबंधमाला घ्या, केसरी घ्या, चित्रशाळा घ्या, नवीन शाळा घ्या, काव्येतिहाससंग्रह घ्या,—हींच काय पण निबंधमालेंतील विषय, विनोद महदाख्यायिका, अर्थ सादृश्यें इ०—कोणतेंही सदर घ्या—त्यांवरून त्यांच्या बुद्धीचें स्वकीयत्व तेव्हांच लक्षांत आल्यावांचून राहात नाहीं. आणि हीं कृत्यें एवढीं उपयुक्त आहेत व लोकांस एवढीं पसंत पडलीं आहेत कीं त्यांची नक्कल चहोंकडे होत चालली आहे. मुळीं,

अनारंभो हि कार्याणां प्रथमं बुद्धिलक्षणं ।
प्रारब्धस्यांतगमनं द्वितीयं बुद्धिलक्षणम् ॥

'एखादी गोष्ट करण्याचे भरीस पडूं नये, पडलें तर शेवटास नेल्याशिवाय सोडूं नये' ही साधारण व्यवहारांतली शहाणपणाची कसोटी प्रसिद्धच आहे. आपण कोणतें काम हातीं घेत आहों, आपलें सामर्थ्य किती आहे, त्यांत अडचणी कोणत्या आहेत, त्याला उपाय काय इ० गोष्टींचा विचार अगोदर करून तें मनोदयाप्रमाणें नीटपणें तडीस नेणें म्हणजे बरेंच शहाणपणाचें

काम आहे. योग्य माणसांची निवड करून, शास्त्रीबोवांनीं आपलीं कृत्यें चांगल्या मजबूत पायावर बसविलीं असल्यामुळें तीं सुरळीत निभून चिरायु होतील यांत कांहीं संशय नाहीं. रा० रा० बाळ गंगाधर टिळक, गणेश गोपाळ अगरकर, वामन शिवराम आपटे यांच्या सारखी मंडळी जी त्यांत पडली आहे, ती अनेक अडचणींतून सर्व खटला यथास्थित रेटून अखेर शास्त्रीबोवांचा मनोदय सफळ करतील अशी उमेद धरल्यास चुकी होणार नाहीं. काव्येतिहाससंग्रह काढण्यामध्यें शास्त्रीबोवांनीं दुसऱ्या दोघा विद्वानांची मदत घेतली होती. पुढें त्यांचें यांचें पटेनासें होऊन, शास्त्रीबोवांनीं तें काम सदर दोघा गृहस्थांकडून नीट झेपण्यासारखें आहे असें पाहून त्यांच्याकडेच लावून दिलें. इष्ट कार्याची सिद्धि हा मुख्य उद्देश; तें कोणी कसें करावें हा गौण विचार. याप्रमाणें योग्य गृहस्थांची नेमणुक झाल्यामुळें काव्येतिहाससंग्रहाचें काम बारा वर्षें अव्याहत चालून बहुतेक जुन्या ग्रंथांचा जीर्णोद्धार झाला. असो; तर यावरून हें दिसून येईल कीं शास्त्रीबोवांची नुसती उद्योगपरंपरा जरी घेतली व ती चांगल्या मजबूद पायावर उभी करण्यांत जें त्यांचें योजकत्व दिसून येतें त्याचाच जरी केवळ विचार केला, तरी त्यांच्या श्रेष्ठ योग्यतेविषयीं कोणाचीही सहज खात्री होईल यांत संशय नाहीं.

परंतु आह्मास असें वाटतें कीं त्यांच्या योग्यतेचें जें मान ठरवावयाचें तें मुख्यत्वेंकरून त्यांच्या लोकप्रियतेवरून. 'लोकांस आपण कोणत्या रीतीनें प्रिय होऊं' याबद्दल त्यांनीं एकसारखा नीट विचारच केला

होता, व त्याला अनुसरून आपल्या एकंदर खटपटींचा रोख ठेवला होता असें दिसून येतें. लोकस्थिति कशी आहे, त्यांस कोणत्या गोष्टींची उणीव आहे, त्यांस सुधारण्याचे उपाय कोणते, ते कसे अमलांत आणावे, सुधारक बनून जो लोकनायकत्व करूं पाहील त्याच्या अंगीं कोणते गुण पाहिजेत, आपल्यांत हल्लीं जे सुधारक व लोकनायक ह्मणून गाजताहेत त्यांच्यांत ते किती आहेत, त्यांच्या यत्नास यश कां येत नाहीं, इत्यादि गोष्टींच्या रहस्यांचा त्यांनीं मार्मिकपणानें शोध केला होता व त्या रहस्यांचा थांग त्यांस बराच लागला होता असें ह्मणावयास हरकत नाहीं. लोकांस खुश ठेवून त्यांच्या हातूनच त्यांची स्वतःची सुधारणा करण्याची युक्ति त्यांस फार नामी साधली होती. आणि ती त्यांणीं निःस्वार्थ बुद्धीनें व कुशलतेनें योजिल्यामुळें, त्यांजवर लोकांचा मोठा विश्वास बसला होता. आह्मास खात्रीनें असें वाटतें कीं आजवर इंग्रेजी झाल्यापासून शास्त्रीबोवांच्या इतका लोकांचा विश्वास व लोकांची प्रीति आपल्यांतील पुढाऱ्यांपैकीं फारच थोड्यांनीं जोडली असेल.* आह्मीं

---

* शास्त्रीबोवा किती लोकप्रिय झाले होते व त्यांचे लेख वाचून वाचकांची कशी मुरकुंडी वळत असे याचें प्रत्यंतरासाठीं, एक गोष्ट जरी थोडी अप्रासंगिकच आहे, तरी एथें सांगितल्यावांचून राहवत नाहीं. ती ही कीं, आमच्या एका मित्रास निबंधमालेचा व नंतर केसरीचा फार नाद लागला व त्याच्या कर्त्याविषयीं पराकाष्ठेचें प्रेम उत्पन्न झालें; तें इतकें कीं जर आपल्या देशाचें पुनरुज्जीवन होणें असेल व गीतेंत 'संभवामि युगेयुगे' ह्मणून दिलेलें आश्वासन खरें होणें असेल तर तें याच पुरुषाचें हांतून होईल असें

तो वारंवार ह्मणत असे व शिवाजीमहाराजाप्रमाणेंच त्यांस तो मान देत असे. सन १८८२ सालीं चातुर्थिक हिमज्वरानें तो दोन तीन महिने बेजार होऊन त्याची प्रकृति फार क्षीण झाली होती; एके दिवशीं त्याच्या समाचाराला गेलों असतां, त्यास बोलतांना विष्णुशास्त्री यांच्या मृत्यूची बातमी सांगितली. ती प्रथम त्यास खरीच वाटेना; मग वर्तमानपत्रच दाखविल्यावर त्यास जें रडें कोसळलें तें कांहीं आवरेना. तो ह्मणे 'देशांतील चांगले चांगलेच मनुष्य देव ओढून नेतो त्याअर्थी या देशाचें पुरें दुर्भाग्य ओढवलें खरें. यापेक्षां मला कां मरण येत नाहीं. विष्णुशास्त्री यांस देशकार्यासाठीं राखून देव मला नेता तर मी मोठ्या खुशीनें जातों.' आणि असें ईश्वरानें कां केलें नाहीं ह्मणून तो एखाद्या वेड्यासारखा हव्यातशा शिव्या देत सुटला. तेव्हां याचें डोकें फिरलें किंवा वायु झाला अशी आह्मास भीति पडली; मग मोठ्या प्रयत्नानें शांत करतां करतां थकवा येऊन झोप लागल्यावर त्यास बरें वाटलें.

या पूर्वी मॅट्रिक्युलेशनचा अभ्यास करीत असतां, ता० १३ आगष्ट सन १८८१च्या पत्रांत तो लिहितो. "काय करावें? केसरी येण्याची मी अगदीं वाट पहात असतों. केसरीचे मागचे अंक व निबंधमाला वाचण्यांत फार वेळ जाऊन त्यापुढें माझ्या परीक्षेच्या आभ्यासांतही कांहीं व्यत्यय येऊं लागला आहे. या बद्दल माझे बंधु मजवर रागें भरतात व मलाही वाईट वाटत नाहीं असें नाहीं. पण हे लेख नजरेस पडले असतां, खालील श्लोकांत वर्णिलेल्या मानवती प्रमाणेंच सरासरी माझी गति होते!

भ्रूभंगे रचितेऽपि दृष्टिरधिकं सोत्कंठमुद्वीक्षते
रुद्धायामपि वाचि सस्मितमिदं दग्धाननं जायते ।
कार्कश्यं गमितेऽपि चेतसि तनू रोमांचमालंबते
दृष्टे निर्वहणं भविष्यति कथं मानस्य तस्मिन्जने ॥ १ ॥"

किंवा दराऱ्यानेंही जीं कामें होणें कठिण तींच केवळ प्रेमानें व विश्वासानें सहज घडून येतात. आणखी कांहीं दिवस शास्त्रीबोवांचें अस्तित्व आपल्यांत झालें असतें तर या दोहोंच्या सहाय्यानें त्यांनीं महाराष्ट्राची कांहीं निराळीच तऱ्हा करून सोडली असती, व ज्या इष्ट सुधारणांसाठीं आपल्यांतील मोठमोठे ह्मणविणारेही हातटेकीस आले आहेत त्यांपैकीं बऱ्याच हंहं ह्मणतां व रणतुंबळ अगदीं न माजतां अमलांत आल्या असत्या. शास्त्रीबोवा हे सुधारक होते याविषयीं कोणासही बहुधा शंका येईल असें वाटत नाहीं. तथापि त्यांनीं सुधारणेची गति थांबविली, किंबहुना उलटी गति दिली असा त्यांच्यावर आक्षेप आहे. त्याचप्रमाणें त्यांनीं पुण्यांतील व इतर ठिकाणच्या पोरांचीं मनें बिघडविलीं, असाही आणखी आरोप कित्येक म्हाताऱ्या धेंडांच्या मुखांतून ऐकूं येतो. पण या दोहोंतही आम्हास मोठासा अर्थ दिसत नाहीं. वाचकांचे ठिकाणीं मार्मिकता उत्पन्न करून, कोणीं गुणदोषविवेचनाची शक्ति आणली म्हणून कांहीं त्यानें मनें बिघडविलीं असें होत नाहीं. याचप्रमाणें सुधारकत्वाचा आक्षेप तर फारच चमत्कारिक आहे. शास्त्रीबोवा हे सुधारक खरे, तथापि ते 'थंडे सुधारक' होते;* म्हणून त्यांनीं सु-

* "ज्या प्रवृत्ति आज हजारों वर्षे सारख्या चालू आहेत त्या रावबहादुरप्रभृति मंडळीस आज आवडेनाशा झाल्या ह्मणून त्याग-लीच लोकांनीं एका क्षणांत सोडून द्याव्याना! मोठमोठ्या [illegible]

धारणेला अडथळा आणला असा आळ घालणें या काय म्हणावें? त्यांचें एकेक कृत्य, एकेक विचार, नवी सुधारणेला संमत असाच आहे अशी त्यांच्याशीं वाद घालणाऱ्यांचीही समजूत झाली होती; मग विष्णुशास्त्री सुधारणेला प्रतिकुळ होते हें म्हणणें किती विलक्षण आहे! सर्व प्रकारच्या सुधारणेंत मूळभूत दोन तत्वें लक्षांत वागविलीं पाहिजेत असा त्यांच्या मतांचा रोख होता. तीं कोणचीं हें मराठी भाषा सुधारण्याचे उपाय सुचवितांना त्यांणीं सांगितलें आहे.—एक 'परभाषादूषणरूप क्षयाचें बीज न लागूं देणें आणि दुसरें 'मराठीचें स्वत्व म्हणजे निराळेपणा' ठेवणें. हींच दोन तत्वें देशस्थिति, समाजस्थिति, धर्मस्थिति सुधारतांना लक्षांत वागविलीं पाहिजेत. कोणत्याही रीतीनें कां होईना युरोपीयन तऱ्हा देशांत सुरू झाली पाहिजे; युरोपीयन तऱ्हा स्वीकारणें हें त्रै काळमहात्म्य (Spirit of the age); हे विचार देशांतील शेंकडो लोकांप्रमाणें शास्त्रीबोवांस संमत नव्हते. कित्येक रावबहादुरांप्रमाणें काळमहात्म्यांत नदींतल्या गोट्यासारखें वाहवत जाणाऱ्यांपैकीं शास्त्रीबोवा नव्हते; तर नदीकांठच्या शेताला लावलेले मोठेमोठे पाषाण जसे नदीचा प्रवाह फिरवून शेताचें रक्षण करतात

---

ळ लोटत असतो हें रावबहादुरांस माहीत नाहीं काय? गुलामांचा व्यापार या विषयावर इंग्लंडांत किती दीर्घ चर्चा चालली होती बरें? आणि त्यांतून अजूनही वरील राक्षसी व्यापार म्हणजे वाईटच अशाविषयीं तरी सर्वांची खात्री होऊन चुकली आहे काय? [illegible] नाहीं?" इत्यादि.

रुद्धायाभ[illegible]

कार्कश्यं गमितेऽपि चेतसि तनू रोमांचमालंबते

दृष्टे निर्वहणं भविष्यति कथं मानस्य तस्मिन्जने ॥ १ ॥"